रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९ । अंक १८५ । पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

## कसबा गणपती मंदिर १५ दिवस बंद राहणार

**पुणे :** पुण्याचे ग्रामदैवत असलेले श्री कसबा गणपती मंदिर १५ दिवस बंद राहणार आहे. देवस्थान ट्रस्टच्यावतीने मंदिरातील मुख्य दैवत गणेशमूर्तीच्या शेंदूर कवच दुरुस्ती प्रक्रियेस येत्या सोमवारपासून (दि. १५) प्रारंभ होणार आहे. त्यामुळे प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत मंदिर सर्व भाविकांसाठी पूर्णपणे १५ दिवसांसाठी बंद राहणार आहे. मंदिराच्या आतापर्यंतच्या उपलब्ध असलेल्या इतिहासात अशी प्रक्रिया प्रथमच घडत असल्याची माहिती देवस्थानचे प्रमुख विश्वस्त विनायक बाजीराव ठकार यांनी दिली. पुण्यातील पत्रकार भवन इथे ग्रामदैवत कसबा गणपती मंदिर देवस्थान ट्रस्टच्यावतीने पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी त्यांनी याबाबत माहिती दिली.

रायगड, गुरुवार, दि. ११ डिसेंबर २०२५

# कृषीवल

किंमत ४ ₹

## लाचखोर तहसीलदारास रंगेहाथ अटक

**नाशिक :** पुणे जिल्ह्यातील सहकार कार्यालयात काही दिवसांपूर्वी लाच घेताना अधिकाऱ्याला रंगेहाथ अटक करण्यात आली होती. त्यामुळे, प्रशासनातील भ्रष्टाचार हा काही केल्या थांबत नसल्याचे समोर आले असून, नागरिकांमधून याबाबत तीव्र संताप व्यक्त होत आहे. आता नाशिकमध्ये अडीच लाख रुपयांची लाच घेतांना सिन्नरचे नायब तहसीलदार संजय धनगर एसीबीच्या जाळ्यात अडकले आहेत. जमिनीचा अनुकूल निकाल लावून देण्याच्या बदल्यात तहसीलदाराने तक्रारदाराकडे तब्बल १० लाख रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. अखेर, तडजोडीत अडीच लाखांची लाच स्वीकारताना नाशिकच्या एसीबीने तहसीलदार संजय धनगर यांना रंगेहाथ पकडले.

## वे|ध|क

### ‘लाडकी बहीण योजनेत भ्रष्टाचार’

**नागपूर :** लाडकी बहीण योजनेत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करत राज्याच्या महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांना राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील, काँग्रेसचे नाना पटोले आणि शिवसेनेचे भास्कर जाधव यांनी एका लक्षवेधीद्वारे घेरले होते. निवडणुकीच्या तोंडावर लाडकी बहीण योजना घोषित करून त्याचा लाभ घेतला. मोठ्या प्रमाणात बोगस लाभार्थींना पैसे दिले. यांच्याविरोधात गुन्हा का दाखल करत नाही. लाडक्या बहिणींना २१०० रूपये कधी देणार, असा सवाल करत या योजनेमध्ये आर्थिक घोटाळा झाल्याचा आरोप केला आहे.

### वाहतूक पोलिसांना बॉडी-वॉर्न कॅमेरा

**नागपूर :** महाराष्ट्रातील वाहतूक पोलीस कर्मचाऱ्यांना बॉडी-वॉर्न कॅमेरे (बीडब्ल्यूसी) बसवण्यात येणार आहेत. गोवा पोलिसांप्रमाणेच नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल फक्त असे पोलीसच चलन काढू शकतात, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी विधान परिषदेत सांगितले. वाहतूक पोलीस कर्मचाऱ्यांसाठी बॉडीवॉर्न कॅमेरे टप्प्याटप्प्याने सुरू केले जातील, ज्याची सुरुवात प्रमुख शहरांपासून होईल, असे त्यांनी सांगितले. प्रश्नोत्तराच्या तासात सत्ताधारी आणि विरोधी पक्षांच्या काही आमदारांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला फडणवीस यांनी उत्तर दिले. दरम्यान, ई-चलान देण्यासाठी खासगी फोन वापरणाऱ्यांवर मुख्यमंत्री फडणवीस यांनी आक्षेप घेतला.

### मिरची गल्लीत इमारतीला आग

**पनवेल :** पनवेल शहरातील मिरची गल्ली येथील एका अर्थवट बांधकाम स्थितीत असलेल्या इमारतीला आग लागल्याची घटना बुधवारी घडली. शहरातील मिरची गल्लीच्या प्रवेशद्वाराजवळील आर्किड क्लिनिकच्या बाजूला असलेल्या अर्थवट बांधकाम स्थितीतील इमारतीमध्ये दुपारी अचानकपणे आग लागून येथे असलेल्या गवत व प्लास्टिकने पेट घेतला. याबाबत परिसरातील जागरुक नागरिकांना माहिती मिळताच त्यांनी त्वरित येथे जाऊन आग विझवण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, काहींनी तात्काळ पनवेल अग्निशामक दलाशी संपर्क साधून माहिती दिली. त्यानुसार अग्निशामक दल घटनास्थळी दाखल होत त्यांनी आग विझवण्यासाठी प्रयत्न सुरु केले. •➤ पान ५ वर

# अलिबागची सात वर्षांची सागरकन्या

## सारा वर्तकचा ऐतिहासिक विक्रम



धरमतर ते गेटवे

३६ किमी अंतर नऊ तास ३२ मिनिटांत पार

**दिपक पाटील**

**। वाघ्रण ।**

अलिबाग तालुक्यातील फोफेरी गावची केवळ सात वर्षांच्या सारा अभिजीत वर्तक हिने इतिहास रचत धरमतर ते गेटवे ऑफ इंडिया हे तब्बल ३६ किमीचे अंतर अवघ्या ९ तास ३२ मिनिटांत यशस्वीरित्या पोहून पार केले. समुद्राच्या अथांग लाटा आणि रात्रीचा अंधार असूनही तिने न घाबरता ही सफर यशस्वी केली. खेळण्या-बागडण्याच्या वयात या आव्हानात्मक समुद्री मार्गावर पोहणारी सर्वात लहान जलतरणपटू ठरली असून, तिच्या नावावर आगळावेगळा विक्रम नोंद झाला आहे. •➤ पान ५ वर



### आईवडिलांना अश्रू अनावर

आपल्या लेकीच्या महान यशाने आईवडील वैष्णवी आणि अभिजीत वर्तक यांना आनंदाश्रु अनावर झाले. लेकीच्या कर्तृत्वाचा अभिमान व्यक्त करताना दोघेही भावूक झाल्याचे पाहावयास मिळाले. मुलीच्या धैर्य आणि चिकाटीचा क्षण प्रत्यक्ष अनुभवताना त्यांचे डोळे पाणावले.

### ऑलिम्पिकमध्ये देशाचे प्रतिनिधीत्व करायचेय!

आतापर्यंत साराने तालुका, जिल्हा, राज्य तसेच आंतराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन पदके मिळविली आहेत. २०२४ मध्ये महाराष्ट्राच्या संघातून भारताचे प्रतिनिधीत्व करताना तीन रौप्य आणि दोन कांस्यपदकांची कमाई केली आहे. साराला ऑलिम्पिक, तसेच आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भारताचे प्रतिनिधीत्व करुन पदक पटकवायचे स्वप्न तिने उराशी बाळगले आहे.


# दळवींच्या ‘त्या’ व्हिडिओची सखोल चौकशी करा

## शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

शिंदे गटाचे आ. महेंद्र दळवी यांचा पैशांच्या गठ्ठ्यांसोबतचा व्हिडिओ संपूर्ण महाराष्ट्राने पाहिला आहे. आज अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. शेतकरी कर्जमाफी, लाडक्या बहिणींच्या योजना, नुकसान भरपाई, महिलांवरील वाढते अत्याचार, असे अनेक विषय महत्त्वाचे आहेत. रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे अनेकांना जीव गमवावा लागला आहे. अनेकांना अपंगत्व आले आहे. मात्र, सत्ताधारी आमदार या सर्वांकडे दुर्लक्ष करुन भ्रष्टाचार करण्यात गुंतले आहेत. दळवींच्या व्हायरल झालेल्या व्हिडिओची केंद्र आणि राज्य शासनाने सीबीआय, ईडी आणि अँटी करप्शन ब्युरोकडून सखोल चौकशी करावी, अशी मागणी शेकापच्या प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी केली आहे. याबाबतची माहिती त्यांनी बुधवारी (दि.१०) दिली.

महेंद्र दळवी यांच्यासमोर नोटांचे बंडल असल्याचा व्हिडिओ नुकताच ताजा असताना आता शिंदे सेनेतील मंत्री आ. भरत गोगावले यांच्या नोटांसोबतचा व्हिडिओ व्हायरल होत आहे. त्यामध्ये मंत्री भरत गोगवले मोठ्या रकमेसह दिसत आहेत. मंत्री गोगावले यांच्यासमोर मोठ्या प्रमाणात नोटांचे बंडल असल्याचे या व्हिडिओमध्ये दिसत आहे. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्राचं राजकारण तापलं आहे. सुनील तटकरे हेदेखील गेल्या काही दिवसांपासून •➤ पान ५ वर



### शिंदे गटाच्या अडचणीत वाढ?

ऐन अधिवेशन काळात हा व्हिडिओ समोर आल्याने येत्या काळात मंत्री भरत गोगावले यांच्यासमोरील अडचणी वाढणार आहेत. दोन दिवसांपूर्वीच ठाकरे सेनेचे माजी आमदार अंबादास दानवे यांनी शिंदे सेनेचे आमदार महेंद्र दळवी यांच्यासमोर नोटांचे बंडल असल्याचा व्हिडिओ व्हायरल केला होता. या व्हिडिओनंतर सत्ताधारी व विरोधी पक्षामध्ये आरोप-प्रत्यारोप सुरु असतानाच, आता पुन्हा एक व्हिडिओ समोर आला आहे. त्यामुळे राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. ऐन हिवाळी अधिवेशनाच्या काळातच शिंदे सेनेच्या आमदारापाठोपाठ आता मंत्री भरत गोगावले अडचणीत आले आहेत. शेतकरी कामगार पक्षाच्या राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी या व्हिडिओंची चौकशी करून सत्य जनतेसमोर आणावे, अशी मागणी केली आहे. यावेळी चित्रलेखा पाटील यांनी केंद्र आणि राज्य शासनाने सीबीआय, ईडी आणि अँटी करप्शन ब्युरोकडून या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची विनंती थेट मुख्यमंत्र्यांना केली आहे.

### अनेक कामे अपूर्ण

अलिबाग, रोहा तसेच मुरुड तालुक्यातील अनेक विकासकामे अपूर्ण आहेत. कंत्राटदार आमदाराच्या कमिशनमुळे दबले असल्याचे दबक्या आवाजात बोलत आहेत. निधी नाही म्हणून कामे रखडली असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात येते, मग आमदारांकडे इतकी रक्कम येतेच कशी? हा व्हिडिओ खरा आहे की खोटा, याबाबत सखोल चौकशी होणे गरजेचे आहे, असे मत चित्रलेखा पाटील यांनी व्यक्त केले. तसचे दळवींच्या संपत्तीची चौकशी व्हायला हवी, अशी मागणी करत हे कधी थांबणार, असा सवाल त्यांनी माध्यमांच्या माध्यमातून मुख्यमंत्र्यांना विचारला आहे. त्याचवेळी मुरुड नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांचीही चौकशी करण्याची मागणीही केली आहे.

# भरलेला टोल परत मिळणार!

- **आता इलेक्ट्रिक वाहनांना टोलमाफी**
- **राज्य सरकारचा महत्त्वपूर्ण निर्णय**

**। नागपूर । प्रतिनिधी ।**

राज्यभरातील इलेक्ट्रिक वाहनांना आतापर्यंत टोल भरावा लागत होता. मात्र, आता इलेक्ट्रिक भरलेला आतापर्यंतचा टोल त्यांना परत मिळणार आहे. त्याचबरोबर त्यांना महाराष्ट्रातील कोणत्याही एक्स्प्रेसवेवर टोल न घेण्याच्या सूचना राज्य सरकारकडून देण्यात आल्या आहेत.





सध्या हिवाळी अधिवेशन सुरु असून, बुधवारी (दि. १०) या अधिवेशनात इलेक्ट्रिक वाहनांवरील टोलसंदर्भात चर्चा झाली. यावेळी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी राज्यातील सर्व इलेक्ट्रिक वाहनांसाठी (ई-वाहने) टोलमाफी आठ दिवसांच्या आत लागू करण्याचे निर्देश जारी केले आहेत. तसेच टोलमाफीनंतर वसूल केलेला कोणताही टोल वाहन मालकांना परत करावा, असेही त्यांनी म्हटले आहे.

इलेक्ट्रिक वाहनांकडून टोल घेणे बेकायदेशीरराज्यभरातील सर्व इलेक्ट्रिक वाहनांना एक्स्प्रेस वे अन् इन हायवेवर टोलमाफी देण्यात आली आहे. त्यामुळे शासनाच्या निर्णयानंतरही इलेक्ट्रिक वाहनांकडून टोल घेणे बेकायदेशीर असणार आहे. त्याचबरोबर इलेक्ट्रिक वाहनांचा वाढता वापर लक्षात घेता राज्यभरात चार्जिंग स्टेशनची संख्या वाढवावी. याव्यतिरिक्त, ई-वाहन चालकांना सुविधा देण्यासाठी विद्यमान स्टेशनची क्षमता वाढवावी, असे राहुल नार्वेकर यांनी सांगितले. दरम्यान, अधिवेशनात इलेक्ट्रिक वाहनांवरील टोल माफीचा प्रश्न आमदार शंकर जगताप यांनी उपस्थित केला होता. यावर उत्तर देताना राहुल नार्वेकर म्हणाले की, राज्य सरकारने ई-वाहनांसाठी टोलमाफी जाहीर केली आहे. त्यामुळे आठ दिवसांच्या आत टोल वसूल न करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात यावेत. तसेच राज्यभरात चार्जिंग स्टेशनची संख्या वाढवण्याची आणि ई-वाहन चालकांना सुविधा देण्याबाबतही त्यांनी सूचना जारी केल्या आहेत. टोलमाफीवर मंत्री दादा भुसे यांनी, तांत्रिक कारणांमुळे ईव्हीची टोलमाफी अंमलबजावणी तीन महिन्यांनी लांबली आहे. मात्र, लवकरच या प्रणालीमध्ये आवश्यक सुधारणा केल्या जाणार असल्याचे स्पष्ट केले.

# राज्यात भीक मागण्यास बंदी येणार



**। नागपूर । प्रतिनिधी ।**

राज्यात आता लवकरच भीक मागण्यास बंदी घालण्यात येणार आहे. विधानसभेपाठोपाठ आता विधान परिषदेमध्येही महाराष्ट्र भीक मागण्यास प्रतिबंध विधेयक मंजूर करण्यात आलं. परंतु सभागृहातील अनेक सदस्य असमाधानी असताना गोंधळाच्या स्थितीत हे विधेयक मंजूर करण्यात आलं. त्यामुळे तालिका सभापती नीलम गोऱ्हे, शिवसेनेच्या आमदार मनिषा कायंदे, राष्ट्रवादीचे अमोल मिटकरा यांच्यासह अनेकांनी नाराजी व्यक्त केली. विधान परिषदेत हे विधेयक मंजूर झाल्यानंतर आता सभापतींच्या दालनात शनिवारी बैठकीचं आयोजन करण्यात आलं आहे.

राज्यात भीक मागण्यास प्रतिबंध घालणारे विधेयक हे गोंधळाच्या स्थितीत विधान परिषदेत मंजूर करण्यात आलं. राज्याच्या मंत्री अदिती तटकरेंनी हे विधेयक मांडलं. त्यावर आमदार मनीषा कायंदे, अमोल मिटकरी आणि तालिका सभापती निलम गोऱ्हे यांनी असमाधान व्यक्त केलं. महारोगी शब्द वगळण्यासाठी आलेल्या विधेयकाचा आणि त्याचे शीर्षक यात •➤ पान ५ वर

# बिबट्या पुन्हा दिसलाच नाही

**। रायगड । प्रतिनिधी ।**

तो आला, त्यानं पाहिलं, दहशत माजवली आणि तो गेला... हा संपूर्ण प्रकार अलिबागचा वनविभाग आणि पोलीस पाहात होते. बिबट्या समोर दिसतो आहे. अशावेळी वन विभागाकडे त्या दहशत माजविणाऱ्या बिबट्याला पकडून नैसर्गिक अधिवासात सोडण्यासाठी लागणारी यंत्रणा नव्हती, हे विशेष. संपूर्ण दिवसभर बिबट्याने नागावमधील परिसरात मुक्तसंचार केला. बिबट्याला पकडण्यासाठीची यंत्रणा आली खरी; पण तोपर्यंत अंधार पडू लागल्याने बिबट्याने स्वतःसाठी सुरक्षित जागा शोधली आणि गायब झाला. पोलीस प्रशासन आणि वन विभाग यांचे बिबट्याला पकडण्याचे प्रयत्न फेल गेल्याने नागाव ग्रामस्थांमध्ये •➤ पान ५ वर

> नागावमध्ये बिबट्या आल्याची माहिती मिळताच पोलिसांच्या मदतीने वन विभागाने बिबट्याला शोधण्याची मोहीम हाती घेतली. बिबट्याला पकडण्यासाठीची टीम बोलावण्यात आली होती. बिबट्या लोकवस्तीत असल्याने त्याला पकडण्यासाठीची योग्य संधी आणि जागा सापडत नव्हती. अशा परिस्थितीमध्ये अंधार पडल्यानंतरदेखील शोधमोहीम सुरु ठेवण्यात आली आहे. बिबट्या दिसल्याची बुधवारी चर्चा ऐकू येत होती; परंतु ठोस पुरावे सापडत नव्हते. यामुळे शोधमोहीम सुरु ठेवली आहे. बिबट्या हा वन्यप्राणी असल्याने तो त्याच्या नैसर्गिक अधिवासात गेला असल्याची शक्यता आहे. असे असले तरी बिबट्याची शोधमोहीम सुरु ठेवणार आहोत.
>
> – राहुल पाटील, उपवनसंरक्षक, अलिबाग-रायगड

# विमानतळाला दि.बां.चे नाव द्या

## खासदारांची संसद भवनाबाहेर निदर्शने

**। उरण । प्रतिनिधी ।**

राजधानी दिल्लीतील संसद भवनाच्या आवारातच महाराष्ट्राच्या भूमीपुत्रांचा प्रचंड रोष उसळला आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला राष्ट्रीय नेते स्व. दि.बा. पाटील साहेबांचे नाव देण्यात यावे या ठाम, निर्विवाद मागणीसाठी बुधवारी (दि.१०) निदर्शने करण्यात आली. महाराष्ट्रातील खासदारांनी एकत्रितपणे दिल्लीच्या दारात उभे राहून केंद्र सरकारसमोर हा प्रश्न भक्कमपणे उभा केला.

या आंदोलनात खासदार सुरेश म्हात्रे (बाळू मामा), खासदार सुप्रियाताई सुळे, खासदार दिना बामा पाटील यांच्यासह महाराष्ट्राचे अनेक खासदार ठामपणे उभे राहिले. भूमीपुत्रांच्या हक्कासाठी लढताना हे सर्व खासदार एकाच आवाजात, एकाच भूमिकेत, एकाच निर्धाराने केंद्र सरकारला संदेश देत होते. ‘‘दि.बा. पाटील यांचे नाव देणे हा उपकार नाही, हा आमचा हक्क आहे!’’ असेही यावेळी सरकारला ठणकावून सांगण्यात आले.

उरण, पनवेल, नवी मुंबई परिसरातील हजारो कुटुंबांनी विमानतळासाठी दिलेल्या जमिनी, गमावलेली घरे-गावे, मोडलेल्या संसाराची कथा •➤ पान ५ वर



### गगनभेदी घोषणांनी परिसर दणाणला

‘दि.बा. पाटील साहेबांचा सन्मान अबाधित ठेवा!’, ‘भूमीपुत्रांचा अपमान सहन करणार नाही!’ या घोषणांनी वातावरण क्षणभर ढवळून निघाले आणि दिल्लीने स्पष्टपणे हा रोष, हा आक्रोश आणि हा निर्धार ऐकला.

# ध्वजदिनी निधी संकलन हे मोठे देशकार्य

## जिल्हाधिकारी किशन जावळेंचे प्रतिपादन



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

देशाच्या सीमेचे रक्षण करण्यासाठी सैनिक कायम कार्यरत असतात. या सैनिकांच्या मदतीसाठी ध्वज दिन निधी संकलन करणे हे एक मोठे देशकार्य आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी किशन जावळेंनी केले आहे. हे देशकार्य जास्तीत जास्त जनतेपर्यंत पोहोचून सैनिकांसाठी भरघोस निधी जमा करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी जावळे यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालययातील राजस्व सभागृह येथे बुधवारी जिल्हाधिकारी जावळे यांच्या अध्यक्षतेखाली ध्वजदिन निधी संकलन शुभारंभ-२०२५ करण्यात आला. कार्यक्रमाची •➤ पान ५ वर

### नागपूरचा पारा घसरला

**नागपूर :** उपराजधानी नागपूरमध्ये थंडीचा पारा बुधवारी (दि.१०) ८ अंश सेल्सिअसपर्यंत खाली घसरल्याने वातावरणात गारठा निर्माण झाला आहे. कडाक्याची थंडी, बोचरे वारे वाहत असल्याने राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनासाठी आलेल्या पाहुण्यांना आरोग्याच्या तक्रारींचा सामना करावा लागत आहे. तर, दुसरीकडे हिवाळी अधिवेशनात राजकीय वातावरण तापले आहे. गेल्या काही दिवसांपासून संपूर्ण विदर्भ कडाक्याच्या थंड लाटेत आहे. शनिवारी सकाळी नागपूरने ९.६ अंश सेल्सिअस तापमान अनुभवले. यानंतर सोमवारी पारा ८.५ अंशावर आला. प्रादेशिक हवामान केंद्रानुसार, पुढील आठवड्यात तापमानात आणखी घट होण्याची शक्यता आहे.

**कलर्स मराठीवर रोज रात्री आठ वाजता प्रेक्षकांच्या भेटीला** ‘देवेश’ची साकारतोय भूमिका

# शहापूरचा आराध्य ‘स्वामी समर्थ’ मालिकेत

**जीवन पाटील**


**। भाकरवड ।**

अलिबाग तालुक्यातील शहाबाज गावचा सुपुत्र बालकलाकार आराध्य समीर पाटील याने श्री स्वामी समर्थ मालिकेमध्ये झळकणार आहे. ही मालिका कलर्स मराठीवर रोज रात्री आठ वाजता प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. आराध्यने या मालिकेत ‘देवेश’ची भूमिका साकारली आहे. आराध्य हा कोएसो ना.ना. पाटील हायस्कूल, पोयनाडचा विद्यार्थी आहे.

आराध्यने आतापर्यंत एकपात्री राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये तीन वर्षांत जवळजवळ प्रथम व द्वितीय क्रमांकाची ३० बक्षिसे पटकावली असून, राज्यस्तरीय बालनाट्य स्पर्धेत खारेपाटातील राज्य शासनाचा उत्कृष्ट बाल अभिनेता हा पुरस्कार प्राप्त करणारा पहिला बालकलाकार म्हणून तो नावारूपाला आला आहे.

आराध्य हा सचिन धुमाळ म्युझिकल अकॅडमीकडून रायगड जिल्ह्यातील १६ शाळांमध्ये झालेल्या विनामूल्य बासरी वादन कार्यक्रमातसुद्धा सहभाग घेऊन त्याने योगदान दिले आहे. शैक्षणिक क्षेत्रात शाळेंतर्गत होणाऱ्या तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय वक्तृत्व व गायन स्पर्धेत दरवर्षी प्रथम क्रमांक प्राप्त, इयत्ता पाचवी स्कॉलरशिपमध्ये रायगड जिल्ह्यात गुणवत्ता यादीत अकरावा, तर अलिबाग तालुक्यातून मराठी माध्यमातून प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे. आराध्य हा उत्कृष्ट बासरी, माऊथ ऑर्गन, आदी वाद्यांमध्येसुद्धा आराध्य प्राविण्य आहे. •➤ पान ५ वर





### कौतुकाचा वर्षाव

आराध्य पाटील हा अलिबाग शहाबाजमध्ये राहणारा तरुण असून, त्याची ही पहिलीच मालिका आहे. मुळात, पहिली मालिका आणि मोठा ट्रॅक स्वामींच्या सीरियलमध्ये मिळाल्यामुळे आनंद खूपच झाला आणि त्यात आपल्या पेण तालुक्यातील शिर्की येथील सिनेकलाकार अर्चना पाटील जिने आत्तापर्यंत ४५ सीरियल क्रॉस केल्या, तिच्यासोबत काम करायला मिळाले याचाही आनंद झाला असे, मत आराध्यने सांगितले. या सर्वांचे श्रेय आराध्य आपल्या गुरुजनांना, आई-वडिलांना देत आहे.

# पार्थ पवारांचे नाव का नाही?

## न्यायालयाचा थेट सवाल

**। पुणे । प्रतिनिधी ।**

शहरातील मुंढवा ४० एकर जमीन घोटाळ्याप्रकरणी दाखल एफआयआरमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या मुलाचे नाव का नाही, असा थेट सवाल मुंबई उच्च न्यायालयाने विचारला आहे. त्यामुळे आता गेल्या महिनाभरापासून सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया आणि राजकीय विरोधकांकडून राज्य सरकार तसेच पोलिसांना जो प्रश्न विचारला जात होता, तोच प्रश्न आता चक्क उच्च न्यायालयाने राज्य सरकारला विचारला आहे.

दरम्यान, पोलिसांनी यावर भूमिका मांडली असली तरी पार्थ पवार यांच्या नावाचा मुद्दा पुन्हा समोर आला आहे.

मुंढव्यातील ४० एकर जमीन घोटाळा प्रकरणातील आरोपी शीतल तेजवानीला पुणे पोलिसांनी अटक केली आहे. या प्रकरणात शीतल तेजवानी मुख्य आरोपी असून, तिची चौकशीदेखील करण्यात आली होती. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ पवार यांच्या कंपनीसाठी ही जमीन खरेदी करण्यात आली होती. त्यामध्ये, प्रकरणातील तपासाचा वेग वाढवल्यानंतर पोलिसांनी मुख्य सुत्रधार म्हणून शीतल तेजवाणीची दोन वेळा चौकशी केली होती. चौकशीत तिचा थेट सहभाग असल्याचे स्पष्ट झाल्यावर अखेर अटकेची कारवाई करण्यात आली. त्यानंतर, तिने जामीनासाठी हायकोर्टात धाव घेतली आहे.

मुंबई उच्च न्यायालयात मुंढवा जमीनप्रकरणी सुरू •➤ पान ५ वर

# राज्यातील त्रिभाषा धोरणाविरोधात आक्षेप

**मुंबई :** राज्यात प्रस्तावित त्रिभाषा धोरणाविरोधात शिक्षणतज्ज्ञ, बालमानसशास्त्रज्ञ, अभ्यासक्रम रचनाकार आणि शिक्षकांनी एकमुखी आक्षेप नोंदवला असून, इयत्ता पाचवीपूर्वी तीन भाषा सक्ती राबविण्याचा प्रस्ताव हा अशास्त्रीय, विसंगत आणि मुलांच्या भाषा-विकासाला हानिकारक असल्याचा ठाम निष्कर्ष त्यांनी मांडला आहे. या संदर्भात प.बा. सामंत शिक्षणसमृद्धी प्रयासचे गिरीश सामंत आणि गोरेगाव येथील दि शिक्षण मंडळ, संस्थेच्या शलाका देशमुख यांनी यासंदर्भात शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांच्या लिखित मतांचे एकत्रीकरण करुन डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखालील त्रिभाषा धोरण निश्चितीसाठी समितीकडे निवेदन दिले. •➤ पान ५ वर

# महापालिका निवडणुकीला जास्त झटेन : नाईक

| उरण | प्रतिनिधी |

लोकसभा, विधानसभा निवडणुकीत जितका झटलो नाही, तितका महापालिका निवडणुकांना झटेन असे वक्तव्य वनमंत्री गणेश नाईक यांनी नवी मुंबईत बोलताना केले. नवी मुंबईत प्रभाग बदलामुळे माजी नगरसेवकांवर निर्माण झालेल्या निराशेवर धीर देत त्यांचे मनोबल वाढवण्याचा प्रयत्न नाईक यांनी यावेळी केला.

नवी मुंबईतील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. नाईक आणि शिंदे यांच्या संघर्ष देखीलपाहायलामिळाला.नवीमुंबई महापालिकेवर भाजपचा महापौर बसणार असे वक्तव्य गणेश नाईक यांनी केले आहे. त्यामुळे नवीमुंबई महापालिका निवडणुकीत चुरशीची लढत पाहायला मिळण्याची चिन्हे आहेत. नवी मुंबई महापालिकेच्या आगामी निवडणुकांसाठी गणेश नाईक सक्रीय झाले असून त्यांनी महापालिका निवडणुकीची रणनीती आखण्यावर भर दिला आहे. गणेश नाईक यांच्या या पुढाकारामुळे पक्षातील एकजूट वाढली आहे आणि कार्यकर्त्यांचा उत्साह शिगेला पोहोचल्याचे दिसत आहे.

वनमंत्री गणेश नाईक यांनी सर्व माजी नगरसेवकांना सांगितले की, तुम्ही जिथे उभे राहाल, तिथल्या जनता तुम्हाला नेतृत्व देईल. त्यासाठी मी गल्ली-गल्लीत फिरेल, महापालिकेत जास्त झटेन. तन-मनाने आणि आवश्यकतेनुसार जे काही करता येईल, ते मी पूर्ण करेल. प्रभाग पुनर्रचनेमुळे अनेक माजी नगरसेवकांना नाराजी होती. परंतु नाईक यांच्या या भेटीने त्यांच्यात आत्मविश्वास परत आला आहे.

## आरोग्य सचिवांची आरोग्य केंद्राला भेट

**नवीन पनवेल** : प्राथमिक आरोग्य केंद्र अजिवली येथे इ. रविंद्रन, सार्वजनिक आरोग्य सचिव, महाराष्ट्र राज्य, डॉ. अशोक नांदापूरकर, उपसंचालक संचालक, परिमंडळ ठाणे विभाग, डॉ. आनंद गोसावी, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र अजिवली येथे भेट देऊन प्राथमिक आरोग्य केंद्र अजिवली येथील इमारतीची पाहणी केली तसेच आरोग्य विषयक कार्यक्रमांचा आढावा घेतला. बाह्य रुग्ण विभागात उपस्थित रुग्णांची सुसंवाद साधून त्यांना प्राथमिक आरोग्य केंद्रात मिळणाऱ्या आरोग्य सुविधांबद्दल, तसेच आयुष्यमान भारत गोल्डन कार्डबद्दल विचारणा केली. त्यांच्यासमवेत डॉ. अपर्णा खेडेकर, तालुका आरोग्य अधिकारी, डॉ. सायली मानकर, वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र अजिवली आदी उपस्थित होते.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीद्वारे कळवण्यात येते की, आमचे आशील १) गणेश दत्तू घरत २) रमेश दत्तू घरत ३) नरेश दत्तू घरत रा. कोन, आजिवली, पनवेल, रायगड यांनी खालील वर्णनाची अनु. क्र. १ मध्ये नमूद केलेली जमीन मिळकत त्या मिळकतींचे मालक पराग शरद दातार आणि खालील वर्णनाची अनु. क्र. २ मध्ये नमूद केलेली जमीन मिळकत त्या मिळकतींचे मालक १) पराग शरद दातार २) मनीषा पराग दातार उर्फ मनीषा भगवान विसाळ यांचेकडून कायम विकत घेण्याचे ठरविले असून त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे-अरवंद, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकतीचे वर्णन**

| अनु.क्र. | सर्वे नं. | हिस्सा नं | एकूण क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार रुपये/पैसे |
|---|---|---|---|---|
| १. | ८ | १० | ०.२९.४० | ४.४५ |
| २. | ८ | ११ | ०.०८.७० | १.२० |

या मिळकतींशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हाला ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसात लेखी पुराव्यासह कळवावे, वरील मुदतीत कोणत्याही प्रमाणे हरकत न घेतल्यास वरील मिळकतींशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे आशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक १०/१२/२०२५

अधिवक्ता
**ॲड. सौ. शुभांगी आनंद साळवी**
पत्ता- सरमोकादम बंगलो, गाळा नं. २
दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर,
ता. कर्जत, जि. रायगड, ४१०२०१
मो.नं. ९९६७८३४६१८/७७९६२०७३८०

### जाहीर सुचना

सर्व संबंधितांना याद्वारे कळिवण्यात येते की, मौजे मुशेत ता. अलिबाग, जि. रायगड येथील खाली नमुद वर्णनाच्या जमिन मिळकती, श्री. दिगंबर दयाराम कातुर्डे, राहणार वात्सल्य बंगला, श्रीबाग, ता. अलिबाग, जि. रायगड व श्री. महेश दयाराम कातुर्डे, राहणार ब्लॉक नं. १०६, श्री ओमकार दत्त, दत्त मंदिरा जवळ, झिराळ आळी, पेण, ता. पेण, जि. रायगड यांच्या सामाईक मालकीच्या असून, सदर मिळकतींच्या विद्यमान मालकांकडून माझे अशिलांनी सदर मिळकती कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला स्वाक्षरित झाला आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर ) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|---|
| मुशेत, ता. अलिबाग. | ८४ | ०-२२-५०<br>पो.ख. ०-०१-३०<br>एकूण ०-२३-८० | २-१२ |
| मुशेत, ता. अलिबाग. | ८३/२ | ०-०३-३०<br>पो.ख. ०-००-२०<br>एकूण ०-०३-५० | ०-३० |

सदर जमिन मिळकती पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतींच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीत अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून पंधरा (१५) दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : १०/१२/२०२५.

सही/-
**(ॲड. सतिश शंकर पाटील )**
ऑफीस १०४ डी विंग, क्लिफ हेवन सोसायटी,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड -४०२ २०१.
खरेदीदाराचे वकील
मो.नं. ९८८१८५७५२९

### जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, आमच्या अशिलांच्या निर्देशांतर्गतखालील अनुसूचीमध्ये विवरणीत मालमत्तेसंदर्भात, त्यातील सर्व अनुषंगिक हक्कांसहित आम्ही **श्री.वासुदेव परमानंद प्रभुखानोलकर,** त्यांचा पत्ता कृष्णकुंज अपार्टमेंट, प्लॉट क्र. १६, जयप्रकाश रोड नं. ३, गोरेगाव (पूर्व), मुंबई - ४०००६३
यांचे हक्क, अधिकार व हितसंबंधांची चौकशी करीत आहोत. कोणीही व्यक्ती वा संस्था यांचा सदर मालमत्तेसंदर्भात कोणत्याही स्वरूपातील कोणताही दावा, हक्क, अधिकार, लाभ, मागणी, हितसंबंध व/वा प्रभार असल्याचा दावा असल्यास व/वा कोणताही भार व /वा विक्री, अभिहस्तांकन, अभिहस्तांतरण, हस्तांतरण, विभाजन, विमोजन, परित्याग, गहाण, प्रभार, दावा, भेट, कुटुंब व्यवस्था, सामंजस्य करार, भागीदारी, हमी, सुविधाधिकार (हक्क मार्गासहित), कर्जे, आगाऊ रकमा, न्यास, हक्क दस्तावेज जमा करणे, विकास हक्क, संभाव्य विकास, मृत्यूपश्चात वारसा, वहिवाट,उप-वहिवाट, उत्तराधिकार, भाडेकरार, धारणाधिकार, व्यवस्था, लाभ हितसंबंध व /वा कोणतीही जप्ती, पर्याय, करार, निश्चिती, निषेधाज्ञा वा कोणताही विचाराधीन विवाद वा कोणत्याही स्वरूपातील कोणताही करार (लेखी वा मौखिक) वा अन्य कोणताही बाबतीतील वा संयुक्त उद्यम करार वा अन्य कोणतीही जप्ती, वा कोणतेही विधि न्यायालय, न्यायाधिकरण, महसूल वा वैधानिक प्राधिकारी वा लवाद यांच्याद्वारे मंजूर कोणताही निवाडा, आदेश वा हुकूम, पूर्वक्रय अधिकार वा जुना वहिवाट हक्क वा कोणत्याही स्वरूपातील भार वा अन्य कोणत्याही स्वरूपातील दावे यामध्ये कायद्याच्या अंमलबजावणीअंतर्गत वा खालील अनुसूचीमध्ये विवरणीत मालमत्ता व/वा तिच्या कोणत्याही भागावरील अन्य स्वरूपातील दावे अंतर्भूत असतील आदी स्वरूपात कोणताही दावा असल्यास त्यांनी त्यासंदर्भात पुराव्यासहित लिखित स्वरूपात सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून १० (दहा) दिवसांच्या आत अधोहस्ताक्षरितांना सूचित करावे अन्यथा असे कोणतेही कथित दावे, हितसंबंध, भार वा मागणी ही सर्व हेतूने व दृष्टीने अधित्यागित व/वा परित्यागित समजण्यात येईल.

**वरील संदर्भित**
**अनुसूची**
**(मालमत्तांचे विवरण)**

**प्रथम :**
पुढील विवरणीत जमिनीचा सर्व तो भाग व भूखंड-गट क्र.८९ (जुना गट क्र. २२६, गाव अवास, तालुका अलिबाग व जिल्हा रायगड), मोजमापित ०-२६-१ एच. आर. पी., रु.०.५३ मूल्यावर करनिर्धारित, ३ (तीन) विहिरी व ३ (तीन) घरांसहित, अ) अवास ग्रामपंचायत घर क्र. ९३८, मोजमापित ६०० चौ. फूट, ब) आवास ग्रामपंचायत घर क्र. ९३९, मोजमापित ६०० चौ. फूट व क) अवास ग्रामपंचायत घर क्र. ८६५, मोजमापित २३८४९ चौ. फूट, गाव इंद्रपाई, तालुका व उपविभाग अलिबाग, नोंदणीकरण जिल्हा व उपजिल्हा रायगड अंतर्गत.

**द्वितीय :**
पुढील विवरणीत जमिनीचा सर्व तो भाग व भूखंड-गट क्र.९३ (जुना गट क्र.२२०, गाव आवास, तालुका अलिबाग व जिल्हा रायगड), मोजमापित ०-२२-२ एच.आर.पी. व पोट खराबा ०-०३-५ एच.आर.पी. अर्थात एकूण क्षेत्र ०-२५-७ एच.आर.पी., रु.०.८४ मूल्यावर करनिर्धारित, गाव इंद्रपाई, तालुका व उपविभाग अलिबाग, नोंदणीकरण जिल्हा व उपजिल्हा रायगड अंतर्गत.

**तृतीय :**
पुढील विवरणीत जमिनीचा सर्व तो भाग व भूखंड - गट क्र. ९४ (जुना गट क्र. २१९, गाव आवास, तालुका अलिबाग व जिल्हा रायगड), मोजमापित ०-२१-२ एच.आर.पी. व पोट खराबा ०-०२-८ एच.आर.पी. अर्थात एकूण क्षेत्र ०-२४-० एच.आर.पी., रु.०.९२ मूल्यावर करनिर्धारित,गाव इंद्रपाई, तालुका व उपविभाग अलिबाग, नोंदणीकरण जिल्हा व उपजिल्हा रायगड अंतर्गत.

दिनांक : ११ डिसेंबर, २०२५

**अधीराज हरीश**
**डी.एम.हरीश ॲन्ड कं.**
**वकील**
३०५-३०९, नीलकंठ,९८, मरीन ड्राइव्ह,
मुंबई -४००००२.
notice@dmharish.com

### पनवेल महानगरपालिका, पनवेल

ई-निविदा सूचना क्र : पमपा/सा.बां.(श.अ.)/६६२५/प्र.क्र.६४/२१२३/२०२५ दिनांक: १०/१२/२०२५

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा क्र. | ई-निविदा अंदाजपत्रकीय रक्कम रूपये | ई-निविदा किंमत रक्कम रूपये | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील खारघर-कोपरा प्लॉट-२५, सेक्टर-१५ येथील भूखंडाला संरक्षण भिंत/GABION WALL बांधणे तसेच विरंगुळा केंद्र इमारतीवर शेड उभारणे व त्या अनुषंगाने इतर कामे करणे. | PMC/PWD/ C.E./१९/ २०२५-२६ | १,०४,०४,९६४/- (GST वगळून) | १,०५,०००/- | १२ महिने |

या कामाच्या ई-निविदेबाबतची माहिती शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १२/१२/२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
**अतिरिक्त आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका, पनवेल**

### E–TENDER NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification. Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :-7000038348**<br>**Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-29/ 2025-2026.**<br>RFx e-tender for supply of manpower with two wheeler for ground patrolling of underground cable route of 220kV Timbermart-Khandeshwar I & II line for finding of any digging/ excavation/ construction activity by various utilities and providing & fixing of mute marker at 50 meters on underground cable route of 220kV Timbermart Khandeshwar I & II line under EHV Lines S/Dn. Panvel -1 under EHV O&M Division Panvel.<br>**Tender amount Rs. 11,41,126/-, EMD amount Rs. 11,411/-** |
| 2 | Online Downloading the RFx . | **10.12.2025, 18:00 Hrs. to 25.12.2025, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 25.12.2025 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **26.12.2025 at 11:00 hrs. (if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The Dy. Executive Engineer, (O): Mobile No. 9769894505.
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**(A. P. Joshi)**
**Executive Engineer**
**E.H.V.(O&M) Dn. Panvel**

### पनवेल महानगरपालिका
**शहर अभियंता विभाग**
**दरपत्रक**

जा.क्र.पमपा/बांधकाम/२४२४/ प्र.क्र.०५/४७२८/२०२५ दिनांक : १०/१२ /२०२५

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता अंदाजपत्रक तयार करण्यासाठी खालील कामासाठी दरपत्रक (Market Rate) मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | मुदत |
|---|---|---|
| १. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती -ड, प्रभाग क्र.१७ मधील अं.भु.क्र. ४१४ मध्ये बॅडमिंटन प्रशिक्षण केंद्र बांधणे. | ११/१२/२०२५ ते १७/१२/२०२५ (०७ दिवस) |

या कामाच्या दरपत्रकाबाबतची माहिती पनवेल महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर दि.११/१२/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात येईल. सदर बाबींचे बाजार भाव स्वतःच्या लेटरहेडवर महानगरपालिका कार्यालयात अथवा pmcbandhkamdept01@gmail.com व panvelcorporation@gmail.com या ई-मेलवर मुदतीत पाठविण्यात यावे ही विनंती. सदर दर हे अंदाजपत्रक तयार करण्यासाठी आहेत. याची कृपया नोंद घ्यावी.

सही/-
**कार्यकारी अभियंता**
**पनवेल महानगरपालिका**

### अभ्युदय को-ऑप. बँक लिमिटेड
**(मल्टि-स्टेट शेड्युल्ड बँक)**
लिगल ॲण्ड रिकव्हरी डिपार्टमेंट, श्रम साफल्य बिल्डिंग, ६३, जी. डी. आंबेकर मार्ग, परळ गांव, मुंबई-४०० ०१२.
दूरध्वनी क्र. ८५९१९४८७१२ / ८१६९४५२७१३, २७१९ ई-मेल : **recovery@abhyudayabank.net**

**(नियम ८ (१) अन्वये) कब्जा सूचना**

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार हे **अभ्युदय को-ऑप बँक लि.** चे प्राधिकृत अधिकारी या नात्याने दि सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (५४ सन २००२) अन्वये कलम १३ (२) सहवाचता **सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ३ अन्वये मागणी सूचना** निर्गमित करुन सूचनेमधील नमूद सदर रकमेची परतफेड करण्यात सदर सूचना प्राप्तीच्या तारखेच्या ६० दिवसांत करण्यास सांगण्यात आले आहे. सदर रकमेची परतफेड करण्यात कर्जदार असमर्थ ठरल्याने, याद्वारे कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी येथे खाली वर्णन केलेल्या मिळकतीचा **प्रतिकात्मक कब्जा** सदर ॲक्टच्या कलम १३ च्या पोटकलम (४) सहवाचता सिक्युरीटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रुल्स, २००२ च्या नियम ८ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून घेतला. तारण मत्तेच्या भरण्याकरिता उपलब्ध वेळेच्या संदर्भात ॲक्टच्या कलम १३ उप-कलम (८) च्या तरतुदींकडे कर्जदारांचे लक्ष वेधून घेतले जात आहे. विशेषतः कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेस याद्वारे इशारा देण्यात येतो की, सदर मिळकतींशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतींशी करण्यात आलेला कोणताही व्यवहार हा **अभ्युदय को-ऑप बँक लि.** भाराधीन राहील.

| कर्जदाराचे नाव | मागणी सूचनेची तारीख आणि थकबाकी रक्कम | कब्जाची तारीख | स्थावर मिळकतीचे वर्णन |
|---|---|---|---|
| **१) मे. चिंतामणी ज्वेलर्स इंडिया प्रा. लि.** (कर्जदार)<br>**२) श्री. नितीन आबासाहेब कदम,** (संचालक आणि मालक, हमीदार)<br>**३) सौ. विजयश्री नितीन कदम,** (संचालक आणि सह-मालक, हमीदार)<br>**४) श्री. देविदास दिगंबर कदम,** (संचालक आणि हमीदार) | १६.०७.२०२१ रु. ४२,२३,९९,३०२.८४ + ०१.०७.२०२१ पासून पुढील व्याज. | ०८.१२.२०२५ (प्रतिकात्मक कब्जा) | **श्री. नितीन आबासाहेब कदम आणि श्रीमती विजयश्री नितीन कदम** यांच्या मालकीची गाव अंतरात टर्फ, नीड, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील जुना सर्वे क्रमांक १३/१/ए, १३/१/बी, १४/२/बी, १४/५ आणि नवीन सर्वे क्रमांक ७०, प्लॉट क्रमांक २१ ते ४६, एकूण मोजमापित ५६७९ चौ. मीटर क्षेत्रफळ धारक अकृषिक जमिनीवर बांधलेले आणि त्यावर बांधले जाणारे बांधकाम, ते सर्व खंड आणि तुकडे. |

**दिनांक : ११.१२.२०२५**
**स्थळ : कर्जत**

स्वाक्षरी/-
**(ज्योती जे. दुराफे)**
**प्राधिकृत अधिकारी**
**अभ्युदय को-ऑप. बँक लि.**

(टीप : स्वैर भाषांतर तफावत आढळल्यास मूळ इंग्रजी ग्राह्य)

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

### जाहीर नोटीस

दिनांक : ११ डिसेंबर २०२५

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन आमचे अशिल १) अनिता संदिप कदम, २) मिनल संतोष नलावडे, ३) संतोष नलावडे यांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदती मध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे नालधे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे-आर-पॉ | आकार रु-पै. |
|---|---|---|---|---|
| प्रकाश महादु साबळे | ८ | १० | ०-१५-८० | ०-१९ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही / -
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
मो. नं. ९१५८२७७७२८
दिनांक :- ११/१२/२०२५

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसने कळविण्यात येते की, आमचे आशिल विद्यमान मालक करण बेहल व राजु कोंडीराम मोरे यांजकडून जमिन मिळकत खरेदी घेणार असून सदर मिळकतीत इतर कोणाचाही विक्री, गहाण, देवाण-घेवाण, वारसा, ताबा, खरेदीखत, बक्षीस, मृत्यूपत्र, वाटपपत्र वा इतर कोणत्याही प्रकारचा करारनामा वा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास व मिळकत विकण्यास कोणाचीही हरकत असल्यास त्याच्या पृष्ट्यर्थ सर्व कागदोपत्री पुराव्यासोबत खालील पत्यावर सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून १४ दिवसाच्या आत लेखी सुचित करणे आवश्यक आहे. जर अशा प्रकारची कोणतीही लेखी हरकत कोणीही उपस्थित केली नाही तर खालील नमुद केलेल्या मिळकतीशी कोणाचाही कसलाही हक्क व हितसंबंध नाही अथवा असल्यास तो सोडून देण्यात आला आहे असे समजण्यात येईल. प्रस्तुतची मुदतीनंतर सदर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत हरकत असल्यास ती ग्राह्य धरली जाणार नाही व आमचे अशिल सदर खालील नमुद केलेल्या मिळकतीबाबत खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे- ढोकशेत तालुका-सुधागड जिल्हा-रायगड येथील जमिन मिळकत.**

| क्र. | गट नं. | एकूण क्षेत्रफळ | आकार (रु.पै) |
|---|---|---|---|
| १ | ६११ | १-८२-३० (हे-आर) पैकी<br>०-०७-७० (हे-आर) (ला)<br>०-१२-६० (हे-आर) (पो.खा.)<br>एकूण ०-२०-३० (हे-आर) | ०-२० |

दिनांक :११.१२.२०२५
स्थळ :- खोपोली

**सौ. वैशाली सुनिल कराळे**
ॲडव्होकेट,
फ्लॅट नं.-५, वैभव-समृध्दी
काटरंग, खोपोली,
ता.खालापूर, जि-रायगड. ४१०२०३

### जाहीरनामा
**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पेण**

अनिल विठ्ठल नागोडी, — अर्जदार
रा.रामवाडी, ता.पेण, जि.रायगड

विरुद्ध

ग्रामपंचायत पेण — सामनेवाला
ता.पेण,जि.रायगड.

या जाहीर नोटीशीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांची मुलगी वैशाली अनिल नागोडी यांचा जन्म दिनांक ११/११/२०१९ रोजी मौजे रामवाडी, ता.पेण, जि.रायगड येथे झाला असून त्याच्या जन्माची नोंद नगरपरिषद पेण, ता.पेण.जि.रायगड यांचेकडे झालेली नसल्याने जन्म नोंद घालणेसाठी या कार्यालयांत अर्ज दाखल केला आहे. तरी या अर्जाची चौकशी तात्काळ करावयाची असल्याने याकामी जर अर्जदार यांच्या मुलाच्या जन्माची नोंद घालण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून पुढील १५ दिवसांत कार्यकारी दंडाधिकारी पेण यांचे कार्यालयांत समक्ष हजर राहून आपले म्हणणे मांडावे, कोणाचेही म्हणणे किंवा आक्षेप या कार्यालयांत मुदतीत प्राप्त न झाल्यास अर्जावर उपलब्ध पुरावे, कागदपत्र विचारात घेउन अर्जदार यांना उशिरा जन्म नोंद दाखला देणेबाबत पुढील कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १०/१२/२०२५ रोजी माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्यानिशी दिले.

सही/-
**(तानाजी शेजाळ)**
**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पेण**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मौजे धोकवडे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट नंबर ९११, एकूण क्षेत्र ०-२६-७० हे.आर., आकार ५.३३ रू. पै. या मिळकतीपैकी क्षेत्र ०-०७-६० हे. आर., आकार १.३३ रू. पैसे ही मिळकत, (तद्नंतर सदर जाहीर नोटीसीत ''सदर मिळकत'' असा उल्लेख केलेला आहे.) या मिळकतीचे विद्यमान मालक सखाराम शांताराम म्हात्रे रा. मु. धोकवडे, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडुन आमच्या अशिलांनी कायमस्वरूपी खरेदीखताने विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
तारीख १०/१२/२०२५

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो.,ए विंग,
रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## निवडक



### शिवकर येथे गुरुस्मरण सोहळा

**चिरनेर :** पनवेल तालुक्यातील शिवकर येथे गुरुस्मरण सोहळा ८ ते १० डिसेंबर आयोजित करण्यात आला होता. या गुरुस्मरण सोहळ्यात प्रसिद्ध कीर्तनकार कृष्ण चौरे (पंढरपूर), जगन्नाथ पाटील (आसनगाव), जयेश भाग्यवंत (श्रीमलंग गड) यांनी श्रोत्यांना आपल्या कीर्तनाद्वारे खिळवून ठेवले होते. मंगळवारी (दि. ९) रात्री जगन्नाथ पाटील (आसनगाव) यांचे हजारो श्रोत्यांसमोर कीर्तन सुरू असतानाच काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी हजेरी लावून श्रवण केले. या गुरुस्मरण सोहळ्याला महेंद्र घरत यांनी गतवर्षी ५१ हजार रुपयांची देणगी दिली होती. तर यावर्षीही त्यांनी ५१ हजार रुपयाची देणगी दिली आहे. यावेळी जगन्नाथ महाराज यांनी कीर्तनातून श्रोत्यांना संतांचा कुणी नाद करायचा नाही. एकनाथ महाराज हे प्रवाहाविरुद्ध गेले. शिव्या द्यायला आणले होते त्यांनाही आमच्या संतांनी ओव्या गायला लावले. पनवेल परिसरातील युवा वारकरी हभप निलेश महाराज ढवळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी हा भक्तिमय गुरुस्मरण सोहळा घडवून आणला. याप्रसंगी महेंद्र घरत यांचा कीर्तनकार जगन्नाथ पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. काल्याच्या कीर्तनाने गुरुस्मरण सोहळ्याची सांगता झाली.




### आईच्या किडनीमुळे मुलाला नवजीवन

**महाड :** मूत्रपिंडाच्या गंभीर आजाराशी झुंज देणाऱ्या ३३ वर्षीय तरुणाला त्याच्या आईने किडनी दान करून नवजीवन दिले आहे. मेडिकव्हर हॉस्पिटल नवी मुंबई येथे किडनी प्रत्यारोपण यशस्वीरित्या पार पडले. रुग्णाला ॲटिपिकल हेमोलाइटिक युरेमिक सिंड्रोम हा दुर्मिळ आजार झाला होता. डॉ. अमर कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली प्रगत उपचारांच्या मदतीने रुग्णाचा जीव वाचविण्यात यश आले. महाड तालुक्यातील बिरवाडी येथील सूरज पवार यांना २०२४ मध्ये त्रास सुरू झाला होता. स्थिती बिघडत गेल्याने शेवटी मूत्रपिंड प्रत्यारोपण हा एकमेव पर्याय उरला. आपल्या मुलाचे प्राण वाचावेत यासाठी त्यांची आई पुढाकार घेऊन किडनी दान करण्यासाठी पुढे आली. यशस्वी प्रत्यारोपणानंतर सध्या आई आणि मुलगा दोघांचीही प्रकृती उत्तम असून तब्येत सुधारत असल्याची माहिती तज्ज्ञ डॉक्टरांनी दिली. नेफ्रोलॉजिस्ट डॉ. अमर कुलकर्णी म्हणाले की, आधुनिक उपचार पद्धती, सातत्यपूर्ण देखरेख आणि योग्य औषधोपचारांमुळे सूरज पूर्णपणे बरा झाला आहे. प्रत्यारोपणानंतर एका वर्षाने तो पुन्हा दैनंदिन कामे, नोकरी व व्यवसाय व्यवस्थित सुरू करू लागला आहे.



### मोबाईल दिले मालकांच्या ताब्यात

**कर्जत :** चार वर्षात कर्जत हद्दीतून चोरी, गहाळ झालेले ४२ मोबाईल पोलिसांनी इतर राज्यातून कर्जत पोलिसांनी ताब्यात घेतले व त्या मालकांना ते परत दिले आहेत सुमारे १४ लाख २७ हजार रुपयाचे किंमतीचे मोबाईल त्यांच्या स्वाधीन करण्यात आले आहेत. कर्जत पोलीस ठाणे हद्दीतील चोरी, गहाळ झालेले मोबाईल सीई आय आर पोर्टलद्वारे महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, छत्तीसगड, तसेच बिहार राज्यातून कर्जत पोलिसांनी शोध घेऊन ताब्यात घेतले असून ४२ मोबाईल १४ लाख २७ हजार किंमतीचे मोबाईल बुधवारी (दि.१०) कर्जत उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल गायकवाड यांच्या हस्ते परत करण्यात आले, याप्रसंगी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप भोसले, सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल वरोटे, पोलीस उपनिरीक्षक सुशांत वरक, पोलीस हवालदार स्वप्निल येरुणकर, पोलीस हवालदार समीर भोईर, पोलीस नाईक केशव नागरगोजे, पोलीस कॉन्स्टेबल विठ्ठल गवस उपस्थित होते २८ मोबाईल तक्रारदारांना परत केले असून १४ तक्रारदार हजर नसल्याने तक्रारदार येताच त्यांना मोबाईल परत करण्यात येणार आहेत.



### हुल्लडबाज तरुणांविरोधात कारवाई

**पनवेल :** शहरातील वडाळे तलावासह व्हि. के. हायस्कुल परिसरात हुल्लडबाजी करणाऱ्या तरुणांविरोधात पनवेल शहर पोलिसांच्या विशेष पथकाने धडक कारवाई केली आहे. वडाळे तलावासह व्हि. के. हायस्कुल परिसरात अनेक तरुण दुचाकी,चार चाकी वाहने घेऊन हुल्लडबाजी करित असतात. याचा नाहक त्रास या भागातील शालेय विद्यार्थांसह परिसरातील नागरिकांना होत होता. याबाबत अनेक तक्रारी पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्याकडे विविध राजकीय पक्ष तसेच सामाजिक संघटना यांनी केल्या होत्या. या तक्रारीच्या आधारे आज वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्यासह पो. नि. अभंग व विशेष पथकाने आज या भागात धडक कारवाई करत हुल्लडबाजी करणाऱ्या तरुणांना चांगलाच धडा शिकविला. त्यामुळे त्यांची चांगलीच पळती भुई झाली. या कारवाईचे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून या पुढे सुद्धा अशा प्रकारे कारवाई सुरूच ठेवण्यात येईल, अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांनी दिली.

## रस्त्यात बंद पडणाऱ्या गाड्या

# प्रवाशांची डोकेदुखी!

### मुरूड आगाराच्या कारभाराबाबत तीव्र नाराजी; लोकप्रतिनिधीचे दुर्लक्ष



| कोर्लई | प्रतिनिधी |

राज्य परिवहन महामंडळाच्या मुरुड आगाराच्या एसटी गाड्या काही ना काही कारणाने रस्त्यावर बंद पडण्याच्या प्रकारात अनेक दिवसांपासून वाढ झाली असल्याचे दिसून येत असून एकंदरीत आगाराच्या कारभारा बाबत प्रवासी व नागरिकांतून तीव्र नाराजी व्यक्त केली जात असून कारभार सुधारणार तरी कधी? असा सवाल विचारला जात आहे. याकडे स्थानिक लोकप्रतिनिधींचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष असल्याचे बोलले जात आहे.

बुधवारी (दि.१०) मुरुड आगारातून सकाळी ६.०० वाजता सुटलेली मुरुड -भांडूप एसटी नांदगाव-दांडा येथे ब्रेकडाऊन झाल्याने सुमारे ४० प्रवाशांचा खोळंबा झाला.

४ डिसेंबर रोजी सकाळी कल्याणहून मुरुडला येणारी गाडी काशिद व बारशिव दरम्यान बंद पडली होती. याच दिवशी सकाळी मुरुडहून सकाळी साडेपाच वाजता सुटलेली मुरुड-धुळे गाडी पेण येथे इंधन (डिझेल) कमतरतेमुळे सुमारे सव्वा तास रखडल्याने प्रवासी खोळंबले होते.

अशाच प्रकारे रस्त्यावर गाड्या बंद पडण्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे प्रवासी वर्गातून नाराजीचा सूर ऐकावयास येत आहे.

> **मुरुड -भांडुप एसटीने भांडुप येथे लग्न कार्यासाठी या गाडीने सकाळी सहा वाजता मुरुड येथून प्रवास करत असता नांदगाव -दांडा येथे गाडी ब्रेकडाऊन झाल्याने माझ्यासह सुमारे चाळीस प्रवाशांचा अर्धा तास खोळंबा झाला. त्यामुळे आम्ही लग्न कार्यासाठी एक तास उशिरा पोहोचलो.**
> **-महेश मिरजणकर,** भंडार वाडा, मुरुड जंजिरा (रायगड)

> **मुंब्रा येथे वेळेत पोहोचण्यासाठी ४ डिसेंबर रोजी मुरुड सकाळी साडेपाच वाजता सुटलेल्या मुरुड -धुळे गाडीने मुरुड येथून प्रवास करत असता पेण येथे डिझेल भरण्यासाठी गाडी सव्वा तास रखडल्याने आम्ही आगार प्रमुखांना भ्रमणध्वनीवर संपर्क साधला असता येथील डिझेल पंप सात वर्षांपासून बंद असल्याचे सांगितले.वेळेत पोहोचता न आल्याने अखेर कामे होण्यात विलंब झाला.स्थानिक लोकप्रतिनिधींनी यात लक्ष पुरवून योग्य ती उपाययोजना करण्यात आदेश देण्यात यावेत.**
> **- सैबाज अरब,** मु.माझेरी,पो. राजपुरी,ता.मुरुड-जंजिरा (रायगड)

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वरिष्ठ अधिकारी वर्गाने व स्थानिक लोकप्रतिनिधींनी लक्ष पुरवून येथील प्रवासी वर्गाला एसटी सेवेची उत्तम प्रकारे सुविधा उपलब्ध करून दिलासा द्यावा, अशी मागणी जोर धरीत आहे.

## कर्जतमध्ये हवाई सफर प्रशासनाच्या आशीर्वादाने?




| नेरळ | प्रतिनिधी |

महामुंबईचा भाग बनत असलेल्या प्रदूषणमुक्त प्रदेशाचा लचका गुंतवणुकदारांनी तोडण्यास सुरुवात केली आहे.काही एकर जमीन खरेदी करणाऱ्या धनाढ्यांना आपल्या साईडवर सहज पोहचता यावे यासाठी थेट हेलिकॉप्टर राईड सुरू झाल्या आहेत. प्रशासनाच्या आशीर्वादाने अशा हवाई सफारी शक्य नाहीत. त्यामुळे उद्योगपतींच्या या हवाई सफरींना सरकारी आशीर्वाद आहेत काय? असा प्रश्न सर्वसामान्यांना पडला आहे. दरम्यान, सलग दुसऱ्या दिवशी कर्जतमध्ये हेलिकॉप्टर सफर झाली असताना प्रशासनाला माहिती नसल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि रेल्वेने मुंबई महानगर प्रदेशाचा महत्त्वाचा भाग असलेल्या कर्जतला गुंतवणुकदार यांनी आपलेसे करायला सुरुवात केली आहे. देशातील आघाडीच्या उद्योगपती यांनी कर्जतमध्ये शेकडो एकर जमिनी खरेदी केल्या आहेत. एका मोठ्या उद्योगपतींची कर्जत तालुक्यात काही हजार एकर जमीन आहे. अशा जमिनीवर गृह प्रकल्प उभारून व्हीआयपी संस्कृती आणण्याचा प्रयत्न सुरू आहे.त्यावेळी हेच गुंतवणुकदार ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी आपल्या जमिनीच्या परिसरात चक्क हेलिपॅड उभारत आहेत.असे हेलिपॅड भविष्यात कर्जत तालुक्याला मोठ्या संकटात टाकू शकतात. कर्जत तालुक्यात शासनाचा अधिकृत असा एकही हेलिपॅड नाही, मात्र खासगी कंपन्यांचे अनेक हेलिपॅड उभे राहिले आहेत. या हेलिपॅडवर कोण उतरते याची माहिती प्रशासनाला असावी अशी एक सर्वसाधारण अपेक्षा जनतेला आहे.परंतु दररोज हेलिकॉप्टर कर्जत तालुक्याच्या हवाई हद्दीत दिसून येत असल्याने हेलिकॉप्टरवारीला प्रशासनाचा आशीर्वाद आहे काय? अशी शंका उपस्थित होत आहे. प्रदुषणमुक्त आणि शून्य प्रदूषण असलेल्या तालुक्यात कॉंक्रिटचे जंगल उभे राहणार आहे. याच निसर्गरम्य तालुक्यात सलग दुसऱ्या दिवशी बड्या उद्योगपतींचे हेलिकॉप्टरमधून आगमन झाले. देशाच्या आर्थिक राजधानीमधून मुंबई येथून काही मिनिटात कर्जतमध्ये येता येत असेल तर त्यातून अनेक अनुचित प्रकारांना वाव मिळू शकतो. ही बाब प्रशासनाने काळजी म्हणून नोंद घ्यावी अशी असल्याने कर्जत तालुक्यात येणारे हेलिकॉप्टर कोणाचे? याचा शोध प्रशासन घेणार आहे काय? असा प्रश्न उपस्थित होत आहे. कशेळेत कोटक महिंद्रा कंपनीने मोठी जमीन खरेदी केली आहे.त्या ठिकाणी आठवड्यातून किमान एकदा कोटक व्हिलाच्या साईडवर हेलिकॉप्टर घेऊन येत असतात. त्याबाबत कोणतीही नोंद कर्जत महसूल विभागाकडे नसते आणि पोलिसांकडेदेखील नसते. कोटक महिंद्रा कंपनीचे बडे अधिकारी किंवा मालक यांचे हेलिकॉप्टर दुपारी कशेळे येथील जमिनीवर बांधलेल्या हेलिपॅडवर उतरले आणि दीड तासांनी हे हेलिकॉप्टर पुन्हा आकाशात झेपावले. म्हणजे त्या हेलिकॉप्टरमधून प्रवास करणारी व्यक्ती रस्ते मार्गाने मुंबई येथून कर्जत येत असल्याने त्यांची हायटेक कार कर्जत येथे पोहचण्याआधी त्यांची हवाई सफर पूर्ण झाली आहे.

### खासगी हेलिपॅड बंदची मागणी

कर्जत तालुक्यात शासनाने स्वत:चा हेलिपॅड उभारून अन्य ठिकाणी असलेले हेलिपॅड बंद करावेत जेणेकरून अशा हवाई सफरीचे माध्यमातून येणारे व्हीव्हीआयपी यांची नोंद पोलिसांकडे असेल अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे रायगड जिल्हा अध्यक्ष जितेंद्र पाटील यांनी केली आहे. तसेच प्रशासनाने मागील काही महिन्यात कर्जत तालुक्यात खासगी हेलिपॅडवर कोणकोणते व्हीआयपी हेलिकॉप्टर घेऊन आले यांचं माहिती सार्वजनिक करण्याची मागणी केली आहे.

## 'सनबर्न फेस्टिवल' रद्द करण्यासाठी आंदोलन




| उरण | प्रतिनिधी |

'सनबर्न फेस्टिवल' भारतात नेहमीच वादग्रस्त राहिलेला आहे. हाच कार्यक्रम गोव्यासह विविध ठिकाणी हद्दपार झाल्यानंतर यावर्षी मुंबईत शिवडी येथे १९ ते २१ डिसेंबर या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे.

अमली पदार्थांचे अतीसेवन, युवकांचे मृत्यू यांसाठी कुप्रसिद्ध असलेला 'सनबर्न फेस्टिवल' या कार्यक्रमाला नवी मुंबईतूनही विरोध होत आहे. नशाविरोधी संघर्ष अभियानाच्या वतीने नेरुळ रेल्वे स्थानकाबाहेर युवक आणि राष्ट्रप्रेमी नागरिकांनी आंदोलन करत विरोध केला. यावेळी आंदोलनात युवक आणि राष्ट्रप्रेमी नागरिक यांसह राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, विश्व हिंदू परिषद, भाजप, बजरंग दल, माता अमृतानंदमयी मठ-नेरुळ, सनातन संस्था, हिंदू जनजागृती समिती यांचे पदाधिकारी यांनी सहभाग घेतला. सनबर्न हटवा - देश वाचवा, भारत माता की जय, वंदे मातरम, छत्रपती शिवाजी महाराज की जय अशा घोषणा यावेळी आंदोलनात देण्यात दिल्या. आंदोलकांनी 'सनबर्न'ला विरोध करणारे फलक हातात धरले होते. यावेळी स्वाक्षरी मोहीम राबवण्यात आली. या स्वाक्षरी मोहिमेत अनेक नागरिकांनी स्वाक्षरी करून आपला विरोध दर्शवीला.

शासनाचा कर बुडवणाऱ्या आणि तरुण पिढीला नशा करायला उद्युक्त करणाऱ्या 'सनबर्न फेस्टिव्हल'ला प्रशासनाने अनुमती का दिली ? हा प्रश्न या आंदोलनात उपस्थित करण्यात आला असून 'सनबर्न फेस्टिव्हल' छत्रपती शिवरायांच्या महाराष्ट्र भूमीतून, तसेच देशातूनच कायमचा हद्दपार करावा अशी मागणी नशा विरोधी संघर्ष अभियानाने केली आहे.

### आनंदी थिटे यांचे निधन

| खांब | प्रतिनिधी |



रोहा तालुक्यातील कृषीनिष्ठ बाहे गावातील रहिवासी असणाऱ्या आनंदी गंगाराम थिटे यांचे दि.६ डिसें.रोजी राहत्या घरी वयाच्या सुमारे ९५ व्या वर्षी वृद्धापकाळाने दु:खद निधन झाले.

त्यांच्या पश्चात मुले,मुली, सुना, जावई, नातवंडे व पतवंडे असा परिवार असून त्यांचे दशक्रियाविधी १५ डिसेंबर रोजी तर अंतिम धार्मिक विधी १७ डिसेंबर रोजी राहत्या निवासस्थानी होणार असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांकडून देण्यात आली आहे.

## शेतकऱ्यांच्या न्यायासाठी तहसिलदारांना निवेदन




| पाताळगंगा | प्रतिनिधी |

शेतकरी शेती करीत असतांना अनेक समस्या निर्माण होत असतात. शेती टिकून रहावी तसेच निर्माण होत असलेल्या समस्या मार्गी लावण्यात यावी.नुकताच जयराम घोंगे उसरोली येथील शेतकऱ्याची गाभण म्हैस डॉक्टरांना संपर्क करून प्रतिसाद मिळाला नसल्यामुळे व त्यांच्या हलगर्जीपणामुळे मृत्यू झाला.

नायब तहसिलदार, गटविकास अधिकारी यांस वरद विनायक शेतकरी सामाजिक संस्था खालापूर या शेतकरी संघटनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या विविध समस्यांबाबत निवेदन देण्यात आले.यावेळी नायब तहसिलदार खालापूर यांच्या उपस्थित शेतकऱ्यांनी ई-पीक पाहणी, फार्मर आयडी, आंबा नुकसानभरपाई, भात नुकसानभरपाई, व पशुवैद्यकीय डॉक्टर अधिकाऱ्यांचा हलगर्जीपणा या समस्यांबाबत चर्चा करून निवेदन देण्यांत आले. त्याचबरोबर गटविकास अधिकारी खालापूर यांस शेतकऱ्यांना न्याय मिळावा अशी मागणी करण्यात आली.

## नव्या वर्षात मिळणार कॅशलेस उपचार

| रायगड | प्रतिनिधी |



राज्यातील आरोग्यसेवा अधिक सर्वसमावेशक करण्याच्या दिशेने पाऊल उचलत आयुष्मान भारत आणि महात्मा जोतिराव फुले योजना एकत्रित करण्यात आली असून, उपचारांची संख्या १.३५६ वरून २,३९९ इतकी वाढवण्यात आली आहे. या सुधारित योजनेत जानेवारीपासून नागरिकांना कॅशलेस उपचार मिळणार आहेत.

उपचारांची संख्या वाढविणे, उपचार दरांमध्ये सुधारणा, पेमेंट प्रक्रियेतील पारदर्शकता आणि गुणवत्तेला प्रोत्साहन देण्यासाठी प्रमाणित रुग्णालयांना १०-१५ टक्के अतिरिक्त रक्कम देण्याचे धोरण राबविण्यात आले आहे. प्रत्येक अंगीकृत रुग्णालयात योजना कक्ष (किऑस्क) अनिवार्य करण्यात आला असून आरोग्यमित्र यांच्या माध्यमातून मार्गदर्शन उपलब्ध आहे.

रुग्णांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी जिल्हा समन्वयक, क्षेत्रीय व्यवस्थापक आणि जिल्हास्तरीय अधिकारी जबाबदार राहतील. त्यांच्या संपर्क क्रमांकांची माहिती सर्व रुग्णालयांमध्ये स्पष्टपणे लावण्याचे आदेश देण्यात आले आहेत. शस्त्रक्रिया, तपासण्या, औषधे, प्रत्यारोपण साहित्य, जेवण आणि प्रवासखर्च आदी सर्व सेवा रुग्णांना कॅशलेस देणे बंधनकारक आहे. कोणतेही शुल्क आकारल्यास किंवा उपचार नाकारणे आढळल्यास रुग्णालयांवर दंड किंवा अंगीकरण रद्द करण्याची कारवाई केली जाईल.

योजनांबाबत जागरूक राहून आपले हक्क बजवावेत आणि कोणत्याही अडचणीसाठी आरोग्यमित्र, जिल्हास्तरीय अधिकारी, जिल्हाधिकारी यांच्या समिती किंवा राज्य आरोग्य हमी सोसायटीशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### अधिकाऱ्यांना दिले आदेश

रुग्णांच्या तक्रारींचे तत्काळ निवारण करण्यासाठी जिल्हा समन्वयक, क्षेत्रीय व्यवस्थापक आणि जिल्हास्तरीय अधिकारी जबाबदार राहतील. त्यांच्या संपर्क क्रमांकांची माहिती सर्व रुग्णालयांमध्ये स्पष्टपणे लावण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

### प्रवाशाला मारहाण करून लुटणारे जेरबंद

| पनवेल | वार्ताहर |

प्रवाशाला मारहाण करून लुटणाऱ्या रिक्षा चालकासह त्याच्या सहकाऱ्याना पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून रिक्षा हस्तगत केली आहे. पंकज सिंग हा आरोपी आकाश चव्हाण याच्या रिक्षातून जात असताना त्यांची रिक्षा तक्का सिग्नलजवळ आली असता आकाश चव्हाण याने पंकज सिंग याला सांगितले की, मला दुसरे भाडे आहे तरी तुम्ही इथेच उतरा व दुसरी रिक्षा पकडून जा असे सांगितल्याने पंकज सिंग याने त्याला भाडे देण्यासाठी पाकीट काढले असता आकाश चव्हाण व रिक्षात असलेले त्याचे सहकारी अविनाश पांडव, समीर बागवान, शुभम आढाव यांनी त्याच्या पाकिटातील असलेली रक्कम जबरीने चोरून पसार झाले होते.

### अलिबाग बनतोय गुंतवणूकदारांचे नवे केंद्र | रिअल इस्टेटला नवा बेंचमार्क

## ३३.५८ कोटींचा 'पेंटहाऊस बूम'

| रायगड | प्रतिनिधी |


• (संग्रहीत छायाचित्र)

तालुक्यात तब्बल ३३ कोटी ५८ लाख ४१ हजार ७७१ रुपयांचा विक्रमी व्यवहार नोंदवला गेल्याने स्थानिक रिअल इस्टेट बाजारात मोठी हलचल निर्माण झाली आहे. उपनोंदणी कार्यालय, अलिबाग येथे दस्त क्रमांक ६१४८/२०२५ अंतर्गत पाच बेडरूमचा पेंट हाऊस ८५६.३७ चौ.मी. क्षेत्रफळाचा (९२१८ चौरस फूट) चा व्यवहार नोंदवण्यात आल्याचे उपलब्ध कागदपत्रावरून दिसून येते.

अलिबाग परिसरात गेल्या काही वर्षांत जलद गतीने वाढणारी विकासकामे, मुंबई-पुण्याशी जवळीक, पर्यटन आणि सेकंड होम कल्चरमुळे जमिनींचे भाव सातत्याने वाढतच आहेत. त्यातच या व्यवहाराने अलिबाग तालुक्याच्या रिअल इस्टेट बाजाराला नवे आयाम मिळाल्याचे स्थानिक मालमत्ता तज्ज्ञांचे मत आहे.

हा भूखंड लोढा डेव्हलपर्स लिमिटेडतर्फे ऑथोराइज सिग्नेटरी बर्नार्ड सोरेस यांच्यावतीने राहुल बंडेकर, फोर्ट-मुंबई यांनी व्यवहारासाठी सादर केला. भूखंड खरेदी करणाऱ्यांमध्ये अनंता प्रायव्हेट ट्रस्ट आणि अनीवेरदा प्रायव्हेट ट्रस्ट यांचा समावेश असून दोन्ही ट्रस्टकडून वॉर्मड फीदुशियरी सर्विसेस लिमिटेडमार्फत अधिकृत प्रतिनिधी मीरा एस. अय्यर यांनी दस्ताची प्रक्रिया पूर्ण केली. मोबदला म्हणून नमूद केलेली रक्कम ३३.५८ कोटी इतकी असून यावर आधारित १ कोटी १७ लाख ५६ हजार ५०० रुपयांचे नोंदणी शुल्क आकारण्यात आले. अलिबागच्या प्रिमियम रिअल इस्टेट बाजारासाठी हा व्यवहार नवा बेंचमार्क ठरत असून उच्च-मूल्य गुंतवणुकीच्या वाढत्या कलाला अधिक चालना मिळाल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

कोस्टल कनेक्टिव्हिटी, पर्यटनवाढ, सेकंड-होम मागणी आणि मोठ्या इन्फ्रास्ट्रक्चर प्रकल्पांच्या पार्श्वभूमीवर अलिबागमध्ये आगामी काळात अशाप्रकारचे हाय-व्हॅल्यू व्यवहार आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

## जेएनपीएच्या उपाध्यक्षपदी रवीश कुमार सिंग

| चिरनेर | प्रतिनिधी |

जेएनपीएच्या उपाध्यक्षपदी रवीश कुमार सिंग यांची नियुक्ती करण्यात आली आहे.त्यांनी मंगळवारी (दि.९) पदाची सूत्रे हाती घेतली.



जेएनपीएमध्ये सामील होण्यापूर्वी त्यांनी मध्य रेल्वेमध्ये उपमुख्य ऑपरेशन्स मॅनेजर म्हणून काम केले आहे. त्यांनी रेल्वे झोनमध्ये प्रमुख ऑपरेशनल धोरणे आणि कार्यक्षमता उपक्रमांचेही नेतृत्व केले आहे.सरकारी अनुभवाव्यतिरिक्त रवीश कुमार सिंह यांनी इन्फोसिस टेक्नॉलॉजीज, स्टील अथॉरिटी ऑफ इंडिया लिमिटेड आणि एनटीपीसी लिमिटेड यासारख्या खाजगी क्षेत्रातील आघाडीच्या संस्थांमध्येही योगदान दिले आहे. जेएनपीएत विभाग प्रमुखांच्या उपस्थितीत जेएनपीएचे अध्यक्ष गौरव दयाल यांनी त्यांचे स्वागत करुन पदाची सूत्रे सोपवली. रवीश कुमार सिंग यांची नियुक्तीने बहुक्षेत्रीय कौशल्य, धोरणात्मक दृष्टिकोन आणि ऑपरेशनल कौशल्यासह कार्यक्षमता, नवोपक्रम आणि भागधारक-केंद्रित वाढीसाठी जेएनपीएची वचनबद्धता मजबूत होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# द्वेषयुक्त 'वंदे मातरम'

देशाची संसद ही लोकांच्या सध्याच्या प्रश्नांची चर्चा करण्यासाठी असते. जुन्या गोष्टी उकरून काढून नवा विद्वेष पसरवण्यासाठी नसते. पण मोदी सरकार गेल्या काही दिवसांपासून सातत्याने हेच तंत्र अवलंबलेले दिसते. पावसाळी अधिवेशनात आणीबाणीला ५० वर्षे झाल्याबद्दल चर्चा घेण्यात आली. त्या निमित्ताने नेहरु, इंदिरा, राजीव आणि काँग्रेस यांच्याबद्दल विष उगाळले गेले. हिवाळी अधिवेशनात यांनी वंदे मातरमला पकडले. वंदे मातरम हा स्वातंत्र्य चळवळीतील प्रेरणादायी मंत्र होता. तो उच्चारत हजारो लोक फासावर गेले आणि त्याहूनही कित्येक पटीने अधिक सामान्य लोक गांधीजींच्या व काँग्रेसच्या आंदोलनात सामील झाले. १८९६ च्या काँग्रेसच्याच अधिवेशनात पहिल्यांदा हे गीत गायले गेले. नंतर काँग्रेसच्या प्रत्येक अधिवेशनात ते म्हटले जात असे. १९३० मध्ये पंडित जवाहरलाल नेहरूंच्या अध्यक्षतेखाली झालेल्या काँग्रेस अधिवेशनात संपूर्ण स्वातंत्र्य मिळालेच पाहिजे असा ठराव पहिल्यांदा संमत झाला. त्याही वेळी वंदे मातरमचा जयघोष करण्यात आला. त्यामुळे वंदे मातरमला काँग्रेस वा नेहरू यांचा विरोध होता वगैरे बकवास गोष्टी टिकण्यासारख्या नाहीत. पण तरीही पूर्वापार राष्ट्रीय स्वयंसेवक संघ परिवार त्या उगाळत आलेल्या आहे. विशेष म्हणजे हे संघवाले स्वातंत्र्य चळवळीपासून कटाक्षाने दूर होते. त्यांनी कधीही गांधीजींच्या आंदोलनात भाग घेतला नाही. यांच्या शाखांमध्ये कधीही वंदे मातरम गाण्याचा आग्रह यांनी धरला नाही. आणि हेच लोक काँग्रेस, नेहरू यांना वंदे मातरम वरून देशद्रोही ठरवत आहेत. सोमवारी लोकसभेत बोलताना नरेंद्र मोदी यांनी वंदे मातरमचा गौरव करण्याऐवजी अधिक वेळ नेहरूंवर टीका करण्यात घालवला. जिनांच्या विरोधामुळे १९३७ मध्ये नेहरुंनी या गीताचा दोनच कडवी गाण्यास व उरलेली कडवी वगळण्यास मान्यता दिली व त्यामुळेच भारत व पाकिस्तान अशी दोन राष्ट्रे होण्याची बीजे पेरली गेली असा सनसनाटी आरोप त्यांनी केला.

### क्षुद्रबुध्दीचे आरोप

मोदी हे गेली दहा वर्षे पंतप्रधान आहेत. अशा माणसाची दृष्टी ही विशाल असायला हवी. इतिहासाचा विचार करताना समतोलपणे त्याकडे पाहायला हवे व तसेच बोलायला हवे. नेहरु हे काँग्रेसचे निर्विवाद लोकप्रिय नेते होते. पण आपले सिंहासन डळमळीत होईल अशा भीतीने त्यांनी १९३७ मध्ये जिनांसमोर नमते घेतले असा आरोप मोदींनी केला. वास्तविक जिनांचा पक्ष वेगळा होता. त्यांचा पाठिंबा मिळाला तरीही नेहरूंना त्याचा काँग्रेसच्या राजकारणात वा तेव्हाच्या सत्तेत उपयोग नव्हता. शिवाय नेहरु हे एकट्याने काही निर्णय घेऊ शकतील अशी स्थिती नव्हती. महात्मा गांधी हे मुख्य नेते होते. खेरीज सरदार पटेल, सुभाषचंद्र बोस, राजेंद्रप्रसाद हेही होते. यांच्याच कार्यकारिणीने रवींद्रनाथ टागोरांशी सल्लामसलत केली व वंदे मातरमची दोनच कडवी ठेवण्याचा निर्णय घेतला. वास्तविक टागोर यांनीच वंदे मातरमचे कर्ते बंकिमचंद्र यांच्यासमोर ते गीत पहिल्यांदा गायले होते. नंतर ते काँग्रेसच्या अधिवेशनातही त्यांनीच सादर केले होते. पण या गीताला नंतर जोडलेली पुढची कडवी ही देशभक्तीपेक्षाही दुसऱ्या धर्मावर विजय मिळवण्याच्या भावनेतून रचली गेली आहेत असे त्यांचे म्हणणे होते. त्यामुळे ती गाऊ नयेत असे त्यांना वाटत होते. टागोर हे स्वतः बंगाली होते, नोबेल पारितोषिक विजेते कवी होते. त्यांच्यापेक्षा नरेंद्र मोदी आणि मंडळींमध्ये अधिक समज व देशभक्ती आहे काय? अर्थातच नाही. टागोरांचा विचार घेऊनच तत्कालीन काँग्रेसने, नेहरुंनी एकट्याने नव्हे, वंदे मातरमची दोनच कडवी ठेवण्याचा निर्णय घेतला. नंतर देश स्वतंत्र झाल्यावर याला राष्ट्रगीताचा दर्जा देण्यात आला. त्यामुळे नेहरुंचा जणू वंदे मातरमलाच विरोध होता असे भासवण्याचा मोदींचा प्रयत्न पूर्णपणे खोटारडा आहे. वंदे मातरमची दोनच कडवी गाण्याच्या निर्णयामुळेच देशात फाळणीची बीजे रोवली गेली हा आरोप भयंकर म्हणावा की हास्यास्पद असा प्रश्न आहे. १९३० च्या गोलमेज परिषदांपासून मुस्लिमांच्या स्वतंत्र मतदारसंघांची व नंतर हळूच स्वतंत्र देशाची मागणी पुढे येऊ लागली होती. हिंदू व मुस्लिम यांच्यातील तेढ वाढवण्याचा प्रयत्न दोन्ही बाजूंनी चालू होता. तो रोखण्यासाठी व मुस्लिमांना काँग्रेसच्या आंदोलनात सोबत ठेवण्यासाठी काँग्रेस धडपडत होती.

### आग भडकवण्याचे धंदे

वंदे मातरमच्या उर्वरित कडव्यांमध्ये देवीदेवतांची प्रार्थना आहे व कुराणाच्या आज्ञेनुसार मुस्लिम माणूस अल्लाखेरीजकरून कोणाही विरुध्द झुकणार नाही असा पवित्रा काही अतिरेकी मुस्लिम नेत्यांनी घेतला होता. वास्तविक याच देशातील लाखो समंजस मुस्लिमांनी तो झुगारून दिला होता व ते वंदे मातरम म्हणत होते. आजही ते म्हणतात. पण वंदे मातरमची सर्व कडवी म्हणणे हा जणू काहीतरी हिंदू धर्माच्या अस्मितेचा व श्रध्देचा विषय असल्याप्रमाणे ताणणे व त्यातून विद्वेष पसरवणे हा अत्यंत घाणेरडा धंदा आहे व संघवाले तो पूर्वापार करीत आले आहेत. मोदींनी सरकारचे प्रमुख म्हणून त्याला हवा द्यावी व संसदेत उभे राहून तशाच प्रकारची आरोपबाजी व भाषणे करावीत हे दुर्दैवी आहे. दुसरे असे की, मोदींच्या परिवाराला हिंदुस्थानात फूट पडण्याचे इतके दुःख तेव्हा होते तर त्याने ती फाळणी थांबवण्यासाठी प्रयत्न करायला हवे होते. नेहरु समजा जिन्नाधार्जिणी भूमिका घेत असतील तर संघ व हिंदु महासभेने तेव्हा देशभक्त मुस्लिमांची मने जिंकून त्यांना आपल्यासोबत घ्यायला हवे होते. त्यासाठी प्रयत्न करायला हवे होते. प्रत्यक्षात हिंदू व मुस्लिम ही वेगवेगळी राष्ट्रे आहेत अशी भूमिका सावरकरांनी हिंदू महासभेच्या व्यासपीठावरून मांडली व नंतर संघाचा व्यवहारही तसाच राहिला. मुस्लिम हे आपले शत्रू आहेत असाच प्रचार झाला. त्यातूनच जिन्नांना अधिक बळ मिळाले. याहूनही कहर म्हणजे याच जिन्नांच्या मुस्लिम लीगसमवेत युती करून हिंदू महासभेने प्रांतिक सरकारे स्थापन केली होती. त्यावेळी त्यांना जिन्नांच्या हिंदूद्वेषाचा त्रास झाला नाही. आता मोदी मात्र नेहरुंवर वाटेल ते आरोप करीत आहेत. नेहरु व काँग्रेसच्या त्या भूमिकेमुळे फाळणीची बीजे रोवली गेली असा मोदींचा आरोप असेल तर आजचे भाजपचे राजकारण हिंदू व मुस्लिमांचे ऐक्य बळकट करणारे असायला हवे. प्रत्यक्षात मोदी आणि त्यांचा पक्ष दिवसरात्र मुस्लिमांविरुध्द विष उगाळत असतात. मुस्लिमांना सरसकट अतिरेकी ठरवणे, त्यांच्यावर बहिष्काराचे आवाहन करणे, जत्रा इत्यादींमध्ये त्यांच्या दुकानांवर हल्ले करणे, त्यांना घरे मिळू न देणे, दहा दहा वर्षे भाजपतर्फे एकाही मुस्लिमाला उमेदवारी न देणे, यांच्या नितेश राणे यांच्यासारख्या मंत्र्यांनी मुस्लिमांना मशिदीत घुसून मारण्याच्या धमक्या देणे, गोमांस असल्याच्या संशयावरून मुस्लिमांचे खून पाडणे असे प्रकार सर्रास चालू आहेत. खरे तर मोदींच्या भाजपचा हा व्यवहारच आणखी एका फाळणीच्या बिया पेरतो आहे. वंदे मातरमसारखे वाद निर्माण करणे हे तर आग आणखी पेटवण्यासारखे आहे.

विचार

# सूर्यप्रकाश कमी झाल्यामुळे गंभीर संकट

**जगातील २० सर्वाधिक प्रदूषित शहरांपैकी १३ शहरे भारतात आहेत. मेघालयातील बर्निहाट हे जगातील सर्वाधिक प्रदूषित तर दिल्ली सलग सहाव्या वर्षी सर्वाधिक प्रदूषित राजधानी ठरली. वातावरणातील धूळ, काजळी आणि राखेसारखे कण वाढवण्यास बांधकामस्थळे, वाहने, कारखाने आणि जैवइंधनातील धूळ हातभार लावते. त्यामुळे सूर्यप्रकाशाचे तास कमी होत असून, याचा परिणाम शेती आणि अन्य क्षेत्रांवर होत आहे.**



मिलिंद बेंडाळे

भारताच्या अनेक भागात सूर्यप्रकाश कमी होत असल्याचे एका नवीन अभ्यासातून समोर आले आहे. पश्चिम किनारा, हिमालयीन प्रदेश, दख्खन पठार आणि पूर्व किनारपट्टीवर सूर्यप्रकाशाचे तास कमी होत आहेत. दीर्घकाळचा पाऊस आणि सतत ढगाळ आकाश यामुळे असे वातावरण निमर्ण झाले, की सूर्य जणू गायब झाला आहे. पण ही केवळ एक भावना नाही, तर त्याला आकडेवारीचा आधार आहे. बनारस हिंदू विद्यापीठ (बीएचयू), पुण्यातील भारतीय उष्णकटिबंधीय हवामानशास्त्र संस्था (आयआयटीएम) आणि भारतीय हवामान विभाग (आयएमडी) सारख्या संस्थांमधील शास्त्रज्ञांनी केलेल्या एका नवीन अभ्यासातून असे दिसून आले आहे, की गेल्या तीस वर्षांमध्ये भारतातील बहुतेक भागांमध्ये सूर्यप्रकाशाचे तास झपाट्याने कमी होत आहेत. हे दाट ढग आणि वाढत्या एरोसोल प्रदूषणामुळे आहे. हे संशोधन 'नेचर'च्या अलिकडील एका अंकात प्रकाशित झाले. शास्त्रज्ञांनी १९८८ ते २०१८ पर्यंत नऊ प्रदेशांमधील वीस हवामान केंद्रांमधील सूर्यप्रकाश 'अवर डेटा' तपासला. सूर्यप्रकाश 'अवर डेटा' हा असा काळ आहे, जेव्हा सूर्यप्रकाश रेकॉर्ड करण्याइतका तीव्र असतो. निरीक्षणानुसार, सर्व प्रदेशांमध्ये वार्षिक सूर्यप्रकाशाचे तास कमी झाले आहेत. फक्त ईशान्य भारतात पावसाळ्यात काही स्थिरता दिसून आली. 'बीएचयू'चे शास्त्रज्ञ मनोज के. श्रीवास्तव यांनी नोंदवले, की पश्चिम किनाऱ्यावर दरवर्षी सरासरी ८.६ तासांनी सूर्यप्रकाशाचे तास कमी झाले. उत्तरेकडील मैदानी भागात सर्वात मोठी घट झाली. अभ्यासात आढळून आले, की ऑक्टोबर ते मे दरम्यान सूर्यप्रकाश वाढला; परंतु जून ते सप्टेंबर या काळात तो झपाट्याने कमी झाला.

सूर्यप्रकाश कमी होण्यामागील कारणांचा अभ्यास करण्यात आला, तेव्हा ढग आणि प्रदूषण यासाठी जबाबदार आहेत, असे लक्षात आले. शास्त्रज्ञांचा विश्वास आहे, की हे 'सौर मंदीकरण' (सूर्यप्रकाश कमी होणे) एरोसोल कणांमुळे होत आहे. एरोसोल म्हणजे कारखान्यांचा धूर, जळते बायोमास (लाकूड आणि कोळसा) आणि वाहन प्रदूषणातून बाहेर पडणारे लहान कण. ते लहान ढगांचे थेंब तयार करतात आणि दीर्घकाळ आकाशात लटकत राहतात. परिणामी, ढगांच्या आच्छादनात वाढ झाल्यामुळे सूर्यप्रकाश कमी होतो. या वर्षीच्या मॉन्सून हंगामात भारताच्या बहुतेक भागात, विशेषतः पश्चिम किनारा, मध्य भारत आणि दख्खन पठारावर सतत ढगाळ वातावरण होते. पाऊस पडला नाही, तरी आकाश ढगाळ होते. हा अभ्यास २०१८ पर्यंत करण्यात आला होता. धुके, आर्द्रता आणि ढगांचे स्वरूप तेवढेच आहे. वाढलेले एरोसोल ढग वातावरणात जास्त काळ टिकून राहतात. त्यामुळे जमिनीवर सूर्यप्रकाश कमी पोहोचतो. हवामानबदलाचे अंदाज सदोष आहेत. प्रदूषण आणि ढगांचे स्वरूप बदलत आहे. शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे, की हीच पद्धत सुरू राहिल्यास भारताला प्रदूषण नियंत्रण आणि ढगांचे निरीक्षण यावर अधिक लक्ष द्यावे लागेल. विकास पर्यावरण संतुलनाला कसा बिघडवत आहे, हे या अभ्यासातून दिसून येते. जास्त पाऊस चांगला असतो; परंतु जास्त ढग आणि प्रदूषण सूर्याला लपवत असते. भारताने स्वच्छ हवा, कमी केलेले एरोसोल आणि चांगले हवामान अंदाज यावर वेगवान काम केले पाहिजे. हे भारतातील वाढत्या प्रदूषण समस्येचे प्रतिबिंबित करते.

पृथ्वीवर पडणाऱ्या सूर्यप्रकाशाच्या काळाला 'सनशाईन अवर' (एसएसएच) असे म्हणतात. या काळात सूर्यप्रकाश थेट पृथ्वीवर पोहोचतो. तो दर महिन्याला बदलतो. याचा अर्थ असा, की सूर्यप्रकाशाचे प्रमाण महिन्यानुसार बदलते. जून आणि जुलैमध्ये ते कमी होते. अभ्यासातून दिसून आले, की ऑक्टोबर ते मे या कालावधीमध्ये 'एसएसएच' जास्त असते, कारण या महिन्यांमध्ये ढग कमी असतात आणि पाऊस पडत नाही. हा अभ्यास पश्चिम किनाऱ्यावरील तीन शहरांवर केंद्रित होता. ती तीन शहरे म्हणजे तिरुवनंतपुरम, गोवा आणि मुंबई. संपूर्ण पश्चिम किनाऱ्याला दरवर्षी सरासरी २,३०० तास सूर्यप्रकाश मिळत असे. २००० पासून, या प्रदेशात सूर्यप्रकाशाच्या वेळेत सातत्याने घट होत आहे. दर वर्षी सरासरी ८.६२ तास सूर्यप्रकाश कमी होत आहे. या प्रदेशात हिवाळा हा सूर्यप्रकाशाचा शिखर असतो, तर पावसाळ्याचे महिने कमी होऊ लागतात. उत्तरेकडील प्रदेशात कोलकाता, नवी दिल्ली आणि अमृतसर येथील डेटाचा अभ्यास करण्यात आला. या शहरांना दरमहा सरासरी १८७ तास सूर्यप्रकाश मिळत असे. तथापि, आता हा सूर्यप्रकाश दरवर्षी अंदाजे १३ तासांच्या दराने कमी होत आहे. ऑक्टोबर ते डिसेंबर या कालावधीमध्ये सर्वात कमी सूर्यप्रकाश दिसून येतो, तर एप्रिल ते मे या काळात सर्वाधिक सूर्यप्रकाश दिसून येतो. भारताच्या मध्यवर्ती प्रदेशांमध्ये परिस्थिती थोडी वेगळी आहे. बंगळुरू, नागपूर आणि हैदराबाद येथिल परिस्थिती थोडी वेगळी आहे.

१९८८ ते २००७ दरम्यान, सूर्यप्रकाश वाढला. तथापि, २००८ नंतर घट सुरू झाली. पूर्व मॉन्सून आणि पावसाळ्याच्या हंगामात सूर्यप्रकाश कमी होता, तर हिवाळ्यात विशिष्ट हवामान परिस्थितीमुळे सूर्यप्रकाश किंचित वाढला. मध्य भारतात दर वर्षी अंदाजे २४४९ तास सूर्यप्रकाश मिळत असे. तथापि, १९८८ ते २०१८ दरम्यान, दर वर्षी ४.७१ तासांनी सूर्यप्रकाश कमी झाला. तथापि, भारताच्या ईशान्य भागात हा ट्रेंड कमी दिसून आला. गुवाहाटी आणि दिब्रुगडमधील आकडेवारीनुसार एकूणच १९९८ ते २०१८ दरम्यान सूर्यप्रकाशाच्या वेळेत थोडीशी घट दिसून आली. दरम्यान, हिमालयीन प्रदेशात गेल्या वीस वर्षांमध्ये सूर्यप्रकाशाच्या वेळेत सातत्याने घट झाली आहे. तिथे सूर्यप्रकाश दर वर्षी अंदाजे ९.५ तासांनी कमी होत आहे. अरबी समुद्रातील मिनिकॉय बेट आणि बंगालच्या उपसागरातील पोर्ट ब्लेअर येथे गेल्या ३० वर्षांमध्ये सूर्यप्रकाशाच्या वेळेत घट झाली आहे. दर वर्षी त्याचा दर अंदाजे ५.७ ते ६.१ तासांनी कमी होत आहे. पर्यावरणातील सतत बदल आणि परिवर्तनांमुळे या अभ्यासाचे महत्त्व वाढते. अभ्यासाचे लेखक मनोजकुमार श्रीवास्तव हे बनारस हिंदू विद्यापीठातील भूभौतिकशास्त्र विभागाचे प्राध्यापक आहेत. ते स्पष्ट करतात, की सूर्यप्रकाश कमी होण्याचे मुख्य कारण म्हणजे वातावरणातील कणांमध्ये वाढ. वातावरणात एरोसोलचे प्रमाण वाढत असताना ढग अधिक दाट आणि तेजस्वी होतात. ते जास्त काळ आकाशात राहतात. यामुळे सूर्यप्रकाश रोखला जातो, परिणामी पुरेसा सूर्यप्रकाश जमिनीवर पोहोचू शकत नाही. याला 'अल्ब्रेक्ट इफेक्ट' म्हणतात.

कारखान्यांचा धूर, वाहनांचे प्रदूषण, शेतात पेंढा जाळणे, लाकूड किंवा कोळशाने स्वयंपाक करणे हवेत एरोसोलचे प्रमाण वाढवण्यास कारणीभूत ठरतात. भारत हा जगातील सर्वात वेगाने वाढणारा सौर बाजार आहे; परंतु कमी सूर्यप्रकाशामुळे वीजनिर्मिती कमी होईल. अक्षय पायाभूत सुविधांसाठी नियोजन करणे कठीण होईल. पिके सूर्यप्रकाशावर अवलंबून असतात. कमी सूर्यप्रकाशाचा पिकांच्या उत्पादनावर परिणाम होईल. सूर्यप्रकाश कमी झाल्यामुळे अनेक समस्या निर्माण होतील. थेट सूर्यप्रकाशावर अवलंबून असलेल्या क्षेत्रांवर याचा सर्वाधिक परिणाम होईल. सूर्यप्रकाशाचे तास कमी झाल्यास सौर पॅनेल कमी वीज निर्माण करतील. वीजनिर्मितीवर दहा ते वीस टक्के परिणाम होईल. यामुळे भारताच्या सौर ऊर्जा मोहिमेमध्ये अडथळे निर्माण होतील. शिवाय, कृषी क्षेत्रावर सर्वाधिक परिणाम होईल. पिकांना प्रकाश संश्लेषणासाठी पुरेसा सूर्यप्रकाश मिळणार नाही. अन्न सुरक्षेवर परिणाम होईल. वनस्पती आणि झाडांची वाढ मंदावेल. विशेषतः तांदूळ, गहू आणि कापूस यासारख्या पिकांवर परिणाम होईल. जास्त धुके आणि प्रदूषणामुळे श्वसनाचे आजार वाढतात. सूर्यप्रकाशाचा अभाव व्हिटॅमिन डीची कमतरता निर्माण करू शकतो. त्यामुळे रोगप्रतिकारक शक्तीवर परिणाम होतो. चीनमध्येही अशाच गोष्टी आढळून आल्या. १९८० आणि १९९० च्या दशकात चीनने औद्योगीकीकरणासाठी दरवाजे उघडल्यानंतर असंख्य कारखाने, वीज प्रकल्प आणि उद्योग स्थापन झाले. यामुळे चीनच्या हवेत एरोसोलचे प्रमाण लक्षणीय वाढले.

१९६० च्या दशकात बीजिंगमध्ये दरवर्षी २,६०० तास सूर्यप्रकाशाचा अनुभव आला. २००० पर्यंत ही संख्या अंदाजे २,२०० तासांपर्यंत घसरली. चीनने परिस्थितीचे गांभिर्य ओळखले. २००५ नंतर चीनने धोरणे आणि तंत्रज्ञान बदलत प्रदूषण नियंत्रणात लक्षणीय सुधारणा केली. वायू प्रदूषण प्रतिबंध आणि नियंत्रण कृती योजना, २०१३ लागू करण्यात आली. कोळशावर चालणारे वीज प्रकल्प बंद किंवा अपग्रेड करण्यात आले. चीन वायू प्रदूषण आणि हरित ऊर्जा या दोन्ही बाबतीत आघाडीवर आहे. बीजिंग आणि शांघायसारख्या शहरांमध्ये, उद्योग शहराबाहेर स्थलांतरित करण्यात आले. उल्लंघनासाठी मोठा दंड आकारण्यात आला. औद्योगिकीकरण आणि शहरीकरणामुळे ब्रिटन, जपान, अमेरिका आणि जर्मनीमध्ये सूर्यप्रकाशाच्या वेळेत घट झाली. तथापि, अलिकडच्या वर्षांमध्ये सुधारणा करण्यात आल्या आहेत. भारतात सूर्यप्रकाश आणि सूर्यप्रकाशातील ही घट आता एक गंभीर पर्यावरणीय आव्हान दर्शवते. ऊर्जा, शेती, आरोग्य आणि हवामानबदलावर त्याचा नकारात्मक परिणाम होतो. त्यामुळे हवामानातील तीव्र घटनांचा अंदाज लावणेदेखील कठीण होते. म्हणून, भारतानेही चांगल्या धोरणांचा विचार करण्याची आवश्यकता आहे.

**(लेखक निसर्ग आणि प्राणीजीवनाचे अभ्यासक असून जंगलांमध्ये अनेक प्रकारचे संशोधन करतात.)**

# धुळीमुळे आरोग्य धोक्यात



वैभव पाटील

अलिबाग-रोहा रस्त्यावर विविध ठिकाणी रस्त्यावर धुळीचे साम्राज्य पसरले आहे. रस्त्यांवरील खड्ड्यांतील धुळीमुळे नागरिकांना सहन करावा लागत आहे. तसेच या प्रदूषणामुळे आजाराचा धोका वाढला आहे. रस्त्यांवरील पडलेल्या खड्ड्यांमुळे मोठ्या प्रमाणात धूळ पसरू लागली आहे. पावसाळ्यामध्ये माती टाकून खड्डे बुजवल्याने ही धुळ परिसरात पसरू लागली आहे. तसेच, वाहतूक कोंडी होत आहे. अलिबाग - रोहा मार्गावर माती, खडी टाकून खड्डे बुजविण्याचा दिखावा करण्यात आला. रस्त्यावर तात्पुरती लावलेली मलमपट्टीदेखील उखडल्याने या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. या वाहतूक कोंडीत रस्त्यावरील खड्डे चुकवत प्रवास करणाऱ्या नागरिकांना आता धुळीचा त्रास सहन करत आहे. उखडलेल्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात धूळ उडत असल्यामुळे रस्त्यावरून मोठे वाहन गेल्यानंतर मागून जाणाऱ्या दुचाकी चालकाच्या नाका-तोंडात धूळ जाते. यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे प्रवाशांसह चालक व पादचाऱ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या या गलथान कारभारामुळे खोकला, सर्दी, घसा दुखण्यासारखे आजार वाढण्याची भिती निर्माण झाली आहे.

अलिबाग-रोहा रस्त्यांचे काम मागील चार वर्षापासून प्रलंबित आहे. या रस्त्याचे काम अपूर्ण स्थितीत आहे. पावसाळ्यात माती, खडी टाकून खड्डे बूजविण्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभामार्फत करण्यात आले. पावसाळ्यात चिखलातून प्रवास करण्याची वेळ प्रवाशांवर आली होती. अलिबाग- रोहा रस्त्यांवर वाहनांची वर्दळ आहे. या उखडलेल्या रस्त्यामुळे मोठ्या प्रमाणात धूळ उडत असून नागरिकांना खड्डे चुकवण्यासाठीही कसरत करावी लागत आहे. धुळीमुळे आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. या वर्दळीमुळे रस्त्यांवरील खडी मातीची धुळ उडत आहे. रस्त्यावर काही काळ थांबल्यास संपूर्ण धूळ अंगावर थराप्रमाणे साचत असून याच दरम्यान श्वसनातून शरीरात धूळ जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे लोकांचे आजारी होण्याचे प्रमाण देखील वाढल्याचे चित्र आहे. या धुळीचे कण अनेकांच्या नाका तोंडात जात आहे. त्यामुळे काही जण नाक दाबून तर काही जण तोंडाला कपडा बांधून प्रवास करीत आहेत. दुचाकी चालकासह तीन चाकी, चार चाकी या खासगी वाहनांसह सरकारी वाहनांमधील चालकांना आणि पादचारी प्रवाशांना या धुळीचा त्रास होत आहे. धुळीच्या प्रमाणात दुपटीने वाढ झाली आहे. या धुळीमुळे ॲलर्जी तसेच श्वसनाच्या विकाराची लागण होत असून, त्याचे दूरगामी परिणाम आरोग्यावर होत आहे. शहरातील वर्दळीच्या प्रमुख रस्त्यांची दयनीय अवस्था झाली आहे. त्यामुळे रस्त्यावरून जाणाऱ्या प्रत्येक वाहनामुळे धूळ उडताना दिसून येते. या रस्त्यांची कायमस्वरूपी दुरुस्ती न केल्यास धुळीचा प्रश्न कायम राहील. रस्त्यांवरील खड्डय़ांमध्ये मातीमिश्रीत मुरुम टाकला जात असल्यामुळे आणखीनच धुळीचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे रस्त्यांवर चष्म्याविना किंवा तोंडाला दुपट्टा न बांधता वाहन चालवणे अवघड झाले आहे. यामुळे अपघाताला एकप्रकारे निमंत्रण दिले जात आहे. धुळीमुळे वातावरण दूषित होत असून, प्रदूषित हवेमुळे मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहेत. धुळीमुळे दीर्घकालीन आरोग्याच्या समस्येने श्वसनक्रियेत अडचणी निर्माण होत असून, प्रचंड धुळीमुळे श्वसनाचे विकार वाढीस लागले आहेत. काहींना सर्दी, खोकला, घसा दुखण्याचे आजार होऊ लागले आहे. सरकारी दवाखान्यांसह खासगी दवाखान्यात या आजाराच्या उपचारासाठी रुग्णांची गर्दी होत असल्याचे चित्र आहे.

धूळ श्वासावाटे शरीरात जाते. त्यानंतर धूलिकण श्वसनात जमा होतात. हे धूलिकण श्वसनातून शरीरात, फुफ्फुसात, श्वसननलिकेत जातात. ॲलर्जीचा त्रास होणार्यांना सर्दी, खोकला, कफ होणे, धाप लागणे असे त्रास होतात, तर काहींना सर्दी, खोकला आणि घशात दुखणे असे त्रास होत आहेत. या धूलिकणाचा दीर्घकालीन परिणाम म्हणजे श्वसनाची क्षमता कमी होत जाणे होय.

या महिना अखेर ३१ डिसेंबर आहे. त्यासाठी मुंबई, पुणे, इतर राज्यातील पर्यटक मुरुड, रेवदंडा, नागाव, आक्षी या ठिकाणी नागरिकांची ये-जा सुरु होणार आहे. या पर्यटकही त्यांच्या वाहनांमुळे या मार्गावरून प्रवास करताना मातीचे कण व धुळीमुळे प्रवास करणे नकोसा होणार आहे. वारंवार मागणी करूनही या रस्त्याच्या कामाचा वेग प्रशासनाकडून वाढत नाही. या रस्त्यासाठी अनेकदा आंदोलनेदेखील केली आहेत. मात्र तरीही प्रशासन दुर्लक्ष करत असल्यामुळे नागरिकांची या जाचातून कधी सुटका होणार, असा प्रश्न त्रस्त नागरिकांनी उपस्थित केला आहे.

लोकसंसद

## बालविवाह रोखण्यासाठी समाज प्रबोधनाची गरज



ठाणे जिल्ह्यातील मुरबाड, शहापूर आणि भिवंडी या भागांमध्ये गेल्या दहा महिन्यात बालविवाहाची अनेक प्रकरणे उघडकीस आल्यामुळे बालविवाहाची समस्या पुन्हा एकदा ऐरणीवर आली आहे. सुदैवाने जिल्हा बालसंरक्षण विभाग तसेच काही स्वयंसेवी संस्थांच्या सतर्कतेमुळे हे बालविवाह रोखण्यात यश आले. या अनुषंगाने बालविवाह रोखण्यासाठी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाने १०९८ हा चाईल्ड हेल्पलाईन क्रमांक जारी केला आहे. सद्या देशात मुलीच्या लग्नासाठी हिंदू विवाह कायदा १९५५, विशेष विवाह कायदा १९५४ आणि बालविवाह प्रतिबंध कायदा २००६ या प्रचलित कायद्यांमधील तरतुदींनुसार किमान १८ वर्षे वयाची अट आहे. परंतु या सर्व कायद्यांचे उल्लंघन करून ठाणेच नव्हे तर संपूर्ण राज्यभर बालविवाह पार पाडले जातात. बालविवाहाचे हे भीषण वास्तव असून बालविवाह रोखणे हे सरकारपुढील मोठे आव्हान ठरले आहे. अशा अवैधरित्या होणाऱ्या बालविवाहांमुळे शारीरिक, मानसिक, भावनिक वाढ न झालेल्या पौगंडावस्थेतील बारा ते सतरा वर्षांखालील मुलींना अकाली मातृत्व प्राप्त होते. त्यामुळे त्यांचे भावविश्व व एकूणच आयुष्य उध्वस्त होते. अशा परिस्थितीत बालविवाहाच्या कुप्रथेचे पूर्णपणे निर्मूलन करण्यासाठी बालविवाह प्रतिबंधक कायद्याची कठोर अंमलबजावणी करण्याबरोबच समाज प्रबोधनाची गरज आहे.

**– प्रदीप मोरे, अंधेरी**

दिनविशेष

# बालसाहित्यिक राजा मंगळवेढेकर

राजा मंगळवेढेकर ऊर्फ वसंत नारायण मंगळवेढेकर हे थोर बालसाहित्यिक, चरित्रकार व कवी होते. त्यांचा जन्म ११ डिसेंबर १९२५ रोजी झाला. त्यांनी बीएपर्यंतचे शिक्षण घेतले होते. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग होता. 'साने गुरुजी जीवनचरित्र' हा त्यांचा अतिशय वैशिष्ठ्यपूर्ण ग्रंथ आहे. राजा मंगळवेढेकरांनी त्यांच्या लेखनातून मराठी साहित्याच्या दरबारात आपल्या वैविध्यपूर्ण ग्रंथसंपदेची मोलाची भर घातली आहे. त्यांचे संपूर्ण लेखन 'राजा मंगळवेढेकर' याच टोपणनावाने प्रसिद्ध आहे. त्यांनी बी.ए. पर्यंतचे शिक्षण घेतले होते. स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय भाग घेतला होता. त्यावेळी त्यांना साने गुरुजींचा सहवास लाभला. त्यामुळे त्यांना मुलांसाठी लिहिण्याची प्रेरणा मिळाली. 'करील मनोरंजन जो मुलांचे, जडेल प्रभूशी नाते तयाचे या साने गुरुजींच्या उक्तीप्रमाणे त्यांनी बालगोपाळांसाठी विपुल साहित्य निर्माण केले. मंगळवेढेकरांनी विपुल साहित्यनिर्मिती केली आहे. यामध्ये २०० पेक्षा जास्त गोष्टी, कथा, कविता, चरित्रे, पत्रे आणि विज्ञान व पर्यावरण पाविषयीची पुस्तके आहेत, त्यांनी साने गुरुजीच्या जीवनसंघर्षमय जीवनावर 'साने गुरुजी जीवनचरित्र' हे सुंदर पुस्तक लिहिले. मोठ्यांसाठी केलेल्या साहित्य निर्मितीमध्ये अनेक विषयांना स्पर्श केला आहे. मित्राय नमः, तरूण मित्रा', 'कहाणी एका प्रयोगाची', 'चित्रांगण', 'ग.दि. मा' ही त्यांची काही पुस्तके.

राष्ट्रसेवादल, साने गुरुजी कथामाला, आंतरभारती इत्यादी सांस्कृतिक व सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थांच्या कार्यामध्ये त्यांचा मोठा सहभाग होता. कथाकथन, बालमेळावे, शिबिरे इत्यादींच्या निमित्ताने त्यांनी भारतभर भटकंती केली होती. केल्याने देशाटन, पंडित मैत्री आणि सभेत भाषण केल्याने मनुजा चातुर्य येते, या उक्तीप्रमाणे त्यांच्या अनुभवविश्वातून त्यांनी अनेक पुस्तके लिहिली. साने गुरुजीच्या सहवासातील गोड गोष्टी व इतर संस्कार कथा सांगत त्यांनी साऱ्या महाराष्ट्रभर भ्रमंती केली होती.

राष्ट्रसेवादल, साने गुरुजी कथामाला, आंतरभारती इत्यादी सांस्कृतिक कार्य करणाऱ्या संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध होता. कथाकथन, बालमेळावे, शिबिरे इत्यादींच्या निमित्ताने त्यांनी भारतभर भटकंती केली. या अनुभवविश्वातून त्यांची अनेक पुस्तके आकारास आली आहेत. कथाकथनांमधून बालगोपाळांची मने जिंकणाऱ्या राजा मंगळवेढेकरांनी बालवाचकांसाठी अनेक पुस्तकेही लिहिली आहेत. त्यांचे बहुतांश लेखन चरित्रे, वृक्ष, निसर्ग व विज्ञान या विषयांवर आधारित आहेत. आनंद गोष्टी, माझ्या आवडत्या गोष्टी, रंगीत फुगे, सरदारजीच्या गोष्टी, शहाणे गाढव, श्रीकृष्णाच्या चातुर्यकथा, झाडांची गाणी-झाडांच्या गोष्टी, अखेरची झुंज, आपले पुष्पमित्र, आपले वनमित्र, आठवणीतील अण्णा-गदिमा, भले बुद्धीचे सागर नाना, भूमिपुत्र, बिनभिंतीची उघडी शाळा, बिरबलचे भाईबंद, चिंतूची करामत आणि मनीची फजिती, ज्ञानेश्वरीतील कथा, डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन, इंदिरा गांधी, भारुड, गांधीजींच्या गोष्टी, पंडित जवाहरलाल नेहरू, राष्ट्रपिता गांधी, शिक्षक मित्रांनो अशी त्यांची अनेक पुस्तकं प्रसिद्ध आहेत. स्वतःच्या कथाकथनातील अनुभवातून त्यांच्या 'कथा आणि कथाकथन' या पुस्तकात त्यांनी कथाकथनाची तंत्रे खुबीने मांडली आहेत. हे पुस्तक वक्त्यांना दीपस्तंभासारखे ठरले. चतुराई आणि बनवाबनवी ही बालनाट्ये लिहिली आहेत, 'असावा सुंदर चॉकलेटचा बंगला', 'कोणास ठाऊक कसा शाळेत गेला ससा ही बालगीते आजही बालचमूत आवडीची आहेत व शालेय संमेलनात गायली जातात. दुर्लक्षित उर्मिलेवर 'उर्मिले त्रिवार वंदन तुला' हे गीत लिहून तिच्या त्यागाची जाणीव त्यांनी करून दिली. 'सती तू दिव्यरूप मैथिली' या गीतांमधून सीतेचा मोठेपणाही सांगितला.

१९८५ साली पुण्यात भरलेल्या बालकुमार साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. जवाहरलाल नेहरू समिती पुरस्कार, गदिमा पुरस्कार, बालसेवा पुरस्कार अशा अनेक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले होते. राजा मंगळवेढेकर यांचे १ एप्रिल २००६ रोजी निधन झाले.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**११ डिसेंबर**

१) श्री.विजय शंकर पुळेकर अलिबाग,११-१२-१९५२
२)श्री.विष्णु महादेव मगर मु.वेश्वी, अलिबाग ११-१२-१९३३
३)श्री.विजय पांडुरंग पाटील मु.तुडाळ, ता.अलिबाग ११-१२-१९५५
४)श्रीमती.शुभांगी वामन म्हात्रे पिंपळभाट, अलिबाग ११-१२-१९५९

# कशेळे भागातील रस्त्याची दुरवस्था

## •दुकानात धुळीचे लोट; व्यापारी त्रस्त



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग ५४८ अ वरील कशेळे भागातील रस्त्याची दुरवस्था झाली आहे. त्यामुळे कशेळे बाजारपेठ परिसरात या रस्त्यावर प्रचंड प्रमाणात धुळीचे लोट दिसून येत आहेत. दरम्यान, राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्याकडून रस्त्यांची कामे अपूर्ण ठेवण्यात आल्याने कशेळे बाजारपेठ येथील व्यापारी धुळीमुळे त्रस्त झाले आहेत.

समृद्धी महामार्गपासून शहापूर येथे तयार झालेला बायपास येथून शहापूर-मुरबाड-कर्जत-खोपोली-वाकणं असा राष्ट्रीय महामार्ग ५४८ अ बनविण्यात आला आहे. या राष्ट्रीय महामार्ग रस्त्याचे काँक्रीटीकरण १०० टक्के पूर्ण झालेले नाही आणि त्यामुळे या रस्त्यावर आजही अनेक ठिकाणी डांबरीकरण असलेले भाग आहेत. कशेळे गावात या राष्ट्रीय महामार्ग अरुंद असल्याने सातत्याने वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागते. हा रस्ता बनविणाऱ्या राज्य रस्ते विकास महामंडळ यांनी कशेळे गावातील रस्ता आजही डांबरी ठेवला आहे. त्यामुळे हा रस्ता सतत खड्डेमय आणि नादुरुस्त असतो.

मात्र, या रस्त्याने वाहतूक करणारी अवजड वाहने यांच्यासाठी लहान-मोठे खड्डे हे जाणवत नसल्याने दुपारच्या वेळी अवजड वाहने वेगाने जा-ये करतात. त्याचा परिणाम या रस्त्याच्या आजुबाजूला असलेले दुकानदारांच्या दुकानात धुळीचे लोट जाऊन पडत असतात.

### स्थानिकांकडून आंदोलनाची शक्यता

कशेळे ग्रामस्थांनी या राष्ट्रीय महामार्ग रस्त्यावरील खड्डे श्रमदान करून भरले. मात्र तरी देखील राज्य रस्ते विकास महामंडळ कशेळे गावात येऊन तेथील रस्त्यावर नवीन डांबर टाकण्याचे काम करीत नाहीत. रस्त्यावरील धूळ सर्वांना त्रासदायक ठरत असल्याने स्थानिक आंदोलनाचा पवित्रा घेण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्या आंदोलनात स्थानिक उत्स्फूर्तपणे रस्ता रोको करू शकतात आणि त्यामुळे मोठी वाहतूक कोंडी कर्जत-मुरबाड रस्त्यावर होऊ शकते.

### आजारांना निमंत्रण

रस्त्यावरून दिवसरात्र सुरू असलेली वाहनांची वाहतूक यामुळे कशेळे गावातील आणि बाजारपेठ भागात रस्त्याची धूळ स्थानिकांसाठी श्वसनाच्या आजारांना निमंत्रण देणारी ठरत आहे.

## गोरेगावमध्ये गॅस सिलिंडरचा स्फोट

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

गोरेगाव पश्चिम येथील शहीद भगतसिंग नगर-२ येथील राजाराम चाळीमध्ये गॅस सिलेंडरचा स्फोट झाला. यात तीन जण जखमी झाले आहेत. तर तळमजल्यावरील दोन खोल्यांमधील भिंत कोसळली. सकाळी ७ ते ८ वाजताच्या सुमारास अग्निशमन दलाला आग लागल्याची माहिती मिळाली. मात्र अग्निशमन दलाच्या गाड्या येण्यापूर्वीच रहिवाशांनी पाण्याच्या बादल्यांनी आग विझवण्याचा प्रयत्न केला होता. पुढील धोके टाळण्यासाठी अग्निशमन दलाने वीजपुरवठा खंडीत केला. मिळालेल्या माहितीनुसार, या स्फोटात २८ वर्षीय मालतीदेवी तीस ते पस्तीस टक्के भाजल्या आहेत. त्यांच्यावर सुरुवातीला ट्रॉमा केअर हॉस्पिटलमध्ये उपचार करण्यात आले आणि त्यानंतर तिला एलटीएमजी सायन हॉस्पिटलमध्ये हलवण्यात आले. तर सरजान अली जावेद शेख (३७) आणि गुल मोहम्मद अमीन शेख (३८) यांना बोरिवली येथील गणेश हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. यातील गुल मोहम्मद अमीनची प्रकृती गंभीर असून त्याला आयसीयूमध्ये दाखल करण्यात आले आहे.

## गहाळ झालेले मोबाईल मूळ मालकांना परत

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

विष्णुनगर पोलीस ठाणे, डोंबिवली पश्चिम येथे दाखल असलेल्या मोबाईल हरविल्याच्या तक्रारीमधील चार लाख रूपये किंमतीचे मोबाईल शोधून ते मूळ मालकांना परत करण्यात आले आहेत.

वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली विष्णुनगर पोलीस ठाण्यातील पोलीस शिपाई ७८७३ शिंदे, यांनी सी.ई.आय.आर. पोर्टलच्या माध्यमातून शोधलेले हे सर्व मोबाईल फोन मंगळवारी (दि.९) सहाय्यक पोलीस आयुक्त, डोंबिवली विभाग सुहास हेमाडे यांच्या हस्ते संबंधीत तक्रारदारांना परत करण्यात आले. कल्याण परिमंडळ ३ पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस आयुक्त डोंबिवली विभाग सुहास हेमाडे यांच्या आदेशानुसार विष्णूनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीराम चोपडे व पोलीस शिपाई रोहिदास शिंदे व पथकाने सायबर सायबर गुन्हेतील गहाळ झालेले व चोरी झालेले मोबाईल यांचा तपास पोलीस शिपाई रोहिदास शिंदे व पथकाने केला होता.

## नवीन वीज जोडणीचे उद्घाटन

### शासकीय अधिकाऱ्यांचा सत्कार

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील खोपटे गावातील सामाजिक कार्यकर्ते गोरख रामदास ठाकूर यांच्या समवेत खोपटे गावातील व उरण पूर्व विभागातील जनतेने जुलै २०२१ पासून केलेल्या प्रयत्नामुळे व पाठपुराव्यामुळे मंजूर झालेल्या आरडीएसएस आणि एसएसएमआर योजनेतील काम पूर्ण झाले. त्यामुळे एमएसईबीचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता विकास गायकवाड व सहाय्यक अभियंता सातपुते व उरण पूर्व विभागातील तरुणांच्या हस्ते मंगळवारी (दि.९) छोटेखानी नवीन वीज जोडणीचे उद्घाटन करण्यात आले. तसेच या कामासाठी गोरख ठाकूर यांनी सातत्याने अतिरिक्त कार्यकारी अभियंता विकास गायकवाड यांच्याकडे पाठपुरावा केला आणि त्यांनी ते काम पूर्णत्वास आणले. म्हणून त्यांचाही तिथे विशेष सत्कार करण्यात आला. पुढील आठवड्यापासून उरण पूर्व विभागासाठी नवीन वीज जोडणी लाईन कार्यान्वित करण्यात येणार आहे. या उद्घाटन कार्यक्रम प्रसंगी उरण पूर्व विभागातील विनोद पाटील, प्रांजल पाटील, रोहित भगत, हरिश्चंद्र म्हात्रे, विनय ठाकूर, महेंद्र पाटील, अनिकेत ठाकूर, वैभव घरत, पराग ठाकूर, अक्षय ठाकूर, हेमंत ठाकूर, सुयश पाटील, समाधान म्हात्रे, राहुल ठाकूर व इतर तरुण उपस्थित होते.



## अंधांना दृष्टी मिळाल्याचा आनंद वेगळाच: विजय मेथा



- मोफत नेत्र शिबिरात ९५ रुग्णांची तपासणी
- ४० रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव शहरात शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व माणगावमधील प्रसिद्ध उद्योजक विजय मेथा चॅरिटेबल ट्रस्ट माणगावतर्फे बुधवारी (दि.१०) सकाळी ९ ते दुपारी २ यावेळेत मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. हे शिबीर महेंद्र मेथा यांच्या प्रशस्त जागेत हॉलमध्ये जुने एसटी स्टॅन्ड जवळ माणगाव याठिकाणी आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात शंकरा आय हॉस्पिटलचे नेत्ररोग तज्ज्ञ डॉ.प्रकाश पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी नवीन ९५ रुग्णांची तपासणी करून ४० नेत्ररुग्णांना पनवेल येथे नेऊन त्यांच्यावर मोफत यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली.

माणगावात गेली तीन वर्षांहून अधिक काळात ४२ वेळा शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व माणगाव येथील प्रसिद्ध उद्योजक विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्ट यांच्यातर्फे मोफत नेत्ररोग व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

गोरगरीब जनतेला दृष्टी मिळाल्याचा आनंद वेगळाच असून जनसेवा हीच खरी ईश्वरसेवा समजून यापुढेही आपण हे शिबीर राबविणार असून माणगाव तालुका मोतीबिंदू मुक्त करण्याचा आपला मानस असल्याचे त्यांनी प्रसार माध्यमांजवळ बोलताना सांगितले.

## पालघर ग्रामीण रुग्णालयात झुरळांचा उपद्रव

**। पालघर । प्रतिनिधी ।**

पालघर शहरातील ग्रामीण रुग्णालयात झुरळांचा प्रचंड उपद्रव वाढला आहे. उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांच्या बेडवर, सलाईन स्टँडवर, वॉर्डमध्ये आणि अगदी घरून आणलेल्या टिफिनवरही झुरळे मुक्तपणे फिरताना दिसत आहेत. त्यामुळे रुग्ण आणि नातेवाईक अक्षरशः हैराण झाले आहे. रुग्णालयात पाऊल टाकल्यापासूनच अस्वच्छता जाणवते. वॉर्ड विभागात, बेडखाली, भिंतींवर आणि कॉरिडॉरमध्ये झुरळांचा एवढा मोठा प्रादुर्भाव आहे की, कोणतीही वस्तू ठेवताना किंवा बसताना दुप्पट विचार करावा लागत आहे. काही प्रकरणांत रुग्णांच्या बेडशीटवर झुरळ धावताना दिसल्याची, तर काही वेळा सलाईनच्या ट्यूबवरूनही झुरळ सरकतानाची तक्रार नातेवाईकांनी केली आहे.

नातेवाईकांचा आरोप आहे की, रुग्णालयात नियमित स्वच्छता केली जात नाही, कचरा व्यवस्थापन ढिसाळ आहे आणि पेस्ट कंट्रोलची कोणतीही प्रभावी व्यवस्था नाही. वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाने कोणतीही ठोस कारवाई न केल्याने रोष वाढला आहे.

## निवडक

### एड्सविषयी जनजागृती शिबीर

**उरण :** वीर वाजेकर महाविद्यालयात मंगळवार (दि.९) राष्ट्रीय सेवा योजना तसेच रेड रिबन क्लब आणि इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालय उरण यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक एड्स दिन व पंधरवडानिमित्त एड्सविषयी जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला समुपदेशक महादेव पवार, लॅब टेक्निशियन तृप्ती परजणे, राष्ट्रीय सेवा योजने विभाग प्रमुख, शिक्षकवर्ग व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालय उरण एकात्मिक सल्ला व चाचणी केंद्रमधील महादेव पवार (समुपदेशक) यांनी विद्यार्थ्यांना एचआयव्हीचा इतिहास, एचआयव्ही होण्याची कारणे, गैरसमज, लक्षणे, उपचार, एचआयव्ही होऊ नये यासाठी घ्यावयाची काळजी, एचआयव्ही एड्स कायदा २०१७ त्याचबरोबर प्रत्येकाने लग्नापूर्वी एचआयव्ही तपासणी करुन घेण्याचे आवाहन करण्यात आले.



### संजय गुंजाळांना कोकणरत्न पुरस्कार जाहीर




**कोर्लई :** कोकण मराठी साहित्य परिषदेचे रायगड जिल्हा अध्यक्ष, प्रियदर्शनी फाऊंडेशनतर्फे संजय पांडुरंग गुंजाळ यांना रायगड सांस्कृतिक कला मंडळ, महाराष्ट्र राज्य रजि.चा कोकण रत्न पुरस्कार २०२५ जाहीर झाला आहे. याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन केले जात आहे. माणगाव येथील मुंबई-गोवा हायवेलगत एचपी पेट्रोल पंपनजीकच्या गांधी मैदानात शुक्रवारी (दि.१२) सांय. ६वा. रायगड सांस्कृतिक कला मंडळाच्या कोकण फेस्टिवल-२०२५ कार्यक्रमात मान्यवरांच्या उपस्थितीत संजय गुंजाळ यांना कोकण रत्न पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. मागील वर्षी सर्वद फाउंडेशनच्या कार्यक्रमात संजय गुंजाळ यांना जीवन गौरव पुरस्कार-२०२५ प्रदान करण्यात आला आहे. कला, साहित्य, सांस्कृतिक क्षेत्रातील संजय गुंजाळ यांचे कार्य उल्लेखनीय आहे. सन २०११ चा 'ॐ नमःशिवाय प्रतिष्ठान'चा 'बाळशास्त्री जांभेकर' हा राज्यस्तरीय पुरस्कार, सन २०१०चा रायगड जिल्हा पत्रकार मित्र फाऊंडेशनचा 'सांस्कृतिक व कला पुरस्कार' मिळाला आहे. शहरातील हिंदू-मुस्लीम ऐक्य राखण्यासाठी त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे.

### ॲड. परेश जाधव यांचे मार्गदर्शन



**तळा :** श्री गोपीनाथ महादेव वेदक प्रतिष्ठान संचलित जी. एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स, तळा यांच्या वतीने चरई बुद्रुक येथे दि. ८ ते १४ डिसेंबर या कालावधीत ७ दिवसीय राष्ट्रीय सेवा योजना विशेष निवासी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या विशेष निवासी शिबिराच्या दुसऱ्या दिवशी, मंगळवारी (दि.९) महाविद्यालयात सुप्रसिद्ध विधीज्ञ मा. ॲड. परेश जाधव यांचे प्रेरणादायी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यांच्यासोबत त्यांच्या विधीज्ञ सहकाऱ्यांमध्ये ॲड. सपना ढोले, ॲड. विलास सनस व ॲड. अजिंक्य नाईक यांची उपस्थिती होती. यावेळी ॲड. परेश जाधव यांनी विकसित भारतासाठी युवकांचे सामर्थ्य आणि जबाबदारी या अत्यंत महत्त्वपूर्ण विषयावर मार्गदर्शन केले. आपल्या व्याख्यानात मा. जाधव यांनी यशस्वी जीवनासाठी आवश्यक असलेल्या शारीरिक व मानसिक आरोग्य, कुटुंबीय मूल्ये, आर्थिक शिस्त, मैत्री आणि सामाजिक संबंध तसेच स्वातंत्र्य व जबाबदारी या संकल्पनांची अत्यंत प्रभावी व वेगळ्या शैलीत मांडणी केली. विविध छोट्या कथा, उदाहरणे व अनुभवांच्या माध्यमातून त्यांनी एनएसएस स्वयंसेवकांना जीवनमूल्यांचे महत्त्व पटवून दिले.



### वणव्याची झळ बसून गोदामाला आग

**रत्नागिरी :** रत्नागिरी तालुक्यातील कुर्धे येथे मोठ्या प्रमाणात कातळ परिसर असल्याने त्यावर उगवलेल्या गवताला वणवा लागला. त्याची झळ बसून पावस-पूर्णगड मार्गावर हार्डवेअर सामान असलेल्या गोदामाला आग लागली. गेले दोन-तीन दिवस थंडीची लाट असल्याने वाऱ्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे. दरवर्षी या कातळ परिसरात प्रमाण मोठ्या प्रमाणात गवत वाढत असल्यामुळे वणव्याच्या घटना घडतात. मंगळवारी सकाळीही या परिसरामध्ये वारा असल्याने कातळातील गवत वणव्यामुळे आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. याच भागात रसाळ यांचे गोडाऊन असल्यामुळे ते वणव्यात सापडून खाक झाले. रसाळ यांचे पावसमध्ये दुकान असून, या गोडाऊनमध्ये मोठ्या प्रमाणात इलेक्ट्रिक सामान, रंगाचे डबे, ताडपत्री, पाण्याच्या टाक्या प्लास्टिकच्या अनेक प्रकारच्या वस्तू साठवण्यात आलेल्या होत्या. अचानक लागलेल्या वणव्यामध्ये त्यांचे सुमारे २६ लाखांचे नुकसान झाले. आगीची माहिती मिळताच रत्नागिरी नगर परिषद व फिनोलेक्स कंपनी यांच्या अग्निशमन दलाने घटनास्थळी दाखल होत आग आटोक्यात आणली.

### रिक्षाचालकाकडून विद्यार्थिनीचा विनयभंग

**मुंबई :** मुंबईतील मालाड पश्चिम येथे एका अल्पवयीन विद्यार्थिनीवर रिक्षाचालकाने विनयभंग केल्याचा प्रकार समोर आला आहे. सोमवारी (दि.८) एक १७ वर्षीय महाविद्यालयीन विद्यार्थिनी कॉलेज संपल्यानंतर दुपारी ४.३०च्या सुमारास मालाड येथील एस.व्ही. रोडवर ऑटोरिक्षा शोधत होती. यावेळी एक रिक्षाचालक तिथे येताच विद्यार्थिनीने चालकाला सुराणा हॉस्पिटल, ओरलेम, मालाड पश्चिमेला घेऊन जाण्यास सांगितले. तरुणीने सांगितलेल्या मार्गाने तो न जाता वेगळ्या मार्गाने गाडी चालवत होता. तसेच रिक्षाचालकाने आरशातून विद्यार्थिनीकडे पाहून तिला अनेकदा अश्लील हावभाव केले. या घटनेमुळे विद्यार्थिनी घाबरल्यामुळे तिने रिक्षा थांबवण्यास सांगितले. मात्र त्याऐवजी, रिक्षाचालकाने वेग वाढवला. घाबरून ती ओरडू लागली, परंतु त्याने तिला धमकी दिली. थोड्या शांततेनंतर, ती पुन्हा ओरडली. यावेळी त्याने तिला ऑटोरिक्षातून बाहेर ढकलले. यानंतर विद्यार्थिनीने आई आणि बहिणीसह मालाड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. केशव यादव (५४) असे आरोपी रिक्षा चालकाचे नाव असून त्याला मालाड पोलिसांनी अटक केली आहे.

पान १ वरून

## अलिबागची सात वर्षांची सागरकन्या

या महान कामगिरीमागे तिचे किशोर पाटील आणि सूरज लोखंडे यांचे अथक प्रशिक्षण, मार्गदर्शन आणि मानसिक बळ याचा मोलाचा वाटा आहे. त्यांनी सारामध्ये आत्मविश्वास निर्माण करत तिला प्रत्येक आव्हानांवर मात करण्याची ताकद दिली, त्यामुळेच ती यशस्वी ठरल्याचे साराच्या आईवडिलांनी सांगितले.

सारा जेव्हा धरमतर ते गेटवे ऑफ इंडियापर्यंत अंतर पोहून पार करीत पोहोचली, तेव्हा तिचे गेट वे ऑफ इंडिया येथे स्वागत करण्यासाठी राजाराम गावंड, अनंत वर्तक, आशा अनंत वर्तक, जितेंद्र वर्तक, उमेश वर्तक, स्वप्निल म्हात्रे, बालनाथ मोकल आणि कुलाबा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ अधिकारी, कुटुंबीय व मित्र परिवार उपस्थित होते. समुद्राच्या सतत बदलणाऱ्या प्रवाहांना, वाऱ्याला आणि उंच लाटांना तोंड देत साराने दाखवलेले धैर्य खरोखर प्रेरणादायी आहे. साराच्या या ऐतिहासिक कामगिरीबद्दल सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

साराच्या मूळ गावी जल्लोष

साराच्या यशाची बातमी तिचे आजोळ असणाऱ्या अलिबाग तालुक्यातील फोफेरी या गावात पोहोचताच कुटुंबियांसह फोफेरी ग्रामस्थांनी आनंदाने एकच जल्लोष केला. यावेळी गावकऱ्यांनी आम्हाला आमच्या सुकन्येचा अभिमान असल्याचे सांगत तिला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## दळवींच्या 'त्या' व्हिडिओची सखोल चौकशी करा

शिंदे गटातील आमदारांचा भ्रष्टाचार समोर आणत आहेत. रायगडच्या महायुतीत गेल्या अनेक दिवसांपासून राष्ट्रवादी विरुद्ध शिवसेना संघर्षात या व्हिडीओमुळे नवी ठिणगी पडली आहे. आजपर्यंत आ. दळवींवर अनेक गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. अनेक प्रकरणांमुळे वादग्रस्त ठरलेले अलिबाग मतदारसंघातील शिवसेनेचे विद्यमान आमदार महेंद्र दळवी यांच्याविरोधात गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे. विशेष म्हणजे, जिल्ह्यातील सातही मतदारसंघांतील आमदारांमध्ये ते याबाबत आघाडीवर आहेत. घरगुती हिंसाचार, चोरी, मारामारी, जमीन हडप करणे, यासंदर्भात अलिबाग पोलीस ठाण्यात २०१० पासून दळवींविरोधात गुन्हे दाखल आहेत.

## बिबट्या पुन्हा दिसलाच नाही

भीतीचे सावट पसरले होते. मंगळवारी गावातून पळालेला बिबट्या बुधवारी परिसरात दिसेल, अशी शक्यता वर्तवण्यात आली होती. परंतु, ही शक्यतादेखील बिबट्याने फोल ठरवली. यामुळे हळूहळू नागाव रुळावर आले.

नागाव परिसरात दिसलेल्या बिबट्यामुळे स्थानिकांमध्ये निर्माण झालेली भीती अद्यापही कायम आहे. बिबट्याचे पहिले दर्शन झाल्यानंतर २४ तासांहून अधिक वेळ उलटला असला तरी त्याला पकडण्यात वनविभागाला अद्याप यश आलेले नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये चिंतेचं वातावरण असून, गावात सतत चर्चेला ऊत आला आहे. घटनेनंतर लगेचच वनविभागाने शोधमोहीम राबवण्यास सुरुवात केली. उपवनसंरक्षक राहुल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तब्बल ८० कर्मचारी आणि अधिकारी परिसरात गस्त घालत आहेत. विविध ठिकाणी पिंजरे लावण्यात आले असून, रात्री आणि पहाटेच्या सत्रात शोध वाढवण्यात आला. मात्र, संध्याकाळनंतर बिबट्या कुणाच्याच नजरेस न पडल्याने तो नागावच्या सीमारेषेबाहेर जाऊन आपल्या नैसर्गिक अधिवासाकडे परतला असण्याची शक्यता वनविभागाने व्यक्त केली आहे. तरीही, या अंदाजाला पुष्टी मिळेपर्यंत शोधमोहीम सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. स्थानिकांना सावधगिरी बाळगण्याचे आवाहन करण्यात आले असून, अनावश्यक बाहेर जाणे, विशेषतः रात्रीच्या वेळी बाहेर जाणे टाळण्यास सांगितले आहे. वनविभागाच्या पथकाकडून परिस्थितीवर सतत लक्ष ठेवण्यात येत आहे.

दरम्यान, बिबट्या खाद्याच्या शोधात आला असला तरी त्याने मनुष्य प्राण्यावर हल्ला चढवला आहे. बिबट्याच्या हल्ल्यात आतापर्यंत सहा जण जखमी झाले आहेत. यामध्ये बापूसाहेब जावळे, मंदार गडकरी, अमित वर्तक, कुणाल साळुंखे, प्रसाद सुतार आणि अनिकेत पाटील यांचा समावेश आहे. या सर्व जखमींवर उपचार करण्यात आले आहेत.

## शहापूरचा आराध्य 'स्वामी समर्थ' मालिकेत

आराध्य हा सचिन धुमाळ म्युझिकल अकॅडमीकडून रायगड जिल्ह्यातील १६ शाळांमध्ये झालेल्या विनामूल्य बासरी वादन कार्यक्रमातसुद्धा सहभाग घेऊन योगदान दिला आहे. शैक्षणिक क्षेत्रात शाळेअंतर्गत होणाऱ्या तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय वक्तृत्व व गायन स्पर्धेतरी, दरवर्षी प्रथम क्रमांक प्राप्त, इयत्ता पाचवी स्कॉलरशिपमध्ये रायगड जिल्ह्यात गुणवत्ता यादीत अकरावा, अलिबाग तालुक्यातून मराठी माध्यमातून प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे. आराध्य हा उत्कृष्ट बासरी, माउथ ऑर्गन आदी वाद्यांमध्ये सुद्धा आराध्य प्राविण्य आहे.

दरम्यान, स्वामी समर्थ मालिकेचे डायरेक्टर दिगंबर फराटे, प्रोडूसर राकेश सारंग, संगीता सारंग, प्रोडक्शन : कॉम्सक्लब स्टुडिओ चॅनल:- कलर्स मराठी लीड, ॲक्टर :- अक्षय मुडवाडकर, शूटिंग लोकेशन :- मड जेट्टीवर शूट करण्यात आले आहेत.अप्रतिम सिरीयल आणि प्रोडक्शन डायरेक्टर, ॲक्टर यांनी सगळ्यांनीच छान ट्रीटमेंट सेटवर दिली आणि उत्तमची कलाकारांची काळजी घेतली गेली. संपूर्ण टीमसोबत काम करायला मिळाले.

## राज्यात भीक मागण्यास बंदी येणार

ताळमेळ नसल्याची प्रतिक्रिया आमदार एकनाथ खडसेंनी दिली. तर, विधेयकाबाबत माहिती दिलेल्या पुस्तिकेतील स्पष्टीकरणावर तालिका सभापती नीलम गोऱ्हेंनी असमाधान व्यक्त केले.सभागृहातील अनेक सदस्य असमाधानी असतानाही विधेयक मंजूर करण्यात आलं. या संबंधित विधान परिषद सभापतींच्या दालनात शनिवारी बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे

## ध्वजदिनी निधी संकलन हे मोठे देशकार्य

सुरुवात दीप प्रज्वलनाने झाली आणि ध्वजदिन निधीत सहभाग देणाऱ्यांकडून निधी संकलित करण्यात आला. यावेळी शासकीय कर्मचारी निवृत्त जवान उपस्थित होते.यावेळी अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, अपर पोलीस अधीक्षक अभिजित शिवथरे, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, जिल्हा अधीक्षक भूमीअभिलेख रायगड सुनील इंदलकर, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कर्नल राहुल माने (निवृत) आदी उपस्थित होते.यावेळी जिल्हाधिकारी किशन जावळे म्हणाले की, १९४९ पासून ७ डिसेंबर हा दिवस देशभरात सशस्त्र सेना ध्वज दिन म्हणून साजरा केला जातो. शहीद आणि गणवेशधारी सैनिकांना आदरांजली वाहण्यासाठी, ज्यांनी देशाच्या सन्मानाचे रक्षण करण्यासाठी आपल्या सीमेवर शौर्याने लढा दिला आणि लढत राहिले, त्यांचा सन्मान करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. सैनिक हे कोणत्याही देशाच्या सर्वात मोठ्या संपत्तीपैकी एक असतात. ते राष्ट्राचे रक्षक असतात आणि कोणत्याही परिस्थितीत नागरिकांचे रक्षण करतात. आपले कर्तव्य पार पाडण्यासाठी, सैनिकांनी त्यांच्या आयुष्यात खूप काही बलिदान दिले आहे. मातृभूमीच्या सेवेत आपले प्राण अर्पण करणाऱ्या या शूरवीरांचा देश कायम ऋणी आहे.

केंद्र आणि राज्य पातळीवरील सरकारी उपाययोजनांव्यतिरिक्त आधार, पुनर्वसन आणि आर्थिक मदत देण्यासाठी आपले निःस्वार्थ आणि स्वेच्छेने योगदान देणे, हे आपल्या देशातील प्रत्येक नागरिकाचे सामूहिक कर्तव्य आहे. ध्वज दिन आपल्या युद्धात अपंग असलेल्या सैनिकांची, वीर नारींची आणि देशासाठी बलिदान देणाऱ्या शहिदांच्या कुटुंबांची काळजी घेण्याची आपली वचनबद्धता आपण पूर्ण करायला हवी. भारतमातेच्या संरक्षणासाठी ज्यांनी आपल्या प्राणांची आहूती देऊन सर्वोच्च बलिदान दिले अशा जवानांच्या कुटुंबियांच्या जीवनातील अडीअडचणी दूर करुन त्यांचे दैनंदिन जीवन सुसह्य व्हावे यासाठी तसेच युध्दात अपंगत्व प्राप्त झालेल्या आणि सशस्त्र दलातून निवृत्त झालेल्या जवानांच्या पुनर्वसनासाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यासाठी या निधीचा वापर केला जातो.

## पार्थ पवारांचे नाव का नाही?

असलेल्या जामीन अर्जावर सुनावणी करताना न्यायालयाने राज्य सरकारला पार्थ पवार यांचे नाव एफआयआरमध्ये का नाही? असा थेट सवाल केला आहे. दरम्यान, याप्रकरणी आमचा तपास सुरू असल्याची भूमिका पुणे पोलिसांनी न्यायालयात मांडली. शीतल तेजवानीने बावधन पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्याप्रकरणी केलेल्या अटकपूर्व जामीन अर्जावर आज मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी झाली. त्यावर, हायकोर्टाकडून अजित पवारांच्या मुलाचे नाव का नाही, असा थेट सवाल विचारण्यात आला.

## विमानतळाला दि.बां.चे नाव द्या

आज पुन्हा एकदा दिल्लीसमोर उभी राहिली. या सर्व त्यागाचा सन्मान म्हणून विमानतळाला स्व. दि.बा. पाटील यांचे नाव देणे ही भूमीपुत्रांच्या स्वाभिमानाची, आत्मसन्मानाची आणि न्यायाची लढाई आहे. मागील अनेक वर्षांपासून हा संघर्ष सुरू असून, आजच्या आंदोलनाने त्याला नवी ऊर्जा मिळाली. महाराष्ट्रातील सर्वपक्षीय खासदारांनी केलेल्या एकमुखी आवाजाने पुन्हा एकदा दाखवून दिले की, भूमीपुत्रांच्या प्रश्नावर महाराष्ट्र कधीही मागे हटणार नाही. केंद्र सरकारने तातडीने हा मुद्दा निर्णयप्रक्रियेत आणून भूमीपुत्रांचा मान राखावा, ही ठाम मागणी आजच्या निदर्शनांतून नोंदवण्यात आली.

## मिरची गल्लीत इमारतीला आग

दरम्यान, हा भाग दाटीवाटीचा असल्याने आगीने रौद्र रूप धारण केले असते तर मोठ्या प्रमाणात परिसराचे नुकसान झाले असते. यापूर्वीसुद्धा या भागात अशा प्रकारच्या आगीच्या घटना घडल्या आहेत.

# फुटणाऱ्या जलवाहिन्यांमुळे श्रीवर्धनकर त्रस्त

## ।। पावसाळी दिवसात गढूळ पाणी ।। तेवीस कोटींचा जलशुद्धीकरण प्रकल्प

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

रानवली लघु पाटबंधारे योजना अंतर्गत १९७७ साली रानवली ग्रामपंचायत हद्दीत मातीचे धरण या प्रकारात मोडणारे पाझर धरण बांधण्यात आले. या धरणातून श्रीवर्धन नगरपरिषद हद्दीसह रानवली, निगडी, बापवन व गालसुरे ग्रामपंचायत हद्दीत पाणीपुरवठा होत आहे. परंतु सद्यस्थितीत वारंवार फुटणाऱ्या जलवाहिन्यांमुळे नळजोडणी करुन घेतलेले ग्राहक त्रस्त झाले आहेत.



धरणाची एकुण लांबी ७०० मीटर, उंची २.५० मीटर असून पूर्ण संचय पातळी १२१ मीटर आहे. धरणाला पाण्याचे नैसर्गिक स्त्रोत नसून पावसाळी चार महिन्यांत जे पावसाचे पाणी धरणात साठते त्या पाण्याचा पुरवठा नळ ग्राहकांना केला जात आहे. श्रीवर्धन नगरपरिषद हद्दीत २५७० घरातून नळजोडणी करण्यात आली आहे.

रानवली धरण येथे २०२२-२३ या कालावधीत तेवीस कोटींचा जलशुद्धीकरण प्रकल्प उभारण्यात आला. या अनुषंगाने ४६ वर्षे वापरातील जीर्ण झालेल्या जलवाहिन्या बदलून त्या जागेवर उच्च घनतेची पॉलिथिलीन जलवाहिनी टाकण्यात आली.

या प्रकल्पाचा लोकार्पण सोहळा २०२३ साली उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते संपन्न झाला होता.

> नगरपरिषदेचे नळ कनेक्शन माझ्याकडे आहे. दिवसातून एक तास पाणी येईल असे सांगितले जाते.प्रत्यक्षात मात्र चाळीस ते पंचेचाळीस मिनिटे पाणी सोडतात. दिवसातून दोन वेळा सकाळ व रात्री एकेक तास पाणी सोडण्यात यावे. पाण्याला फोर्स कमी तसेच अनेक वेळा गढूळ पाणी येते. पाईप लाईन फुटली की दोन ते तीन दिवस पाणी पुरवठा बंद करतात. आमच्याकडे पाण्यासाठी दुसरा पर्याय नाही त्यामुळे आम्ही नगरपरिषदेच्या पाण्यावर अवलंबून आहोत.
>
> – प्रसाद शशिकांत बंदरकर
> टिळक रस्ता श्रीवर्धन.

काही कालावधीतच रानवली ते श्रीवर्धन या आठ किलोमीटर अंतरावर जलवाहिनी फुटणे व पावसाळी दिवसात गढूळ पाणी येणे या समस्या सुरू झाल्या. या कारणास्तव अनेक वेळा श्रीवर्धन येथील पाणीपुरवठा बंद करण्यात येतो.

अनेक ठिकाणी फुटलेल्या जलवाहिनीतून पाणी रस्त्यावर साचलेले दिसते. नगरपरिषदेच्या घंटागाडी वरून ध्वनीक्षेपक तसेच फलकावरून वरून पाणी वाचवा, पाण्याचा वापर जपून करा त्याचप्रमाणे घरपट्टी व पाणीपट्टी वेळेत भरा, असा वारंवार संदेश दिला जातोय. परंतु, नगरपरिषदेकडून वारंवार फुटणाऱ्या जलवाहिन्यां बाबतीत कुठल्याही उपाययोजना करण्यात आल्या नाहीत.

अगणित वाया जाणाऱ्या पाण्याचा हिशेब नगरपरिषद चुकता करेल की आमच्याकडून वसूल करेल असा प्रश्न त्रस्त नागरिक करीत आहेत.

सदरची पाणीपुरवठा योजना निविदा व डिझाईन प्रमाणे केली आहे. तसेच योजनेत वापरण्यात येणारे पाईप नामांकित कंपनीचे असून सदरची कंपनी नावाजलेल्या अग्रगण्य कंपन्यांपैकी आहे. जेव्हा पाणीपुरवठा योजना आमच्याकडे चालवायला होती तेव्हा योजना सुरळीतपणे चालू होती.

सद्यस्थितीत लिकेज का होत आहे याबाबतीत संबंधित कर्मचारी कशी चालवतात व त्यासाठी त्यांना तांत्रिक प्रशिक्षणाची गरज आहे का हे पहावे लागेल.तसेच जलशुद्धीकरण प्रकल्प कार्यान्वित असला तरी पावसाळी दिवसात गढूळ पाणी येणे अपेक्षित आहे.

## दि.बां.च्या नावासाठी मुरलीधर मोहोळकडे मागणी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नवी मुंबई येथील आतंरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ असे नाव देण्यास केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी द्यावी, अशी मागणी भिंवडीचे खा. बाळ्यामामा म्हात्रे यांनी केंद्रीय हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्याकडे केली.लोकनेते दिबा पाटील यांच्या नावासाठी ठाणे, रायगड तसेच सागरी जिल्ह्यातील



भूमिपुत्रांनी २२ डिसेंबरपासून आंदोलनाची भूमिका जाहीर केली आहे.

लोकनेते दिबा यांचे नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला देण्याच्या मागणीसाठी भूमिपुत्र गेल्या काही वर्षांपासून सातत्याने संघर्ष करत आहेत.

राज्यासह केंद्र सरकारणे सकारात्मक आश्वासन देऊनही अद्यापपर्यंत नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दिबा यांचे नाव देण्यात आले नाही. या मुद्द्याबाबत खा. सुरेश म्हात्रे यांनी केंद्रीय सहकार आणि नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची भेट घेतली. येत्या शुक्रवारी केंद्रीय नागरिक उड्डाण मंत्री किंजरापु राममोहन नायडू यांची देखील भेट घेण्यात येणार असून भूमिपुत्रांना देण्यात आलेल्या आश्वासनांची पूर्तता अद्याप झालेली नाही याची ठणकावून आठवण करून देणार असल्याचे म्हात्रे यांनी स्पष्ट केले आहे.

## रसायनीत कौशल्यावर आधारीत प्रशिक्षण

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

महात्मा एज्युकेशन सोसायटीतर्फे चालविण्यात येणारी पिल्लई कौशल्य विकास संस्था (पिल्लई महाविद्यालय रसायनी, मोहापाडा), पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट तसेच तीर्था श्रमिक माथाडी व जनरल कामगार संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने परिसरातील युवक-युवतींसाठी विविध कौशल्य आधारित प्रशिक्षण कोर्सची घोषणा करण्यात आली असून, १०० टक्के नोकरीची हमी देण्यात येणार आहे. ब्युटीशियन, प्लंबर, इलेक्ट्रिशन, कम्प्युटर हार्डवेअर टेक्निशन, सिव्हिल सुपरवायझर, ऑटोमोबाईल टेक्निशन इतर उद्योगांसाठी आवश्यक कौशल्य प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे स्थानिक तरुणांना उद्योग क्षेत्रात रोजगाराच्या उत्तम संधी उपलब्ध होणार असून, स्वावलंबन व कौशल्यवृद्धीला मोठी चालना मिळणार आहे.

## नाभिक तरुण संघातर्फे महाआरती

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

चांद्रसेनीय कायस्थ प्रभू (सी.के.पी.) समाजाच्या श्री सिद्धीविनायक मंदिरात दर मंगळवारी रात्री आठ वाजता होणाऱ्या आरतीचे स्वरुप महाआरतीत बदलण्यात आले असून, यानिमित्ताने महाआरती साठी वेगवेगळ्या घटकांचा सन्मान करण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून मंगळवार (दि. ९) डिसेंबर रोजी नागोठणे विभाग नाभिक तरुण संघातर्फे मंदिरात महाआरती घेण्यात आली.



नाभिक तरुण संघाच्या वतीने समाजाचे प्रमुख आधारस्तंभ भाई टके व दीपाली टके यांच्या हस्ते ही महाआरती घेण्यात आली.

यावेळी सीकेपी समाजाच्या विश्वस्त मंडळाचे सुभाष गरुडे, उदय भिसे, अजय अधिकारी, संजय अधिकारी, सी के पी समाजातील इतर पदाधिकारी तसेच नागोठणे नाभिक तरुण संघाचे पदाधिकारी बाळासाहेब टके, दिगंबर खराडे, महेंद्र पवार, चेतन टके आदींसह सर्व सदस्य तसेच नाभिक समाज बांधव यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बसस्थानक रस्त्याची दुरुस्तीची मागणी

**। सुधागड-पाली । प्रतिनिधी।**

पाली शहरातील मराठा समाज हॉल ते पाली बस स्थानकाकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्याची अवस्था सध्या अत्यंत खराब झाली असून, या रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करावी, अशी जोरदार मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.



पाली नगरपंचायतीने गणपती मंदिराकडे जाणारा रस्ता तसेच सरकारी गोडाऊनकडे जाणाऱ्या रस्त्याचे डांबरीकरणाचे काम नुकतेच पूर्ण केले आहे. मात्र त्याच पद्धतीने मराठा समाज हॉल ते बस स्थानकाकडे जाणाऱ्या रस्त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे. परिणामी, या मार्गावर मोठमोठे खड्डे, उखडलेली खडी आणि बाहेर आलेले दगड यामुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

या रस्त्याचा वापर माघी गणेशोत्सवाच्या काळात यात्रेसाठी तसेच आपत्कालीन मार्ग म्हणून मोठ्या प्रमाणावर होतो. त्यामुळे या रस्त्याची दुरुस्ती ही केवळ सोयीसाठी नव्हे, तर सुरक्षिततेच्या दृष्टीनेही अत्यावश्यक आहे. सध्या या मार्गावरून ये-जा करणाऱ्या नागरिकांना धुळीचा त्रास होत आहे.

या रस्त्यावरून दररोज शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला आणि कामावर जाणारे नागरिक मोठ्या प्रमाणावर प्रवास करतात. रस्त्याची सध्याची अवस्था पाहता, कोणताही मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे या रस्त्याची तात्काळ डागडुजी व डांबरीकरण करणे अत्यावश्यक आहे.

या पार्श्वभूमीवर लवकरच पाली नगरपंचायतीकडे निवेदन देण्यात येणार असून, प्रशासनाने याची तातडीने दखल घ्यावी आणि रस्त्याच्या दुरुस्तीसाठी त्वरित पावले उचलावीत, अशी मागणी रहिवाशांनी केली आहे.

## ‘एसटी चालक-वाहकांचा मुजोरपणा सहन करणार नाही’

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव बस स्थानकात मंगळवार (दि.९) डिसेंबर रोजी सकाळी पुण्याहून महाडकडे येणाऱ्या एसटी बसच्या महिला वाहकाने एका अपंग व्यक्तीच्या कॉलरला धरून अरेरावी केल्याची माहिती अपंग व्यक्ती व त्याच्या नातेवाईकांनी माणगावच्या नगरसेविका ममता थोरे यांना दिली. यानंतर हि गाडी पुन्हा महाडकडून पुण्याकडे जात असताना माणगाव बसस्थानकात आली असता या बसमधील महिला वाहक चालकाला नगरसेविका थोरे यांनी आपण अपंग व्यक्तीला अशी कशी वागणूक देता. एसटी बस हि



नागरिकांना सेवा देण्यासाठी आहे. तुम्ही एसटी महामंडळाचे कर्मचारी असून तुम्ही प्रवाशांशी मुजोरपणाने न वागता प्रवाशांजवळ चांगले राहिले पाहिजे असे सांगितल्यावर सदर महिला वाहकाने मला त्या व्यक्तीने शिवीगाळी केल्याचे सांगितले. त्यावेळी या घटनेदरम्यान उपस्थित असलेल्या एका महिलेने त्या अपंग व्यक्तीने शिवीगाळी केली नाही असे सांगितले. यानंतर त्या वाहक महिलेने मी चुकले असेन तर मला माफ करा असे सांगून नंतर ती वाहक महिला माणगाव बस्थानकात बसची नोंद झाल्यावर पुण्याकडे रवाना झाली. परंतु प्रवाशांना व अपंग प्रवाशांना अशाप्रकारे महामंडळाचे कर्मचारी वागणूक देत असतील तर ते चुकीचे असून अशा मुजोर कर्मचाऱ्यांवर महामंडळाने कारवाई करण्याची मागणी नगरसेविका थोरे व सहकाऱ्यांनी यावेळी केली. तसेच यापुढे महामंडळाचा कोणीही कर्मचारी अरेरावीने वागणार असेल तर ते खपवून घेतले जाणार नाही असे त्यांनी सांगितले. यावेळी ममता थोरे, किशोरी हिरवे, वैभव शेट, आदी उपस्थित होते.

## केळवणे येथे मोटारसायकल रॅली



**। उरण । प्रतिनिधी ।**

दिल्ली येथील बॉम्बस्फोटानंतर देशभरात अलर्ट जारी करण्यात आला आहे. रायगड जिल्ह्यामध्ये या निमित्ताने कडेकोट बंदोबस्तासह, तपासणी सुरु करण्यात आली आहे. पोलिसांचा कडक पहारा ठेवण्यात आला आहे. जिल्ह्यातील सागरी सुरक्षा बळकट करण्यासाठी दोन दिवस सागरी सुरक्षा कवच अभियान नवीमुंबई, रायगड पोलीसांच्या वतीने राबविण्यात आला आहे. या अभियानाच्या माध्यमातून संशयास्पद बोटींवरील हालचालीवर लक्ष ठेवण्याबरोबरच रस्ते, खाडी, नदी, समुद्रकिनाऱ्यावरील हालचालींवर नजर ठेवण्याचे काम केले जाणार आहे. त्याचा एक भाग म्हणून पनवेल पोलीस ठाण्याच्या वतीने नुकताच केळवणे ग्रामपंचायत हद्दीत सागरी सुरक्षा कवच अभियान अंतर्गत मोटारसायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.या रॅलीत पोलीस, नागरिक तसेच महाराष्ट्र राज्य खलाशी संघटनेचे राज्य अध्यक्ष विश्वनाथ म्हात्रे सहभागी झाले होते.

हवामान बदलाचे वाढते सावट तातडीच्या उपाययोजनाची आवश्यकता

## कडधान्य पिकांचा हंगाम लांबणार

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

**तालुक्यात शेती पद्धतीत गेल्या काही वर्षांत मोठा बदल दिसून येत आहे. पारंपरिक भातशेतीपेक्षा अधिक उत्पादन आणि चांगला दर मिळतो म्हणून येथील शेतकरी मोठ्या प्रमाणात कडधान्ये, भाजीपाला आणि कलिंगडासारख्या नगदी पिकांकडे वळताना दिसतात. उन्हाळ्यातील रब्बी हंगामात कालव्याच्या पाण्यावरील भातशेतीलाही शेतकरी पर्याय म्हणून पाहत होते. यावर्षीची हवामानातील अनिश्चितता संपूर्ण हंगामाचे गणित विस्कटून टाकत आहे.**



रायगड जिल्ह्यात दरवर्षी जून ते सप्टेंबरदरम्यान पाऊस कोसळतो आणि ऑक्टोबर महिन्यात शेतीचा नवा हंगाम सुरू होतो. हे अनेक वर्षांपासूनचे चक्र आहे. यंदा मात्र ऑक्टोबर संपत आला तरी पावसाने उघडीप दिलेली नाही. सततच्या पावसाने भातशेतीची कापणी रखडली आहेच, शिवाय हिवाळी पिकांच्या बोजड हंगामालाही तडा गेला आहे.

ऑक्टोबरमध्ये कडधान्यांच्या पेरणीसाठी योग्य ओलावा असतो. भात कापणीनंतर शेतकरी वाल, पावटा, मटकी, मुग, तूर यांसारख्या कडधान्यांचे बियाणे पेरण्याची प्रथा आहे. यंदा देखील अनेक शेतकऱ्यांनी पाऊस ओसरल्याच्या अपेक्षेने पेरणी केली होती; परंतु सततच्या सरींनी या बियांणाचे कुजून नुकसान झाले. पेरणीची वेळ हातून निघून गेल्याने शेतकरी पुरता संकटात सापडला आहे. कडधान्याचे नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये पेरणी केल्यास हवामान थंड होत जात असल्याने पिकाची वाढ खुंटते. परिणामी उत्पादन आणि गुणवत्ता या दोन्हीवर परिणाम होतो, आणि नगदी पीक असल्याने आर्थिक नुकसानही अधिकच वाढते.

भातशेतीचे नुकसान, आता हिवाळी पिकांनाही संकट-भात जमिनीत चिखलात रुतला, काही ठिकाणी पाण्यात बुडाला. अशात हिवाळी पिकांच्या उशीरामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर दुहेरी आघात झाला आहे. काही शेतांचे पाणी उतरण्याचे नाव घेत नाही, तर ओलाच्या अतिरेकामुळे पेरणीसाठी जमीन तयार करणे शक्य होत नाही.

हंगामाचे भवितव्य धोक्यातहिवाळी पिके यशस्वी होण्यासाठी स्वच्छ आभाळ, सौम्य थंडी आणि मध्यम ओलावा आवश्यक असतो. मात्र यंदाच्या हवामानाने या तिन्ही गोष्टींना तडा गेला आहे. शेतकऱ्यांसमोरही कठीण प्रश्न उभा राहिला आहे. कधी पेरणी करावी, पेरणी उशिरा केली तर वाढ कशी होईल, उत्पादन कमी झाल्यास आर्थिक तोटा किती मोठा असेल, या अनिश्चिततेमुळे शेतकरी आर्थिकदृष्ट्या आणि मानसिकदृष्ट्या ताणावा खाली आहेत. शेतकऱ्यांना मार्गदर्शन, तातडीच्या उपाययोजना, नुकसान भरपाई आणि पर्यायी पिकांबाबत तज्ज्ञांचे सल्ले देणे आवश्यक आहे. हवामानातील अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर आधुनिक शेती पद्धती, जलनिकासी उपाय, बियाण्यांचे पुनर्पेरणी अनुदान यासारख्या उपाययोजना तातडीने राबवणे गरजेचे आहे.

## निवडक




### थेरोंडा ते एकविरा पालखी सोहळा

**अलिबाग** : जय मल्हार मित्र मंडळ-थेरोंडा आयोजित ११ वा पदयात्री पालखी सोहळा बुधवार (दि.१०) डिसेंबर ते रविवार (दि.१४) डिसेंबर या कालावधीत थेरोंडा ते श्री क्षेत्र एकविरा ही भक्तिमय पदयात्रा पार पडत आहे. थेरोडा खंडेराव पाडा येथील एकविरा मंदिरात महाआरती करून पालखीचे भव्य, धार्मिक आणि मंगलमय प्रस्थान झाले. चार दिवसांची ही पदयात्रा श्री क्षेत्र एकविरा येथे वैभवशाली धार्मिक उत्सवाने पूर्णत्वास जाणार आहे. सोहळ्याचे नियोजन अध्यक्ष सुरेल कोंडे, शरद नवगावकर, अतिल कोंडे, रविंद्र चौलकर, निरंजन भगत यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या सोहळ्यासाठी सुरेंद्र म्हात्रे, अशोक नाईक, जनार्दन कोंडे, ज्ञानेश्वर टिवळेकर, विजय चौलकर आदी मान्यवर विशेष उपस्थित होते.

### रविंद्र पाटील यांना पत्नीशोक

**पेण** : पेण नगरपालिकेचे माजी उपनगराध्यक्ष रविंद्र पांडूरंग पाटील यांची पत्नी रेखा रविंद्र पाटील यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले असून मृत्यु समयी त्यांचे वय ६८ वर्ष होते. त्यांच्या पश्चात दोन मुलं अमित, भुषण एक मुलगी ज्योती, सुना,जावई, नातवंड आणि पती रविंद्र पाटील हे आहेत. त्यांच्यावर अत्यसंस्कार पेण येथील विश्वेश्वर स्मशानभुमीत झाले. यावेळी सामाजिक, शैक्षणिक, उद्योग जगातील तसेच राजकीय क्षेत्रातील अनेक दिग्गज मंडळी उपस्थित होते.





### विद्यार्थ्यांची रक्तगट तपासणी

**पाली** : भारती सोनोग्राफी सेंटर अलिबाग यांच्यावतीनो स्वः भारती विदुयुत शहा यांच्या स्मृती प्रित्यर्थ अलिबाग तालुक्यातील राजिप शाळा खंडाळे येथे बुधवार (दि. १०) डिसेंबर रोजी मोफत रक्तगट तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान तपासणी शिबीरामध्ये शाळेतील १८ विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. शिक्षिका सुषमा घरत यांनी भारती सोनोग्राफी सेंटरचे विशेष आभार व्यक्त केले. भारती सोनोग्राफी केंद्राचे प्रमुख डॉ निमिष शहा यांच्या सहकार्याने राकेश थळे, भाग्यश्री म्हात्रे, सानिया सकपाळ या सर्व टीमने हे शिबीर संपन्न केले.



### स्नेहल राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत प्रथम

**मुरुड-जंजिरा** : अशोक ल. लोखंडे विद्यालयातील इयत्ता ९ मध्ये शिकत असलेल्या स्नेहल तांदळेकर या विद्यार्थिनीने सप्टेंबर २०२५ मध्ये पुणे विद्यार्थी गृह मार्फत घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत भाग घेतला होता. त्याचा निकाल जाहीर झाला असून त्या निबंध स्पर्धेमध्ये पिटसई विभाग ज्ञान प्रसारक मंडळाच्या अशोक ल. लोखंडे विद्यालयातील इयत्ता ९ वी मध्ये शिकत असलेली स्नेहल गणेश तांदळेकर या विद्यार्थिनीने नववी ते बारावी गटामध्ये राज्यस्तरीय प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे. सदर विद्यार्थिनीला विद्यालयातील शिक्षक संदीप इंगावले यांचे सहकार्य लाभले होते. त्याबद्दल त्या विद्यार्थिनीचे या शाळेचे चेअरमन खेळूशेठ वाजे, संजय रेडीज, अरुण खुळपे, अकील मुलाणी विद्यालयातील इतर शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीअभिनंदन केले. राज्यस्तरीय स्पर्धेत लोखंडे विद्यालयातील प्रथमच निबंध स्पर्धेत अभूतपूर्व यश प्राप्त केले आहे.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- कुरुळ ता. अलिबाग येथे दोन तीन गुंठे प्लॉट त्वरीत देणे आहे. ७७२०८४३९९९, ८०८७४७३९९९
- सासवणे येथील वाडीमध्ये कामासाठी कायमस्वरूपी जोडपे पाहिजे आहेत. संर्पक : ८००७८९३२३२/८८०६६८३२३२
- ऑफिसमध्ये कामाला मुलगी पाहिजे पात्रता- Bsc/Bcom, व Computer ची माहिती वेळ - सकाळी ९-सायं-६:३० ठिकाण-बामणसुरे, चोंढी, पगार-१०,०००महिना, रविवार-सुट्टी. Contact- 9823585321
- फर्निचर पॅकींगसाठी मुले पाहिजे शिक्षणाची अट नाही ठिकाण-बामणसुरे, चोंढी, पगार-१२,००० महिना, रविवार-सुट्टी. संर्पक - ९८२३५८५३२१
- Job opportunity - Office staff required for office in Alibag. Fresh graduate and post graduate candidates can call 9923750549 For interview
- अलिबाग येथे घरकामासाठी बाई, मुलगी पाहिजेत वेळ ९ ते ६. फोन ८१४९८६५६२५.
- कंपनी अधिकाऱ्यांच्या ग्रुपकरीता भाडेतत्तवावर १२०० स्के.फुट दोन बेडरूम किचन व हाप बेडरूम ३०० फुट गॅलरीसह अधिकाऱ्यांच्या गाड्यांच्या पार्किंगसह कॉटेज सर्व सोयीयुक्त भाडेतत्त्वावर देणे आहे. दलालचे स्वागत मो.८०१०६३४६५७
- लीफ एक्सोटिका विला वाडगाव येथे राहण्यासाठी एका जोडप्याची आवश्यकता आहे त्यासाठी पुढील नंबर वर संपर्क करावा ९८२२९३८४४४

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## सीताबाई कुंरगळे यांचे निधन



**नवीन पनवेल :** नारपोली येथील धार्मिक व परोपकारी वृत्तीच्या हभप सीताबाई जेठू कुंरगळे यांचे वयाच्या ७८ व्या वर्षी आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुली, दीर, जावई, सुना, नातवंडे असा मोठा कुंरगळे परिवार असून, नारपोली स्मशानभूमीत त्यांना सर्व क्षेत्रातील मंडळींनी श्रद्धांजली अर्पण केली. त्यांचे उत्तरकार्य १४ डिसेंबर रोजी राहत्या घरी होणार असून, यादिवशी १० वाजता प्रल्हाद महाराज वहाळकर यांचे कीर्तन होणार आहे.


### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**


### जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे वावे तर्फे श्रीवर्धन, ता. श्रीवर्धन, जि. रायगड येथील गट क्र. ९२/ब/२, खाता क्र. २८४, एकूण क्षेत्र ००-५७-००, पोट खराबा ०.०३.०० एकूण क्षेत्र ००-६०-०० आकारणी ०.३० लागवड गवत पड इतक्या क्षेत्राची मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक श्री. अजित द्वारकानाथ कुळकर्णी रा. मु. वावे तर्फे श्रीवर्धन, ता. श्रीवर्धन, जि. रायगड यांच्याकडून जाण्या-येण्याच्या रस्त्याच्या हक्कासह कायम विकत घेणेची ठरवली आहे. तशा आशयाची बोलणी आमच्या आशिलांनी संबंधीत जमिन मालकांन सोबत केलेली आहे. सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत असल्याबाबत मिळकत मालकांचे म्हणणे असून ती त्यांच्या आजपर्यंत ताबेकब्जात व वहिवाटीत आणि मालकी हक्कात असून प्रत्यक्ष कसवणुकी खाली आहे. तसेच सदर मिळकतीबाबत कोणत्याही न्यायालयात दिवाणी अथवा फौजदारी स्वरूपाचा दावा दाखल नाही. वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही कुळ, वहिवाट, ताबा, बयाणा, पावती, अखत्यारपत्र, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टी, मृत्यूपत्रांकित दान, जप्ती, लीन, लीज, बक्षिसी ट्रस्ट, पोटगी, वारसा किंवा कोणत्याही प्रकारच्या दस्ताने अथवा अन्य कोणत्याही प्रकारची कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास, तसेच नमुद मिळकतीच्या हद्दी खुणांवरुन कोणाचीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसाचे आत संबंधीतांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहीत (समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने) खाली सही करणार खरेदीदस्ताने वकील यांचेकडे पाठवावे व वकिलांची खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजून सदर मिळकतीवर आता कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत. असे गृहीत धरुन आमचे अशिल संबंधीत मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर मागाहून उपस्थित करण्यात येणारी कोणाचीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

श्रीवर्धन
दिनांक : १०/१२/२०२५

सही/-
**ॲड. अतुल अरविंद चौगुले**
B.L.S. LL.B
खरेदीदाराचे वकील

### जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे तळाशेत, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेल्या शेतजमिन मिळकतीपैकी ०-३७-०० आर्स शेतजमिन मिळकत श्री. प्रशांत जनार्दन पाटील, वगैरे, राहणार डावली रांजणखार, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला स्वाक्षरित झाला आहे. सदरील जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्या बाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्री. प्रशांत जनार्दन पाटील, वगैरे, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असले बाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी, हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| तळाशेत, ता.अलिबाग | १२५/२ | ३-१४-४०<br>०-०३-५० पो.ख.<br>३-१७-९० एकूण | २३-८१ |

सदरील मिळकतीपैकी श्री. प्रशांत जनार्दन पाटील यांच्या मालकीची ०-३७-०० (हे.आर), ही शेतजमिन मिळकत.

अलिबाग,
दिनांक : १०/१२/२०२५

सही/-
**(ॲड. संजय म. भगत)**
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड.
खरेदीदारांचे वकील

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, 'परिशिष्ट १' वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या सदरी मालक व कब्जेदार म्हणून श्री.विनायक यज्ञेश्वर साठे यांची व 'परिशिष्ट २' वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या सदरी मालक व कब्जेदार म्हणून श्री.विनायक यज्ञेश्वर साठे व इतर यांची नोंद आहे. सदर मिळकती या निर्वेध व निर्जोखमी असून, सदर मालकांच्या मालकी हक्काची व कब्जेउपभोगाची असलेली मिळकत आहे, असे सदर मालकांनी कथन केले आहे. सदर मिळकतींचा विकास करण्यासंबंधी सदर मालकांनी आमचे अशिलांसोबत व्यवहाराची बोलणी केलेली असून, त्या अनुषंगाने मालकी हक्क तपासण्याचा भाग म्हणून प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे.

तरी सदर मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा बोजा, हक्क, दान, गहाण, भाडेकरार, बक्षीसपत्र, लीन, लीज, चार्ज, मालकी, वहिवाट, जाणे-येणेचा मार्ग, कोर्ट कचेरीचा वाद, जामिन कद्दा अथवा करार अथवा इतर कोणत्याही प्रकारचा करार वा कसल्याही हक्क वा हितसंबंध असल्यास वा कोणतीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून त्यांनी ७ (सात) दिवसांच्या आत आमच्या कार्यालयात समक्ष येऊन कागदपत्रांच्या लेखी हरकत द्यावी व लेखी पोहोच घ्यावी. अन्यथा सदर मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध व बोजा नाही व यदाकदाचित असल्यास तो जाणीवपूर्वक सोडून दिला आहे, असे समजून या मिळकतीच्या अनुषंगाने सदर मालकांच्या मालकी हक्काचा दाखला देण्यात येईल. तसेच कोणीही परस्पर कोणत्याही वर्तमानपत्रात कोणत्याही स्वरूपाची हरकत प्रसिद्ध करू नये व केल्यास अशी हरकत ग्राह्य मानली जाणार नाही. सदर हक्काचा दाखला दिल्यावर मागाहून कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार चालणार नाही, याची दखल घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन :**
तुकडी व जिल्हा रायगड, पोटतुकडी व तालुका पेण, तलाठी सजा पेण व मौजे पेण येथील खालील वर्णनाची मिळकत-

**परिशिष्ट-१**

| गाव | नगर भूमापन क्रमांक | क्षेत्रफळ(चौ.मी) | धारणाधिकार |
|---|---|---|---|
| पेण | १३६२/सी/४ | १२५.४० | अ-१ |

वरील वर्णनातील जमिन मिळकत व त्यावरील घर मिळकत जिचा जुना मालमत्ता क्र.W10Z2008323 ~ मालमत्ता क्र.PENN00008185 ~ मॅनुअल मालमत्ता क्र. १०/२०५ असा आहे, अशी मिळकत.

**परिशिष्ट २**

| गाव | नगर भूमापन क्रमांक | क्षेत्रफळ(चौ.मी) | धारणाधिकार |
|---|---|---|---|
| पेण | १३६२/सी/५ | ४६.८० | अ-१ |

सदर मिळकतीमधील पाणी, नळ कनेक्शन, बांधकाम, वीज, दगड, वीट, माती, तरू, तृष्ण, काष्ठ, पाषाण, झाड-झाडोरा, सर्व वस्तूंसहित, जाणेयेण्याचे वहिवाटचे व इजमेंटच्या वापरण्याचे सर्व हक्कासहित दरोबस्त व वर्तमानात प्राप्त झालेला वा भविष्यात प्राप्त होणारा संपूर्ण एफएसआय, उडता एफएसआय, टीडीआर, डीसीआर यासह यांचा समावेश आहे.

ठिकाण-पेण
दिनांक : ११/१२/२०२५

सही/-
**ॲड.निषाद प्रकाश म्हात्रे**
पत्ताः१, महालक्ष्मी वैभव, चिंचपाडा रोड,
पेण, ता.पेण, जि.रायगड
मो.नं.९६३७२६२५६९

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटिसीद्वारे कळवण्यात येते की, आमचे अशिल श्री. यशवंत आंबो फसाळ रा. कवठेवाडी, कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड खालील वर्णनाची मिळकत श्री. दीपक रघुवीर सावंत रा.४/७०, गोदावरी प्रवरा ऑफ लिंक रोड डी एन नगर, अंधेरी वेस्ट, मुंबई ४०००५३ यांना ९९ वर्षाच्या करारावर देण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे : :

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे पुलाचीवाडी ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत**

| सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | क्षेत्र (हे. आर. पॉ) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|
| १६/२/अ/३ | ०.४०.०० | ०.३१ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हाला ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसात लेखी पुराव्यासह कळवावे, वरील मुदतीत कोणत्याही प्रमाणे हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे आशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, आमचे अशिलांची वरीलप्रमाणे मिळकत ९९ वर्षाच्या करारावर देण्याचे ठरविले आहे त्यास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक : ११/१२/२०२५

**ॲड. सुप्रिया रघुनाथ पिंगळे**
पत्ता - सरमोकादम बंगलो, गाळा नं २ दिवाणी
व फौजदारी न्यायालयासमोर, ता. कर्जत
जि.रायगड,४१०२०१ मो.नं. ९८३४७९९८१७

### जाहीरनामा
**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पेण**

अनिल विठ्ठल नागोडी, — अर्जदार
रा.रामवाडी, ता.पेण, जि.रायगड
विरुद्ध
ग्रामपंचायत पेण — सामनेवाला
ता.पेण,जि.रायगड.

या जाहीर नोटीशीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांचा मुलगा रूद्र अनिल नागोडी याचा जन्म दिनांक ०९/०७/२०२२ रोजी मौजे रामवाडी, ता.पेण, जि.रायगड येथे झाला असून त्याच्या जन्माची नोंद नगरपरिषद पेण, ता.पेण.जि.रायगड यांचेकडे झालेली नसल्याने जन्म नोंद घालणेसाठी या कार्यालयांत अर्ज दाखल केला आहे. तरी या अर्जाची चौकशी तात्काळ करावयाची असल्याने याकामी जर अर्जदार यांच्या मुलाच्या जन्माची नोंद घालण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून पुढील १५ दिवसांत कार्यकारी दंडाधिकारी पेण यांचे कार्यालयांत समक्ष हजर राहून आपले म्हणणे मांडावे, कोणाचेही म्हणणे किंवा आक्षेप या कार्यालयांत मुदतीत प्राप्त न झाल्यास अर्जावर उपलब्ध पुरावे, कागदपत्र विचारात घेउन अर्जदार यांना उशिरा जन्म नोंद दाखला देणेबाबत पुढील कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १०/१२/२०२५ रोजी माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्यानिशी दिले.

सही/-
**(तानाजी शेजाळ)**
तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पेण

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मौजे वेलशेत, ता. रोहा, जि. रायगड येथील मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक दर्शन सुरेश ताडकर यांजकडुन कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले असून तशी बोलणी आमचे अशिल श्री. प्रशांत धाया जोशी विद्यमान मालकांच्या दरम्यान झालेली आहेत व सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा आमच्या अशिलांस विद्यमान मालकांनी दिलेला असून सदर मिळकतीचे मालकी हक्काबाबतचे शोध घेण्याकरीता व त्या मिळकतीची विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करण्याकामी जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमच्याकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नंबर | क्षेत्र हे. आर. चौ.मी | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| वेलशेत, ता. रोहा | ३१४ | ०.१७.००<br>पो.ख. ०.४०.००<br>एकुण क्षेत्र ०.५७.०० | ०.४४ |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचेही गहाण, दान, बक्षीस, लीज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहीवाटीचे जाणे येणेचा मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्या मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पुढील ७ (सात) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार यांच्याकडे कळवावी.

येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचेही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.
कळावे.

अलिबाग,
दिनांक : ११/१२/२०२५

सही/-
**ॲड. सीमा किशोर घरत,**
जिल्हा न्यायालय, रायगड.
अलिबाग कार्यालय पत्ता-
गंगाधर को. ऑप. हौस. सोसा.
चेंढरे-अलिबाग.
मो.नं. ९८९०७३२४९७

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद केलेली जमीन खालील जमीन मालक यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे खरेदीदारांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणेः-

**मौजे उन्हेरे बुद्रुक, ता. सुधागड, जि. रायगड. येथील जमीन मिळकत..**
**मिळकतीचे वर्णन**

| जमिन मालकाची नांवे | स.नं. | क्षेत्र हे.आर | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| श्रीम.अनुजा प्रदीप ताम्हणे.<br>श्री.प्रदीप शंकर ताम्हणे.<br>श्रीम.रूचिरा निनाद प्रधान. | ४२/१ | ०-१६-०० | ०२-९३ |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोझा, भाडेपट्टा, जप्ती, लिज, लीएन जाणे येणेचे मार्ग अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासह समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. त्याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजुन त्यासंबधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबध नाही व असल्यास त्यांनी ते जाणीवपुर्वक सोडुन दिले आहेत, असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करून आमचे खरेदी घेणार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही. हे कळावे.
येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

दिनांक :- ११/१२/२०२५

खरेदीदारांतर्फे,
**राठोड एण्ड एसोसिएट्स**
२८६ अ राठोड सदन ऑफिस नं.७ पाली, ता.सुधागड, जि.रायगड.
मो. ९४२११६८७६३/९२७०३६७२९०

### जाहीर नोटिस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल हे खालील वर्णनाच्या मिळकती सदर मिळकतीच्या विद्यमान मालक १) दिलीप शिवशंकर वैष्णव विद्यमान मालकांकडून कायम खरेदी करणार असून तशी बोलणी आमचे अशिल व खालील वर्णन केलेल्या मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेमध्ये सुरु आहे.

**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे कळंब तालुका सुधागड जिल्हा रायगड येथील**

| सर्वे नंबर | क्षेत्र हे. आर | आकार |
|---|---|---|
| ११९/४/१ | एकूण क्षेत्र ०-१८-०० | ०-८२ |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीच्या मालकांनी आमचे अशिलांस दिली असून, मिळकतीचे मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहेत. तरी पैकी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे कळवाव्यात. सदर कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण - पाली-सुधागड
दि. ११/१२/२०२५

सही/-
**ॲडव्होकेट, तुषार गणेश कानडे**
पत्ता जांभूळपाडा तालुका सुधागड जिल्हा रायगड
मोबाईल नंबर - ९१६८८०१०४८

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे बेलपाडा, ता. अलिबाग येथील गट नं. ९, एकुण क्षेत्र ०-१७-३ हे.आर. आकार २.५० या मिळकतीचा दि. १५/०६/२०१८ रोजी साठेकरार केलेला आहे. सदर मिळकतीचा व्यवहार उभयपक्षांत वर नमुद मिळकतीच्या व्यवहारापोटी रक्कम रू. ८,६५,०००/- इतकी ठरली.

सदर मिळकतीचे मालक यांना आमचे अशिलांनी त्यांच्या दि. रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड अलिबाग, शाखा- हाशिवरे या खात्यातून वर नमुद मिळकतीच्या व्यवहारापोटी ठरलेली रक्कम ८,६५,०००/- पैकी दि. १८/०६/२०१८ रोजी रक्कम रू.२०,०००/- रोख स्वरूपात तर रक्कम रू. ६०,०००/- चेक स्वरूपात तसेच दि. ०६/०७/२०२० रोजी रक्कम रू. ५०,०००/- चेक स्वरूपात व दि. ०५/०८/२०२० रोजी चेक स्वरूपात रक्कम रू: ५०,०००/- तसेच रक्कम रू. २०,०००/- रोख स्वरूपात असे एकुण रक्कम रू. २,००,०००/ पोहोच झालेले आहेत.

सदर मिळकतीचे मालक यांनी आमचे अशिलांशी वर नमुद मिळकतीचा व्यवहार ठरवलेला असून त्याबाबत तसा साठेकरार आमचे अशिलांचे लाभात लिहून दिलेला आहे. असे असताना अन्य कोणत्याही व्यक्ती, संस्था, कंपनी यांनी वर नमुद मिळकतीबाबत सदर मिळकतीचे मालक यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये, केल्यास आमचे अशिलांची सदर व्यवहारास सक्त हरकत राहील. व सदर व्यवहार आमचे अशिल बांधील राहणार नाहीत.

अलिबाग,
दिनांक : १०/१२/२०२५

सही/-
**ॲड. परेश अ. देशमुख**
जिल्हा न्यायालय अलिबाग-रायगड

### जाहीर नोटिस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे सौ. अनुराधा गोपालकृष्णन अशिल हे खालील वर्णनाच्या मिळकती सदर मिळकतीच्या विद्यमान मालक अर्चना महेश इंदुलकर, महेश उत्तराव इंदुलकर मालकांकडून कायम खरेदी करणार असून तशी बोलणी आमचे अशिल व खालील वर्णन केलेल्या मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेमध्ये सुरु आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे जांभुळपाडा गावठाणातील दत्तप्रसाद सोसायटी, तालुका सुधागड, जिल्हा रायगड**

| सर्वे नंबर | क्षेत्र हे आर |
|---|---|
| जांभुळपाडा गावठाणातील दत्तप्रसाद सोसायटी सर्वे नंबर १६८ मधील निवासी बिनशेती भूखंड नंबर ५ | त्याचे क्षेत्र २६७ चौ. मी म्हणजे १९१० चौरस फूट क्षेत्राचा प्लॉट |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीच्या मालकांनी आमचे अशिलांस दिली असून, मिळकतीचे मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहेत. तरी पैकी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून सात (७) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण - पाली सुधागड
दि. १०/१२/२०२५

सही/-
**ॲडव्होकेट. तुषार गणेश कानडे**
रा- जांभूळपाडा, तालुका सुधागड जिल्हा रायगड
मोबाईल नंबर ९१६८८०१०४८


## सिडको
शहरांचे शिल्पकार

# जाहीर सूचना

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **वाटपपत्र / करारनामा** प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता (चौ.मी.) | करारनामा/वाटपपत्र करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा/वाटपपत्र संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्य:स्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | **ता.पनवेल, जि.रायगड** | | | | |
| १ | द्रोणागिरी २२५४ | जासई ११/९० | ७२/२ | ०-३२-३ | ५०० चौ.मी. | मौजे द्रोणागिरी, सेक्टर-४७, भूखंड क्र.५५A, क्षेत्र-४९९.९५ चौ.मी. | **कै. यमुना चंदर फडके मयत यांचे वारस**<br>१) श्री. नामदेव कान्हा ठाकूर<br>२) श्री. दिनानाथ कान्हा ठाकूर<br>३) श्री. अरूण कान्हा ठाकूर<br>४) श्री. नरेंद्र कान्हा ठाकूर<br>५) श्री. रंजन कान्हा ठाकूर | निरंक |
| | | जासई १८/९५ | १४८/२अ | ०-२२-३ | | | | |
| | | **एकुण संपादित क्षेत्र** | | **०-५४-६** | | | | |
| २ | खारघर २१४ | ६९ | ३७८/२ | ०-०९-० | एकुण ८४५० चौ.मी. मधील २४०० चौ.मी. पैकी ४०० चौ.मी. | भूखंड क्र.५५, सेक्टर-३५D, क्षेत्र-४०० चौ.मी. | **१) कै. मैनुद्दीन अब्दुला पटेल (मयत)** यांचे वारस<br>१.१. अब्दुल वहाब मैनुद्दीन पटेल (मयत) यांचे वारस १.१.१) बदुन्नीसा अ. वहाब पटेल<br>१.१.२) हालीबीबी अ.वहाब पटेल उर्फ हालिमाबी दस्तगीर पटेल<br>१.१.३) झरीना अ. वहाब पटेल उर्फ जरीना जहीर पटेल १.१.४) शबाना अ. वहाब पटेल उर्फ शबाना मुनाफ फक्की<br>१.१.५) झकरीया अ. वहाब पटेल<br>१.१.६) जहीर अहमद अ. वहाब पटेल<br>१.१.७)फातिमा अ. वहाब उर्फ फातिमा नुर पटेल<br>१.१.८) मिजबा अ.वहाब पटेल उर्फ मिजबा दस्तगीर १.१.९) आजमा अ. वहाब पटेल उर्फ अजमा अजहर पटेल<br>२. अब्दुल रहीम मैनुद्दीन पटेल<br>३. अब्दुल रऊफ मैनुद्दीन पटेल<br>४. जैतुनबीबी इक्बाल पटेल | मा. दिवाणी न्यायालय न्यायाधीश, व. स्तर पनवेल यांजकडे दाखल दिवाणी दावा क्र. एस.सी.एस. ४१८/२०१५ मध्ये निशाणी क्र. ५ मधील अर्ज मंजुर करताना तात्पुरत्या पारीत मनाईहुकूमाच्या आदेशास अधिन राहून खारघर नोड येथील इरादित भुखंड क्र.५५, सेक्टर-३५D, क्षेत्र-४०० चौ.मी. भूखंडाचे वाटपपत्र व भाडेपट्टा करारनामा करण्यास प्रस्तावित आहे. |
| ३ | | ७० | ३७९/६A | ५-१५-० | | | | |
| ४ | | ७० | २९०/१<br>२९१/४<br>२९३/१क<br>२९३/१ई | २-७३-०<br>०-६७-८<br>०-१०-०<br>०-०१-० | | | | |
| | | एकुण क्षेत्र | | ३-५१-८ | | | | |
| ५ | | ६९ | २९१/१<br>३०३/३ | ०-२७-३<br>०-५२-० | | | | |
| | | एकुण क्षेत्र | | ०-७९-३ | | | | |
| | | ६९ | ४२/१ | ०-१३-० | | | | |
| | | एकुण क्षेत्र | | **९-८६-१** | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सुचनेप्रमाणे प्रसिध्द झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पुरक कागदपत्रासह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :-** मुख्य भूमी व भूमापन अधिकारी,
सिडको भवन,समस्या निवारण केंद्र, खिडकी क्र. १०, तळ मजला,
सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (पनवेल/उरण)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/४१७/२०२५-२६



### कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
**रोजगार अधिसूचना**

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडने मेकॅनिकल/इलेक्ट्रिकल प्रकल्पातील विविध पदांसाठी निश्चित मुदतीच्या कंत्राटी आधारावर वॉक-इन-इंटरव्ह्यूद्वारे रोजगार सूचना प्रसिद्ध केली आहे. तपशील खालीलप्रमाणे आहेत:

**अधिसूचना संख्या: सीओ/पी-आर/12सी/2025, दिनांक 01.12.2025**

| क्र. सं. | पदाचे नाव | पदांची संख्या | मुलाखतीची तारीख |
|---|---|---|---|
| 1 | कनिष्ठ तांत्रिक सहाय्यक/यांत्रिक | 2 | 11.12.2025 |
| 2 | सहाय्यक विद्युत अभियंता | 1 | 12.12.2025 |
| 3 | सहाय्यक यांत्रिक अभियंता | 1 | 12.12.2025 |

उमेदवार अधिसूचना, पात्रता निकष इत्यादी तपशील केआरसीएल वेबसाइट **www.konkanrailway.com** वर तपासू शकतात ➔ भर्ती ➔ वर्तमान अधिसूचना आणि त्यानुसार अज करू शकतात

**मुख्य कार्मिक अधिकारी**



### कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)
**खुली - ई-निविदा आमंत्रण सूचना**

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्या वतीने वरिष्ठ प्रादेशिक अभियंता, रत्नागिरी यांचे द्वारे खालील कामासाठी खुली ई-निविदा आमंत्रित करण्यात येत आहे.

**क्र. सं.: 1. कामाचे नाव**: एसईएन/चिपळून विभागांतर्गत खाचा भरून नॉच्ड स्लीपर्सची दुरुस्ती. **निविदा क्रमांक: केआर-आरएन-डब्ल्यू-2025-64ए (दुसरा कॉल), दिनांक 11.12.2025**. **अंदाजित खर्च**: रु. 16,72,537/-. **ईएमडी**: रु. 33,500/-. **ऑनलाईन निविदा सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ**: 02.01.2026 रोजी 15:00 वाजेपर्यंत.

**क्र. सं.: 2. कामाचे नाव**: एईएन/रत्नागिरी विभागात किमी 199/000-100 येथील खेडशी-I बोगद्याच्या काँक्रीट अस्तराच्या भागात असलेल्या भेगांची दुरुस्ती. **निविदा क्रमांक: केआर-आरएन-डब्ल्यू-2025-63ए (दुसरा कॉल), दिनांक 11.12.2025**. **अंदाजित खर्च**: रु. 6,79,743/-. **ईएमडी**: रु. 13,600/-. **ऑनलाईन निविदा सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ**: 02.01.2026 रोजी 15:00 वाजेपर्यंत.

अधिक माहितीसाठी प्रादेशिक रेल्वे व्यवस्थापक कार्यालय, एमआयडीसी क्षेत्र, मिरजोळे, रत्नागिरी येथे संपर्क साधावा. (संकेतस्थळ: **https://www.ireps.gov.in**)


### जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, विद्यमान जमिन मालक १) श्री. अवधूत अंकुश नाईक, २) श्री. दयानंद देविदास पाटील, ३) श्री. समीर बाळु राणे यांचेसोबत ताबेकब्जातील व वहिवाटीतील त्यांचे कायदेशीर मालकी हक्कातील व हिश्यातील खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली बिनशेती मिळकत आमचे अशिलांनी त्यांचेकडुन कायमस्वरुपी खरेदी करण्याचा व्यवहार ठरविला आहे. सदरहु बिनशेती मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**मौजे - गौरकामत, ता. कर्जत, जि. रायगड येथील बिनशेती मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्र हे.आर./चौ.मी. | आकारणी रु.- पै. |
|---|---|---|---|
| ७१ | १२ | ४.०८.७६<br>क्षेत्र मिळकतीचे खरेदीखत | ४१-०० |

वरील वर्णनाच्या बिनशेती मिळकतीचे संदर्भात अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, ट्रस्ट, पोटगी, वारसा, भाडेपट्टा, वहिवाट वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासहित सदर नोटीस झाल्यापासुन १४ (चौदा) दिवसांच्या आत खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात.

वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर बिनशेती मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालकाबरोबर पुर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत,
दिनांक : ११/१२/२०२५

**ॲड. मोनाली रामदास हजारे**
एम.कॉम.एल. एल. बी.
पत्ता: दहिवली, ए. व्ही. एफ. रेसिडेन्सी,
ललानी रोड, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं. ९२६०१०९२८२

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे पी जी गोपालकृष्ण अशिल हे खालील वर्णनाच्या मिळकती सदर मिळकतीच्या विद्यमान मालक मीनाक्षी सुमीत नाडकर, गौरी सुमीत नाडकर, श्रुती सुमीत नाडकर, क्र २ ते ३ यांचे करीता अ.पा. क. आई मीनाक्षी सुमीत नाडकर मालकांकडून कायम खरेदी करणार असून तशी बोलणी आमचे अशिल व खालील वर्णन केलेल्या मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेमध्ये सुरु आहे.

**मिळकतीचे वर्णन : -**
**मौजे करचुंडे; तालुका सुधागड जिल्हा रायगड येथील**

| सर्वे नंबर | क्षेत्र हे. आर | आकार |
|---|---|---|
| ५/१ | एकूण क्षेत्र ०-४८-१० | ५-०० |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीच्या मालकांनी आमचे अशिलांस दिली असून, मिळकतीचे मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहेत. तरी पैकी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण - पाली सुधागड
दि. १०/१२/२०२५

सही/-
**ॲडव्होकेट. तुषार गणेश कानडे**
रा- जांभूळपाडा, तालुका सुधागड जिल्हा रायगड
मोबाईल नंबर ९१६८८०१०४८

## नि|व|ड|क

### आश्रमशाळेत क्रीडा महोत्सव



**माणगाव :** वनवासी कल्याण आश्रम संचालित कै. वि. गो. गांधी अनुदानित आश्रमशाळा, माणगाव येथे आयोजित २६ वा क्रीडा महोत्सव अत्यंत उत्साहात व मोठ्या दिमाखात पार पडला. ४ ते ६ डिसेंबर या तीन दिवसीय क्रीडा स्पर्धेत विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत उल्लेखनीय प्रतिसाद दिला. एकूण ४ वयोगटांत ५ सांघिक व १६ वैयक्तिक अशा मिळून २१ क्रीडा प्रकारांच्या स्पर्धा रंगल्या. याप्रसंगी माणगावचे पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे, डॉ .नितीश सावंत, लक्ष्मण जंगम, आर. एच. पाटील, दिपक गोंधळी, ऋषिकेश मालोरे, उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक अरुणा पोहरे, आदिवासी सामाजिक कार्यकर्त्या इंदिरा पवार, मारुती पवार, गोंधळी, पालक प्रतिनिधी रेवती शिद आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते १४६ बक्षिसांचे वितरण करण्यात आले. क्रीडा महोत्सवाचा यशस्वी समारोप जल्लोषात झाला.

### पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण स्पर्धा



**उरण :** आपल्या परिसरातील मुलांनी पोलीस भरतीमध्ये यश संपादन करावे या दृष्टिकोनातून विजय विकास सामाजिक संस्थेच्या माध्यमातून जेएनपीए वसाहतीमध्ये पोलीस भरती प्रशिक्षण स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेसाठी नवी मुंबई आणि रायगडमधील जवळपास १५० युवक युवतीने सहभाग नोंदवला होता. मुलांच्या गटासाठी मैदानीमध्ये १६००मीटर धावणे १०० मीटर धावणे गोळा फेक, लेखी परीक्षा घेण्यात आली. मुलींमध्ये ८०० मीटर धावणे, १०० मीटर धावणे, गोळा फेक, लेखी परीक्षा घेण्यात आली. यावेळी प्रथम द्वितीय आणि तृतीय आलेल्या स्पर्धेकांना सन्मान चिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. प्रशिक्षक विजय भोईर, विकास भोईर, राम चोहान, गुंजन निषाद, नितेश पाटील, मनोहर टेमकर, अजय तांडेल, सोनल तांडेल, प्रगती भोईर, किरण स्वार, शशिकांत घरत आदी उपस्थित होते. बक्षीस वितरण विजय भोईर यांच्या हस्ते करण्यात आले.

### सार्थकचा अचूक सुवर्ण वेध

**माणगाव :** माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या सुधाकर नारायण शिपुरकर आणि गणेश यशवंत वाघरे या इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थी सार्थक महामुणकर या खेळाडूने फिल्ड तिरंदाजी स्पर्धेत प्रथम क्रमांकाची तब्बल तीन सुवर्णपदके जिंकली. मंगळवार (दि.९) डिसेंबर रोजी कांदिवली मुंबई येथे झालेल्या विभागीय फिल्ड आर्चरी स्पर्धेत तीन सुवर्णपदके पटकावली. सार्थकची निवड राज्यस्तरीय फिल्ड आर्चरी स्पर्धेत करीता झाली आहे. त्याच्या सुवर्ण कामगिरीवर सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. संस्थेचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे, सर्व संस्था चालक, चेअरमन, शिक्षक आणि पालकांनी विशेष अभिनंदन करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

### किकबॉक्सिंग स्पर्धेत पब्लिक स्कुलचे यश

**उरण :** लोकनेते दि. बा. पाटील मंगल कार्यालय जासई उरण येथे नुकत्याच पार पडलेल्या खेलो इंडिया अस्मिता वूमेन्स लीग २०२५ या किकबॉक्सिंग स्पर्धेमध्ये आर. के. जी. पब्लिक स्कूल जासईमधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन घवघवीत यश संपादन केले. यामध्ये समृद्धी शिंदे-सुवर्णपदक, श्वेता सिंग रौप्यपदक, श्रेया म्हात्रे रौप्यपदक, ख़ुशी गौड रौप्यपदक, हर्षिता यादव रौप्यपदक, दिया पाटील कास्यंपदक, फातिमा शेख कास्यंपदक तर पूर्वी भगत, समसारा शेख, तनिष्का देवरानी, तन्नू सरोज, क्रिशा भालेकर यांनी सहभाग घेतला होता. या विद्यार्थ्यांना संतोष घरत, प्राचार्य वैशाली नगराळे, सुरेखा पाटील यांचे योग्य असे मार्गदर्शन लाभले. किकबॉक्सिंग प्रशिक्षक संतोष मोकल, शुभम म्हात्रे, आकाश भिडे, केवल मोकल यांचेही मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले. उत्तम यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# भारतीय गोलंदाजांचा अचूक मारा

## || दक्षिण आफ्रिका ७५ धावांत गारद || मालिकेत १-0 अशी आघाडी

**| कटक | वृत्तसंस्था |**

भारतीय गोलंदाजांनी मंगळवारी दक्षिण आफ्रिकेविरुद्ध झालेला पहिला टी-२० सामना गाजवला आहे. कटकच्या बाराबाती स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात भारतीय संघाने १०१ धावांनी दणदणीत विजय मिळवला. त्यामुळे ५ सामन्यांच्या टी-२० मालिकेत सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वातील भारतीय संघाने १-० अशी आघाडी घेतली आहे. भारताचे सर्वच गोलंदाजांनी या सामन्यात चांगली कामगिरी केली. तसेच हार्दिक पांड्याने फलंदाजीतही मोलाचे योगदान दिले.



हार्दिक पांड्याच्या वादळी फिफ्टीमुळे भारताने दक्षिण आफ्रिकेसमोर विजयासाठी १७५ धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेचा संघ १२.३ षटकातच ७४ धावांवर सर्वबाद झाला. भारताच्या सहा गोलंदाजांनी विकेट्स घेतल्या. यासोबतच यष्टीरक्षक जितेश शर्मानेही चांगली कामगिरी केली, त्याने चांगले झेल यष्टीरक्षण करताना घेतले. या सामन्यात आफ्रिकेला दुसऱ्याच चेंडूवर अर्शदीपने मोठा धक्का दिला. त्याने क्विंटन डी कॉकला शून्यावर बाद केले. तिसऱ्या षटकात अर्शदीपने ट्रिस्टन स्टब्सलाही १४ धावांवर बाद केले. त्याचा झेल जितेशने घेतला. त्यानंतर कर्णधार एडेन मार्करम आणि डेवाल्ड ब्रेव्हिस यांनी डाव पुढे नेण्याचा प्रयत्न केला. पण मार्करमलाही अक्षरने टिकू दिले नाही. त्याने १४ धावांवर त्रिफळाचीत केले. तो बाद झाला, तेव्हा दक्षिण आफ्रिकेच्या ४० धावा झाल्या होत्या. त्यानंतर केवळ ३४ धावांत आफ्रिकेने पुढच्या ७ विकेट्स गमावल्या. डेव्हिड मिलरला पांड्याने जितेश शर्माच्या हातून १ धावेवरच झेलबाद केले. त्याला बाद आधी दिले नव्हेत, पण भारताने घेतलेल्या डीआरएसमध्ये तो बाद असल्याचे दिसले. डेनोवन फरेराला वरुण चक्रवर्तीने ५ धावांवर माघारी धाडले. त्याचाही झेल जितेशनेच घेतला.

मार्को यान्सिनचा अडथळा वरुणने दूर केला. त्याला १२ धावांवर वरुणने त्रिफळाचीत केले. या विकेट्स जात असताना एक बाजू डेवाल्ड ब्रेव्हिस-ने सांभाळली होती. पण अखेर ११ व्या षटकात बुमराहनेही त्याच्या विकेट्सचे खाते उघडले. त्याने या षटकात आधी ब्रेव्हिसला २२ धावांवर बाद केले, तर केशव महाराजला शून्यावर माघारी धाडले. यासोबतच बुमराहने १०० विकेट्सही पूर्ण केल्या. शेवटी नॉर्कियाला पटेलने १ धावेवर त्रिफळाचीत केले, तर दुबेने सिपामलाला २ धावांवर बाद करत आफ्रिकेचा डाव संपवला. भारताकडून अर्शदीप, बुमराह, चक्रवर्ती आणि पटेल यांनी प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या. तसेच पांड्या आणि दुबे यांनी प्रत्येकी १ विकेट घेतली.

तत्पुर्वी भारतीय संघाने प्रथम फलंदाजी करताना २० षटकात ६ बाद १७५ धावा केल्या. भारताकडून पांड्याने २८ चेंडूत ६ चौकार आणि ४ षटकारांसह नाबाद ५९ धावा केल्या. तसेच तिलकने २६ आणि अक्षरने २३ धावांची खेळी केली. अभिषेक शर्माने १७ धावा केल्या. बाकी कोणी १५ धावांचा टप्पाही पार केला नाही.

आफ्रिकेकडून एनगिडीने सर्वाधिक ३ विकेट्स घेतल्या. सिपामलाने २ विकेट्स घेतल्या, तर फरेराने १ विकेट घेतली.

### बुमराहच्या 100 विकेट

टी-२० मध्ये १०० बळी पूर्ण करून, जसप्रीत बुमराहने एका खास यादीत एंट्री केली आहे. तिन्ही फॉरमॅटमध्ये १०० बळी घेणारा तो जगातील पाचवा गोलंदाज बनला आहे. तो टिम साउदी, शकिब अल हसन, लसिथ मलिंगा आणि शाहीन शाह आफ्रिदी यांच्या पंक्तीत सामील झाला आहे. ज्यांनी तिन्ही फॉरमॅटमध्ये १०० किंवा त्याहून अधिक विकेट्स घेण्याची कामगिरी केली आहे.

### बॅडमिंटन स्पर्धेत सतिश तृतीय

**पाली/गोमाशी :** भारतरत्न राजीव गांधी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स सायन येथे मंगळवार (दि.९)डिसेंबर रोजी झालेल्या शिक्षक, अधिकारी, कर्मचारी यांच्या विभागीय स्तरावरील बॅडमिंटन स्पर्धेत सुधागड तालुकास्तरावर प्रथम क्रमांक प्राप्त केलेले रायगड जिल्हा परिषद शाळा भार्जेचे उपशिक्षक सतिश किसन खानेकर यांनी सहभाग घेऊन तृतीय क्रमांकाला गवसणी घातली. त्यामुळे राज्यस्तरावर पुढील फेरीसाठी त्यांची निवड झाली आहे.त्यांच्या या यशाबद्दल सुधागड तालुका गटविकास अधिकारी लताताई मोहिते, गटशिक्षणाधिकारी सादुराम बांगारे, अनिल राणे, कैलास म्हात्रे, गणेश बैकर, शिक्षक संघ सुधागड सर्व सदस्य या सर्वच स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे.

### राष्ट्रीय मिल मजदूर संघाची कबड्डी स्पर्धा २०२५.

## महिला गटात डॉ. शिरोडकर, भारतमाता स्पोर्टस्, मुंबई पोलीस जिमखाना विजयी

**| मुंबई | प्रतिनिधी |**

डॉ. शिरोडकर, भारतमाता स्पोर्टस्, मुंबई पोलीस जिमखाना यांनी राष्ट्रीय मिल मजदूर संघाने १८ व्या आंबेकर सप्ताहनिमित्त आयोजित केलेल्या महिला गट कबड्डी स्पर्धे त विजयी सलामी दिली. युनियन बँक, न्यू इंडिया इन्शुरन्स यांनी व्यावसायिक पुरुष गटाची दुसरी फेरी गाठली. ना. म. जोशी मार्ग येथील श्रमिक जिमखाना येथे सुरु झालेल्या उद्घाटनीय महिलांच्या सामन्यात परेलच्या डॉ. शिरोडकरने काळाचौकीच्या जिजामाता स्पोर्टस् चा ६५-१७ असा धुव्वा उडवीत विजयी सलामी दिली.



महिलांचा दुसरा सामना मात्र अत्यंत चुरशीचा झाला. त्यात भारतमाता स्पोर्टस् ने ५-५ चढायाच्या खेळातं चंद्रोदय मंडळाला ३४-३१(८-५) असे नमवीत दुसरी फेरी गाठली.

पुरुष व्यवसायिक गटात युनियन बँकेने मुंबई महानगर पालिकेचा ३६-२१ असा पाडाव केला. दुसऱ्या सामन्यात न्यू इंडिया इन्शुरनसने मध्य रेल्वे मुंबई विभाग संघाला ४७-२१ असे सहज पराभूत केले. पुरुष प्रथम श्रेणी पुरुषांत शिवमुद्रा प्रतिष्ठानने अमर हिंद मंडळाला ५६-२० असे, तर लायन्स स्पोर्टस्ने शताब्दी स्पोर्टस्ला ३५-२४ असे पराभूत करीत दुसरी फेरी गाठली.

### सह्याद्री विद्यालयात क्रिडा महोत्सवाचे उद्‌घाटन




**| खोपोली | प्रतिनिधी |**

खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या सह्याद्री विद्यालय,कनिष्ठ महाविद्यालय आणि इंग्लीश स्कूलचा वार्षिक क्रिडा महोत्सवाचे उद्‌घटन सोहळा मंगळवार (दि.९) डिसेंबर रोजी संपन्न झाला. या उद्‌घाटन सोहळ्यासाठी खोपोली मंडळ अधिकारी भरत सावंत संस्थेचे अध्यक्ष संतोष जंगम, शालेय समिती अध्यक्ष संजय पाटील, शिळफाटा ग्रामस्थ अध्यक्ष राजेंद्र फक्के, हनुमान मित्र मंडळ अध्यक्ष अमोल शहाणे, हिरामन झावरे, अमृत ओसवाल, मनियार, पद्माकर गायकवाड, सगळगिले, तानाजी वारंगे, दिनेश ओसवाल यांच्यासह शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष संतोष जंगम यांनी उपस्थित पाहुण्यांचे सन्मान केला.

### भारत कांस्यपदकासाठी लढणार



**| चेन्नई | वृत्तसंस्था |**

एफआयएच पुरुष ज्युनिअर विश्वचषक विजेतेपदाने हुलकावणी दिलेला यजमान भारतीय हॉकी संघ बुधवारी (दि.१०) येथे होणाऱ्या कांस्यपदकाच्या लढतीत अर्जेंटिनाचे आव्हान मोडीत काढण्यासाठी महत्त्वाकांक्षी असेल. यापूर्वी, २०१६ मध्ये लखनौ येथे अखेरचे विजेतेपद पटकावणाऱ्या भारताला, रविवारी झालेल्या उपांत्य सामन्यात सातवेळच्या विजेत्या जर्मनीकडून १-५ अशा मोठ्या फरकाने पराभव पत्करावा लागला. दरम्यान, बुधवारीच होणाऱ्या अंतिम लढतीत जर्मनी आठव्या विजेतेपदासाठी स्पेनचा सामना करेल. भारतासाठी दोनवेळचा विजेता अर्जेंटिना संघ कडवे आव्हान असेल. त्यांनी या स्पर्धेत आपली क्षमता दाखवून दिली आहे. २००५ आणि २०२१ मध्ये विजेतेपद पटकावणाऱ्या अर्जेंटिनाला स्पेनविरुद्धच्या अटीतटीच्या उपांत्य सामन्यात १-२ असा पराभव पत्करावा लागला होता. त्यामुळे तेदेखील स्पर्धेचा शेवट विजयाने करण्यासाठी उत्सुक आहेत. प्रथम भक्कम बचाव करायला हवा आणि त्यानंतर आक्रमणावर भर देऊन गोलच्या संधी निर्माण कराव्या लागतात.

### भारताचा वेल्सवर दणदणीत विजय

**| सँटियागो | वृत्तसंस्था |**

एफआयएच ज्युनिअर महिला हॉकी विश्वचषकातील ९ ते १६ क्रमांकासाठी झालेल्या पात्रता सामन्यात भारतीय ज्युनिअर महिला हॉकी संघाने वेल्सवर ३-१ असा प्रभावी विजय नोंदविला. सँटियागो येथे सोमवारी झालेल्या या सामन्यात भारताकडून हिना बानो, सुनिलिता टोप्पो आणि इशिका यांनी गोल केले, तर वेल्सकडून एलोइस मोआत हिने एकमेव गोल केला. सामन्याच्या पहिल्याच ३० सेकंदांत पेनल्टी कॉर्नर मिळवत भारताने आक्रमक सुरुवात केली. सातत्याने संधी निर्माण करत खेळावर वर्चस्व मिळवण्याचा प्रयत्न भारतीय संघ करत होता; मात्र सुरुवातीला गोल करता आला नाही. वेल्सला पेनल्टी स्ट्रोकची संधी मिळाली होती. पण, भारतीय गोलरक्षक निधीने चतुराईने बचाव करत त्यांना रोखले. अखेरीस पहिल्या सत्राच्या शेवटी साक्षी राणाच्या कौशल्यपूर्ण खेळावर हिना बानोने सहज गोल करत भारताला आघाडी मिळवून दिली.



दुसऱ्या सत्राच्या सुरुवातीला सुनिलिता टोप्पोने जवळून अचूक फायदा घेत भारताला २-० अशी आघाडी मिळवून दिली. पहिल्या अर्ध्यात भारताने १४ वेळा वर्तुळात शिरकाव करत वर्चस्व गाजवले आणि हाफटाईमनंतर २-० अशी भक्कम आघाडी घेतली. तिसऱ्या सत्राच्या सुरुवातीला वेल्सच्या गोलरक्षकाच्या बचावातून उडालेला चेंडू इशिकाला मिळाला आणि तिने सहज गोल करत भारताला ३-० अशी आघाडी दिली. ज्योती सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय संघाने खेळाचा वेग आणि लय नियंत्रित ठेवत वेल्सच्या बचावफळीला सतत दडपणाखाली ठेवले. शेवटच्या सत्रातही भारताने चेंडूवरील पकड कायम ठेवत आणखी गोल करण्याच्या संधी शोधल्या. तथापि, वेल्सने एका प्रतिआक्रमणाची संधी निर्माण केली आणि एलोइस मोआतने गोल करत संघाचे खाते उघडले. मात्र हा गोल वेल्ससाठी एकमेव ठरला. त्यानंतर भारताने ३-१ विजयावर शिक्कामोर्तब केले.

### क्रीडा महोत्सवात चित्तथरारक कसरती



**| माणगाव | प्रतिनिधी |**

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या सुधाकर नारायण शिपुरकर व गणेश यशवंत वाघरे इंग्रजी माध्यम शाळेत वार्षिक क्रीडा महोत्सवाचे उद्‌घाटन निवृत्त कॅप्टन निर्मल सिंग रंधवा यांच्या हस्ते झाला. क्रीडा महोत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांची कला, क्षमता आणि खेळाडूवृत्ती सादर करण्याची संधी मिळाली. दिवसाभराचा हा सोहळा विद्यार्थ्यांच्या आनंदाने, उत्साहाने आणि टाळ्यांच्या कडकडाटाने गाजला. शाळेने वर्षानुवर्षे घडवलेले हे क्रीडा संस्कार आणि मुलांमधील शिस्तबद्ध वर्तन पाहून उपस्थितांनी शाळेचे विशेष कौतुक केले. क्रीडा महोत्सव विद्यार्थ्यांसाठी ऊर्जा, प्रेरणा आणि आनंदाची पर्वणी ठरला.

### रावढळ क्रिकेट क्लबच्या क्रिकेट स्पर्धेला उस्फुर्त प्रतिसाद



**| महाड | प्रतिनिधी |**

महाड तालुक्यातील रावढळ क्रिकेट क्लबला यावर्षी ५० वर्षे पूर्ण होत आहेत यानिमित्ताने सुवर्ण महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून एकदिवसीय क्रिकेट स्पर्धा सत्संग मैदान खारघर येथे घेण्यात आल्या. यामध्ये ३२ संघाचा समावेश होता, श्री भैरी जोगेश्वरी वामने-अ यांनी सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या चषकाचा मानकरी ठरला.

या मर्यादित षटकांच्या क्रिकेट स्पर्धेत अंतिम सामन्यात चषकाचे प्रथम क्रमांकाचे मानकरी श्री भैरी जोगेश्वरी वामने (अ), तर हनुमान स्पोर्ट्स क्लब सोनघर द्वीतीय क्रमांक विजेता, तृतीय पारितोषिक श्री दत्तकृपा क्रिकेट संघ अप्पर तुडील (अ) संघ, चतुर्थ क्रमांक चॅलेंजर कुडूक यांनी नाव कोरले तसेच उत्कृष्ट फलंदाज विकास भुवड, उत्कृष्ट गोलंदाज साहिल नाकते, तर आयुष धाडवे मालिकावीरांचा किताब पटकावला.

सदर विजेता संघाला पारितोषिकाच्या स्वरूपात रोख रक्कम व आकर्षक चषक मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले.

#### गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नावाची नोंद | ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकण्याचे ध्येय

## अन्विता बुटेची जागतिक कर्तबगारी

**| माणगाव | प्रतिनिधी |**

माणगावच्या भूमीने पुन्हा एकदा कर्तृत्वाचा अनमोल ठेवा जगासमोर उघड केला आहे. शहरातील प्रतिभावान रोलर स्केटिंगपटू अन्विता संजना संजय बुटे हिने केलेली कामगिरी केवळ महाराष्ट्राचा नव्हे, तर संपूर्ण देशाचा अभिमान वाढवणारी ठरली आहे.

कर्नाटकातील बेळगाव येथे २४ ऑक्टोबर रोजी झालेल्या शिवगंगा रोलर स्केटिंग स्पर्धे त अन्विताने १०० मीटर अंतर केवळ २२.२२ सेकंदांमध्ये पूर्ण




करून वेधक कामगिरी केली. या अद्वितीय कौशल्याची अधिकृत दखल घेत गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्सने तिचे नाव जागतिक विक्रमधारक म्हणून नोंदवले आहे. एका साध्या वातावरणा-तून आलेल्या मुलीने केलेली ही कर्तबगारी संपूर्ण माणगावची मान वाढवणारी ठरली आहे. विद्यानगर, माणगावची रहिवासी आणि सध्या सरदार वल्लभभाई पटेल विद्यालयात इयत्ता नववीत शिकत असलेली अन्विता, लहानवयातच स्केटिंगच्या प्रेमात पडली. स्केटिंगसोबतच तिने आइस स्केटिंग बँडी हॉकीमध्येही राष्ट्रीय पातळीवर पदक जिंकला आहेत. देश-परदेशातील स्पर्धांत तिने आजवर मिळवलेली १०० हून अधिक सुवर्ण, रौप्य आणि कांस्यपदके तिच्या उज्ज्वल वाटचालीची साक्ष देतात. इंडोनेशियात झालेल्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत तिने पुन्हा एकदा पराक्रम करत सुवर्णपदकाची कमाई केली आणि भारताचा तिरंगा उंचावत जगभरात आपली छाप उमटवली. मुंबई, दिल्ली, गोवा, मद्रास अशा अनेक मोठ्या शहरांतील स्पर्धांमध्ये तिचे सुवर्णयश कायम राहिले आहे.

क्रीडा विकास परिषदेने दिलेल्या भारत भूषण, हिंद रत्न, तसेच एशियन बुक रेकॉर्ड, इंडो एशियन रेकॉर्ड, इंटरनॅशनल बुक ऑफ रेकॉर्ड्ससारख्या बहुमानांनी तिच्या परिश्रमांना योग्य तो मान मिळाला आहे.

अन्विताच्या प्रगतीमागे प्रशिक्षक संतोषकुमार मिश्रा यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले आहे. तिच्या डोळ्यांसमोर एकच ध्येय म्हणजे ऑलिम्पिक सुवर्णपदक जिंकणे आहे.

#### माणगावकरांचा अभिमान

अन्विताच्या या जागतिक कर्तृत्वानंतर माणगाव शहरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ड. राजीव साबळे यांनी अन्विताचे कौतुक करत, ही मुलगी माणगावचा अभिमान आहे. तिचे हे यश तिला आणखी मोठ्या उंचीवर नेईल, अशा शब्दांत तिला उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)